# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४८

निर्णय दिनांक ०२-०३-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ताहिक, "धुमाकूळ",
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना किनवट तालुक्यातील २००७ साली कृषि विभाग व वन विभागामार्फत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या झालेल्या व चालू असलेल्या कामांच्या माहितीची आवश्यकता आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणतीही विशिष्ट अशी विनंती आयोगासमोर केलेली नाही.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात वर नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - **कामाचे नांव, गांव, प्रत्येक कामाच्या उपस्थित मजुरांच्या हजेरीपटाची छायांकीत प्रत, कार्यालयाचे नांव** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी काही पत्रव्यवहार केला किंवा कसे याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अवगत होत नाही. यावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

आज येथे सुनावणीसाठी राज्य माहिती आयोगाने संबंधितांना दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे लेखी कळवून व आयोगाच्या कार्यालयातून दिनांक २४-०२-२००९ रोजी सकाळी ११-४५ वाजता दूरध्वनीवर श्री. तोट्टावार, कनिष्ठ लिपीक यांच्यामार्फत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना संदेश देऊनही सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय मान्य न झाल्यास ते, सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

- -

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक, "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४९

निर्णय दिनांक ०२-०३-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ताहिक, "धुमाकूळ",
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना किनवट तालुक्यामध्ये कार्यरत असलेले घाऊक, अर्धघाऊक व किरकोळ रॉकेल विक्रेत्यांची नांवे, व गांवे याची संपूर्ण माहिती हवी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, **२००७**

**या सालातील किनवट तालुक्यात कार्यरत असलेल्या स्वस्त धान्य दुकानांची नांवे, दुकानदारांची नांवे, गावे, केरोसीनच्या घाऊक, अर्धघाऊक व किरकोळ विक्रेत्यांची नांवे, गावे, परवानाधारक क्रमांक, प्रत्येक महिन्याला मिळणारा केरोसीनचा कोठा, शिधापत्रिकेवर मिळणा-या केरोसीनची माहिती व शिधापत्रिकाधारकांना विक्रीची एक लिटर किंमतीची माहिती,** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर निर्णय झाला किंवा कसे हे आयोगास संबधितांच्या अनुपस्थितीमुळे व आवश्यक कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही.

आज रोजीच्या सुनावणीसंदर्भात राज्य माहिती आयोगाने संबंधितांना दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे लेखी कळवून व आयोगाच्या कार्यालयातून दिनांक २४-०२-२००९ रोजी सकाळी ११-४५ वाजता श्री. तोट्टावार, कनिष्ठ लिपीक यांच्यामार्फत दूरध्वनीवर संदेश देऊनही जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सुनावणीस उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय मान्य न झाल्यास ते, सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

-                                   -

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक, "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २४५०/२००७ व २४५१/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५०/०७ व २४५१/०७

निर्णय दिनांक ०२-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २४५०/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, सेनगांव, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, सेनगांव, जिल्हा हिंगोली

अपील क्रमांक २४५१/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक २४५०/०७ : १ श्रीमती एस. एम. गौड
अपील क्रमांक २४५१/०७ : १ श्री. संजयकुमार बन्सीलाल

- -

२ श्री. प्रभाकर तुळशीराम

## निर्णय

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०२-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक २४५०/०७ शी संबंधीत जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत. अपील क्रमांक २४५१/०७ मधील जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष व अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थीने सदर अपिले त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झ ााल्याने व त्यामुळे त्यांनी केलेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने संबंधितांकडून माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याने राज्य माहिती आयोगाकडे केल्याचे या अपील अर्जात नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी, सेनगाव व औंढा नागनाथ यांच्याकडे तालुक्यातील ०१ एप्रिल २००० ते ३० एप्रिल २००७ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या कार्यक्षेत्रातील अर्धघाऊक, रॉकेल विक्रेते श्रीमती एस. एम. गौड, श्री. संजयकुमार बन्सीलाल व श्री. प्रभाकर तुळशीराम यांना मंजूर केलेल्या रॉकेल नियतनासंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास दोनही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी, सेनगाव व औंढा नागनाथ यांच्याकडे दिनांक १५-०६-२००७ रोजी प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही.

आज येथे सुनावणीच्या वेळी राज्य माहिती आयोगाने त्यांच्या दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे लेखी सूचना देऊनही अपिलार्थी हे गैरहजर आहेत तर लेखी सूचनेव्यतिरिक्त आयोगाच्या कार्यालयातून दिनांक २४-०२-२००९ रोजी दुपारी १२-०५ वाजता दूरध्वनीवर श्री. अभिमन्यू बोधवड, तहसीलदार औंढा नागनाथ

- -

यांना संदेश देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी औंढा नागनाथ हे गैरहजर आहेत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली नसल्याचे सांगितले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्णतः संबंधीत रॉकेल विक्रेत्यांकडे उपलब्ध असते, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सबंधीत रॉकेल पुरवठाधारकाच्या प्रतिसादावर अवलंबून राहावे लागते.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात, त्रयस्थ पक्षाकडील माहिती मागितली होती. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी, संबंधीत जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष या सर्वांना एकत्रित बोलावून त्यांची सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव व औंढा नागनाथ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त दोनही प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत त्रयस्थ पक्षासह सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास ते सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे स्वतंत्र व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले (अपील क्रमांक २४५०/२००७ व २४५१/२००७) निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २४५०/२००७ व २४५१/२००७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव व औंढा यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या त्यांच्याकडील संबंधीत प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित

करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत संबंधीत त्रयस्थ पक्षासह सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५२

निर्णय दिनांक ०२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,<br>मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>हिंगोली |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी,<br>हिंगोली |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली |
| | जन अपिलीय अधिकारी | : जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जानुसार विहित मुदतीच्या आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी दिनांक १४-०६-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील केले. तथापि

- -

त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे **हिंगोली जिल्ह्यातील एप्रिल १९९० ते १८ एप्रिल २००७ पर्यंत काळा बाजार करणा-या घाऊक व अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांवर त्यांच्या कार्यालयाकडून व पोलिस खात्याकडून दाखल झालेल्या गुन्ह्यासंदर्भात झालेल्या कारवाईसंदर्भात** काही माहिती मागितली होती. अपिलार्थी यांनी सदरचा अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी यांना उद्देशून केला होता, तथापि जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज अपिलार्थीने दिनांक १४-०६-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविला होता.

मध्यंतरीच्या काळामध्ये सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले. आज रोजी उपस्थित असलेले जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्याकडे अद्यापपावेतो अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज हस्तांतरीत झाला नसल्याचे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी हिंगोली यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत त्यांना आयोगातर्फे व्यक्तिशः हस्तांतरीत करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास ते सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह)

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५३/०७

निर्णय दिनांक ०२-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद उपविभाग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सहाय्यक जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे, औरंगाबाद शहरातील ३० अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांना शासनाकडून दिलेल्या रॉकेल वितरण व स्टॉक रजिस्टरच्या प्रती आणि त्या अनुषंगाने इतर विस्तृत माहितीची मागणी केली होती.

आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित असलेले सहायक जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या केलेल्या अर्जामधील माहिती देण्याकरिता, अपिलार्थीने मागितलेली माहिती औरंगाबाद शहराच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत असल्याने, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ०३-०५-२००७ रोजीचा मूळ अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २२-५-२००७ रोजी पाठविला. तथापि प्रथमतः त्यांनी हा अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्याने, जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून आदेश घेऊन अंतीमतः तो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००७ रोजी हस्तांतरीत करण्यात आला. तदनंतर अपिलार्थीस ही माहिती मिळाली किंवा कसे याबाबत त्यांना काहीही माहिती नाही. तसेच अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज, या प्रकरणी उपविभागीय अधिकारी (महसूल) औरंगाबाद हे जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०६-२००७ रोजी परत पाठविला. उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेतली किंवा कसे यासंदर्भात त्यांना काहीही माहिती नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रथम अपील अर्ज तहसीलदार, औरंगाबाद यांना उद्देशून केला असल्यामुळे, आज सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व संबंधिताची अनुपस्थिती पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः निर्णय होणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते.

सबब, अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत या निर्णयाबरोबर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात येऊन, त्यांना

-                    -

असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास ते सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७५८

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. गायकवाड आनंद सोन्याप्पा,<br>मु. पो. औराद, तालुका उमरगा,<br>जिल्हा उस्मानाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद क्रमांक ३ तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, लातूर | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खडपीठाकडे दिनांक २२-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने एकाच विषयावर दोन वेगवेगळे अपील अर्ज आयोगाच्या मुंबई व औरंगाबाद येथील कार्यालयात

- -

केलेले आहेत. दोनही अपील अर्ज तंतोतंत एकसारखे आहेत. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात त्यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जाची सुनावणी औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १८-१२-२००८ रोजी घेऊन या संदर्भात आपले आदेश दिले असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपीलावर निर्णय घेण्याचे कोणतेही प्रयोजन आता उरले नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गायकवाड आनंद सोन्याप्पा, मु. पो. औराद, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात पडताळणी समिती, समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६४

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्री. लक्ष्मण पिराजी कांबळे, अपिलार्थी
रा. क्रांतीनगर, गणेशनगर कॉर्नर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : सहायक आयुक्त (सा.प्र.वि.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने आयोगाकडे हे व्दितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०६-२००७ रोजी झालेल्या सुनावणीतील आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना आठ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे सूचित केले होते, परंतु एक महिन्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही, त्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. याच अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे ही माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या लेखी नोटिशीव्यतिरिक्त दिनांक २४-०२-२००९ रोजी दुपारी १२-५० वाजता दूरध्वनीव्दारे त्यांच्या कार्यालयातील श्री. ताडकवार, लिपीक, यांच्यामार्फत निरोप देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आज सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, याबद्दल आयोगातर्फे तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत आहे. सचिव (नगरविकास) यांना असे सूचित करण्यात येते की, राज्य माहिती आयोगाकडील सुनावणीसाठी अनुपस्थित राहिलेले संबंधीत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे त्यांनी स्पष्टीकरण मागवून यासंदर्भात त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याचा विचार करावा.

-                    -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत व अधिनियमामध्ये स्पष्ट केलेल्या तरतुदींचे पालन करुन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी निर्णय घ्यावयाचा असतो. माहिती अधिकारात माहिती मागतांना व ती अर्जदारास पुरवितांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणे एवढीच प्रक्रिया त्यामध्ये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील या तरतुदीनुसार "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल कारणे, स्पष्टीकरणे अथवा खुलासे देय नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून "त्यांनी आठ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती का दिली नाही," अशी माहिती मागणे म्हणजेच जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षिणे असे आहे, जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय नाही, त्यामुळे अपिलार्थीचा विचाराधीन अपील अर्ज फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक १७-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन सदर अपील अर्ज उपेक्षित ठेऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांना विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब, आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन त्यांच्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या

-                                    -

बेपर्वा वर्तनाची आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०३-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण पिराजी कांबळे, रा. क्रांतीनगर, गणेशनगर कॉर्नर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (सा.प्र.वि.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६५

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्रीमती अखिला बानो मो. मुसा, अपिलार्थी

घ. नं. १-१७-९८, नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिस समोर,

जुना बाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पत

संस्था म., कबाडीपुरा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पत

संस्था म., कबाडीपुरा, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही प्रकारची विशिष्ट विनंती आयोगास केलेली नसून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील सोबत जोडला आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते.

\- \-

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या संस्थेशी संबंधीत सन १९९३ ते २००७ या कालावधीतील काही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **सदस्यांनी भरलेल्या पावत्या, शेअर सर्टिफिकेट, वार्षिक लाभांशाचे विवरणपत्र, पत संस्थेचे पासबुक, पत संस्थेची नियमावली, पत संस्थेची कार्यकारिणी व सदस्यांची यादी व ताळेबंद पत्रक अहवाल** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पत संस्था म. या संस्थेवर सहकार विभागाने १८ जून २००८ पासून प्रशासक नेमले असल्याने व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्णतः प्रशासकाच्या ताब्यात असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत प्रशासकाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००७ रोजी माहिती मागितली होती. अपिलार्थीने जी माहिती मागितली होती ती अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात होती तरीही ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर अंदाजे १० महिन्यांनी सहकार विभागातर्फे या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे जन

- -

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेले कारण आयोगास मान्य करता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

संस्थेच्या अध्यक्षांनी आयोगास अवगत केले की, तलत शिक्षण संस्था सेवकांच्या सहकारी पत संस्थेमध्ये अद्यापपर्यंत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या नाहीत, त्या आता १५ दिवसाच्या आत करण्यात येतील. या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी म्हणून कोणाचीही नेमणूक झाली नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने माहितीचा मूळ अर्ज करतेवेळी ही माहिती पतसंस्थेच्या माहिती अधिका-याकडे उपलब्ध असल्याने ती आता जरी या संस्थेवर नेमलेल्या सहकार विभागाच्या प्रशासकाकडे उपलब्ध असली तरी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधीत प्रशासकाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देणे हे त्यांना अनिवार्य आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

- -

१ अखिला बानो मो. मुसा, घ. नं. १-१७-९८, नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिस समोर, जुना बाजार, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पत संस्था म., कबाडीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पत संस्था म., कबाडीपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६६

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्री. श्रीकृष्ण एल. देशपांडे, अपिलार्थी
३८, सोनी महाल, महावीर हौसिंग सोसायटी,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, माहिती अधिका-याकडून त्यांना विहित मुदतीत प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी दिनांक २८-०८-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. ते जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ३०-०८-२००७ रोजी प्राप्त झाले. तथापि त्यांच्या या अपील अर्जावर दिनांक १५-१०-२००७ रोजी स्मरणपत्र पाठवून

- -

देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात पारदर्शकता नसल्यामुळे उभयतांकडून विहित मुदतीत माहिती देण्याचा कालावधी उलटून जाऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झ ाली नाही. माहिती अधिकाराचा अर्ज ते गांभीर्याने घेत नाहीत, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी त्यांनी या अपील अर्जामध्ये अंतीमतः आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००६ आणि ०१-०६-२००६ ते ३१-०३-२००७ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयामार्फत केल्या गेलेल्या सिमेंट बंधारे, माती बंधारे व सलग समतल चर या योजनेतंर्गत कामे पूर्ण करण्यासाठी प्राप्त झालेला निधी व त्याचा विनियोग यासंदर्भात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून मागितली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. विहित कालावधी व्यपगत झ ाल्यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी यावरही कडी करुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या लेखी नोटिशीव्यतिरिक्त दिनांक २४-०२-२००९ रोजी दुपारी ०१-०५ वाजता दूरध्वनीव्दारे त्यांच्या कार्यालयातील श्री. ताडपे, तांत्रिक कृषि अधिकारी यांच्यामार्फत निरोप देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर आज सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

- -

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून आवश्यक त्या शुल्काचा भरणा प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस ती विहित मुदतीमध्ये देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या पत्रावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी यांच्या ताब्यात असते, असे अनुमान काढण्यास काही हरकत नसावी. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी मंडळ कृषि अधिका-याच्या ताब्यात होती तरी सर्व संबंधितांकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड काम होते किंवा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामुग्री मोठ्या प्रमाणात वळवावी लागणार असल्याची शक्यताही या प्रकरणी संभवत नाही. थोडक्यात, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर व अपील अर्जावर कारवाई करण्यास जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा उदासीन दृष्टीकोन या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे, हेच खरे आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याचा हक्क आहे व अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत मर्यादित असून ही माहिती अपिलार्थीस दिल्याने अधिनियमातील कलम ८ अथवा ९ च्या तरतुदींचा भंग होण्याची शक्यता देखील या प्रकरणी नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही अशा हेतुने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून माहिती दडविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास पुरविण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक / कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे कार्यालयातील मंडळ कृषि अधिकारी हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे.

- -

सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांना, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००७ रोजी प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा सिध्द केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना, उपरोक्त प्रकरणी एकत्रितपणे विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रु पये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०३-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

- -

प्रत,

१ श्री. श्रीकृष्ण एल. देशपांडे, ३८, सोनी महाल, महावीर हौसिंग सोसायटी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६७

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ सौ. जयश्री देवराव फुके, अपिलार्थी
"शिवनेरी निवास" तेलगांव रोड (दक्षिण बाजू), सिरसाळा,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शाखाधिकारी, जायकवाडी उजवा कालवा सिंचन
शाखा क्रमांक ६, सिरसाळा वसाहत, तालुका परळी
वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, मराठवाडा गोदावरी खोरे विकास
महामंडळ, कार्यालय, सिंचन भवन, परळी वैजनाथ, जिल्हा
बीड

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : कार्यकारी अभियंता, माजलगांव पाटबंधारे विभाग, परळी वैजनाथ, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे वकील हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झ ाली नाही, शाखाधिकारी जायकवाडी उजवा कालवा सिंचन शाखा यांनी त्यांचा मूळ अर्ज संबंधीत खात्याच्या माहिती अधिका-याकडे पाच दिवसाच्या आत हस्तांतरीत करावयास हवा होता परंतु तसे न करता तो हेतुपुर:स्सर प्रलंबीत ठेवला व ४५ दिवसानंतर त्यांना माहिती देण्याचे अधिकार नसल्याचे कारण दाखवून माहिती नाकारली आणि अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले जे की, बेकायदेशीर आहे. तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत एकूण सहा मुद्दयांवर काही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती. हा अर्ज अपिलार्थीने शाखाधिकारी, जायकवाडी उजवा कालवा सिंचन शाखा क्रमांक ६ यांना उद्देशून केला होता. संबंधीत शाखाधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, मराठवाडा गोदावरी खोरे विकास महामंडळ, कार्यालय, सिंचन भवन, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याकडे दिनांक २२-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे आदेश पारित न केल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन व नंतर त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केले असल्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर दंडाची कारवाई करावी व त्यांना मूळ अर्जाव्दारे अपेक्षित असलेली माहिती विनामूल्य पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

या प्रकरणाशी संबंधीत कार्यकारी अभियंता, माजलगांव पाटबंधारे विभाग, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहे. त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने तो शाखाधिकारी यांच्याकडे केला व संबंधीत

- -

शाखाधिकारी हे आता बदलून गेल्याने, शाखाधिका-याकडून हा अर्ज त्यांच्याकडे का पाठविला गेला नाही याची कोणतीही कारणे त्यांना ज्ञात होत नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांच्या दिनांक २२-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जामध्ये त्यांच्या कार्यालयाचा जो पत्ता दिला आहे तो चुकीचा असल्याने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही व त्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय घेता आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी म्हणून शाखाधिका-याकडे प्रथम अर्ज केला आहे. मूळात शाखाधिकारी हे या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे त्यांनी अपिलार्थीचा अर्ज या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून याची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांना माहिती देण्याचे अधिकार दिले नसल्याने अपिलार्थीस ते माहिती देऊ शकत नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची पाहणी करता असे आढळून येते की, अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या संबंधात कालावधीचा कुठेही उल्लेख केलेला नाही. अर्जदाराची सही म्हणून स्वतः अपिलार्थीच्या ऐवजी दुस-या व्यक्तीने सही केली आहे व अपिलार्थीने हा अर्ज सत्यप्रत म्हणून साक्षांकीत केलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या कथित अपील अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील अशाच प्रकारची वस्तुस्थिती आढळून येते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करतांना मात्र स्वतः सही केलेली आहे. त्यामुळे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने माहिती मागतांना त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये चुकीचा पत्ता लिहून तसेच माहितीसाठीचा अर्ज व प्रथम अपील अर्ज अपूर्ण व चुकीचा भरुन गंभीर तांत्रिक चूका केल्या आहेत, त्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज हे मूळात अवैध ठरत असल्यामुळे, अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन उरत नाही. यास्तव अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे असा निष्कर्ष काढून ते फेटाळण्यात येत आहे.

- -

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने शाखाधिकारी जायकवाडी उजवा कालवा यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला असता अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदींचे पालन न करता त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-१०-२००७ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर प्रतिसाद दिला असल्याने संबंधीत शाखाधिकारी, जायकवाडी उजवा कालवा सिंचन शाखा क्रमांक ६, सिरसाळा वसाहत, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी संबंधीत शाखाधिकारी, जायकवाडी उजवा कालवा सिंचन शाखा क्रमांक ६, सिरसाळा वसाहत, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच ९० दिवसाच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करुन आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. तसेच कार्यकारी अभियंता, माजलगाव पाटबंधारे विभाग, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीसाठी, प्रथम अर्ज व अपील अर्ज कोणाकडे व कसा करावा याचा सविस्तर तपशील त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

- -

१ सौ. जयश्री देवराव फुके, "शिवनेरी निवास" तेलगांव रोड (दक्षिण बाजू), सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, माजलगांव पाटबंधारे विभाग, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६८

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे, अपिलार्थी
व्दारा - श्री. एस. एस. वाघ, ३-१७-९५४, यशवंतनगर,
अंबड रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्या, राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जुना जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अध्यक्ष / सचिव, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,
भगवाननगर, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : १ श्री. संतोष दादासाहेब साबळे
२ सौ. सुनंदा तिडके
३ श्री. एस. एस. वाघ

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा त्रयस्थ पक्षांपैकी एक, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर उर्वरित त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती / पत्रव्यवहार / कलम ७ अन्वये अपिलाचा मार्ग यापैकी काहीच दिले नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर अपिलार्थीने वीस रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००७ रोजी केलेल्या प्रथम अर्जावर व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही कोर्ट फी स्टॅम्प डकविल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर, माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर तसेच प्रथम अपील अर्जावर केलेल्या सह्यामध्ये सकृतदर्शनी फरक आढळून येत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीकडून प्राप्त झालेल्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची व प्रथम अपील अर्जाची मूळ प्रत आयोगास दाखविली असता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे फॅक्सने पाठविला असून या अर्जावरील सदर फॅक्सवर कोणतीही अक्षरे उमटली नसल्याने अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांना कोणतीही कारवाई करणे शक्य झाले नाही असे जन माहिती अधिकारी आयोगास सांगत आहेत. अपिलार्थीचा दिनांक ३१-०८-२००७ रोजीचा मूळ अर्ज वाचनीय नसल्याचे राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने कळविले देखील आहे. यासंदर्भातील योग्य तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीने पाठविलेला मूळ अर्ज वाचनीय नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वेळीच निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्ज सादर करण्याची तसदी घेतली नसल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन पुढे असे दिसून येते की, अपिलार्थीने स्वतःचा पत्ता न देता "व्दारा" असा दुस-या व्यक्तीचा पत्ता देऊन ही माहिती मागविली आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थी ही व्यक्ती अस्तित्वात आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, कारण आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थीच्या वतीने त्यांचे अधिकारपत्र घेऊन श्री. रामचंद्र काशिनाथराव अंबट हे गृहस्थ उपस्थित आहेत. या पत्रावर कथित अपिलार्थीची सही सकृतदर्शनी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या त्यांच्या सहीशी जुळत नाही.

-                -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. संतोष दादाराव साबळे व सौ. सुनंदा तिडके यांच्याशी संबंधीत सन १९९१ ते दिनांक ३१-०८-२००७ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्णय दिला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीचा मूळ अर्ज अपिलार्थीने महाविद्यालयाकडे सादर केल्यास, ही माहिती देणे त्यांना सुलभ होईल. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सरळ सादर न करता तो जन माहिती अधिकारी यांच्याकडे फॅक्सने पाठविला. सदर फॅक्स वाचनीय नसल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. ही बाब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या वेळीच निदर्शनास आणली आहे. जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रतिसाद अपिलार्थीने दिला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जासोबत त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज जोडला नसल्याने व तो वाचनीय नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज सादर करण्याचे सूचित करावे लागले. हे सर्व पाहता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील विहित तरतुदीनुसार प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी आता नव्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत प्रथमतः अर्ज करावा. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून आलेले टपाल स्वीकारण्यास कोणत्याही प्रकारे टाळाटाळ न करता ते स्वीकारुन अपिलार्थीस, त्यांचा

-                -

माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०३-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे, व्दारा - श्री. एस. एस. वाघ, ३-१७-९५४, यशवंतनगर, अंबड रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या, राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जुना जालना.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, भगवाननगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६९

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे, अपिलार्थी

व्दारा - अशोक शेषराव सांगळे,

मु. पो. अंतरवाली राठी, तालुका घनसावंगी,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्राचार्या, राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जुना जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष / सचिव, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,

भगवाननगर, गेवराई,

तालुका गेवराई, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : १ श्री. एस. एस. वाघ

२ श्री. अशोक शेषराव सांगळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती / कलम ७ अन्वये अपिलाचा मार्ग याबाबत काहीच दिले नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. एस. एस. वाघ यांच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही.

आज रोजी आयोगासमोर उपस्थित अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीकडून अपिलार्थी यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस दिलेली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाची त्यांनी स्वीकृती करुन त्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कारवाई विहित मुदतीत करुन अपिलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भात अवगत करावे. या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

- -

दिनांक ०३-०३-२००९

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे, व्दारा - अशोक शेषराव सांगळे, मु. पो. अंतरवाली राठी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या, राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जुना जालना.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, भगवाननगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८५

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्री. हनमंत काशीराव देशमुख, मु. पो. देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड — प्रतिवादी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजना २००७ अंतर्गत झालेल्या कामाची माहिती त्यांना अपेक्षित असलेली माहिती म्हणून नमूद केली आहे. यामध्ये आर. एफ. ओ. माहूर यांनी पाहणी केलेली कामे नियमाप्रमाणे पूर्ण झाली आहेत काय व पूर्ण झालेल्या कामाच्या मजूरी मस्टरच्या सत्यप्रती या मुद्दयांचा समावेश आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन २००७-२००८ या कालावधीतील एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००७ रोजी आपला निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना दिनांक १८-१२-२००७ रोजी व्यक्तिशः पुरविली असून यासंदर्भात अपिलार्थीकडून सदर माहिती त्यांना दिनांक १८-१२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे व त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले अपिलार्थीचे पत्र त्यांनी आयोगास दाखविले. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे अथवा त्यांनी सादर केलेल्या पुराव्याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-१२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे शेवटी दिनांक १८-१२-२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः नेऊन दिली व त्यांची पोच घेतली.

-　　-

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले होते अथवा जन माहिती अधिकारी यांच्याशी त्यांनी किती वेळा संपर्क साधला होता, या मुद्दयावर विचार केला नसल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचा पुरावा व त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आता अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोग कोणतेही आदेश देत नाही, तसेच उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याशी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कधीही संपर्क साधला नाही अथवा या संदर्भात कोणताही पुरावा त्यांनी आयोगासमोर त्यांच्या व्दितीय अपिलासोबत सादर केलेला नाही. यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हनमंत काशीराव देशमुख, मु. पो. देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर, जिल्हा जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील

- -

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८६

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्री. शे. अहेमद शे. उमर (चाउस), अपिलार्थी

रा. मौलाना अ. क. आझाद चौक, हदगांव,

तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, हदगांव,

तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २७-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियमान्वये माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व माहिती दडवून ठेवल्याबद्दल संबंधितांवर

- -

दंडात्मक कारवाई करावी व तसेच दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे **- हदगांव तालुक्यातील मार्च २००४ ते मार्च २००७ या आर्थिक वर्षात, फळबाग, ठिबक सिंचन योजना, तुषार योजना, या योजनेंतर्गत मंजूर केलेल्या व नामंजूर केलेल्या लाभार्थ्यांची यादी, वाटप झालेले अनुदान ज्या बँकेकडून किंवा कंपनीकडून वाटप झाले आहे त्या बाबतची सविस्तर माहिती** - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या जागा रिक्त असल्याने व प्रभारी अधिका-याकडून माहिती घेऊन अपिलार्थीस पुरविण्यासाठी त्यांना वेळ लागणार असल्याने, अपिलार्थीस त्यांनी "कृपया कार्यालयात येऊन माहिती पाहण्यास या कार्यालयाची काही हरकत नाही" असे कळविले. तथापि सदरचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, आणि हे पत्र पाठविल्याचा कोणताही सबळ (पुरावा जावक नोंदवहीची प्रत अथवा पोस्टाची पावती) उपस्थित जन माहिती अधिकारी यांना, आयोगासमोर, आयोगाने त्यांच्या नोटिशीमध्ये स्पष्टपणे नमूद करुनही, सादर करता आला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००७ रोजीचे पत्र पाठविले नसल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १६-१०-२००७ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी सूचना केली, तथापि अपिलार्थी हे सुनावणीसाठी विहित दिवशी अनुपस्थित राहिल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे निकाली काढले. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

- -

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, अद्यापही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही व १८ महिन्याचा कालावधी व्यपगत होऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहिती मागविली असल्याने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले याची आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०३-०७-२००७ रोजीचे पत्र, जे तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्राप्त झाले ते आयोगास दाखविले. या पत्रावर अपिलार्थी यांनी आवश्यक असलेल्या माहितीच्या मागणीचा पुनरुच्चार केला आहे. यावरुन अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले होते, हे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक २०-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी वेळ लागणार असल्याची कल्पना, त्यांना दिली व अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये येऊन माहिती पाहून जाण्याचे सूचित केले होते.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या अपील अर्जावर दिनांक १६-१०-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने दिलेल्या पत्त्यावर पत्र पाठविले होते. तथापि त्यांचा अनुभव असा आहे की अपिलार्थी त्यांच्याशी पत्रव्यवहार करतांना नेहमी मोघम पत्ता देतात, त्यामुळे अपिलार्थीस पत्र प्राप्त झाले किंवा कसे हे त्यांना कळले नाही. आयोगाकडून आजच्या सुनावणीची प्राप्त झालेली नोटीस देखील त्यांनी अपिलार्थीच्या घरी पोहचती करण्याची स्वतः व्यवस्था केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये तयार असून, ते अपिलार्थीस ती ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी प्रथम प्रतिसाद दिनांक २०-०६-२००७ रोजी म्हणजे, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिला असला तरी हा प्रतिसाद सकारात्मक नसून या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न देता ती माहिती देण्यासाठी वेळ लागणार असल्याची अपिलार्थीस कल्पना दिली होती असे दिसून येते. त्यांच्या कार्यालयातील,

-                -

अपिलार्थीने अर्ज करतेवेळी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची पदे रिक्त असल्याने हा वेळ त्यांना लागणार आहे असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्रामध्ये म्हटले आहे. तथापि हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण जरी पद रिक्त होते तरी या पदाचा अतिरिक्त कार्यभार त्यांच्या कार्यालयातील दुस-या कोणातरी कर्मचा-याकडे सोपविला देखील असणार हे नक्कीच आहे. जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात केलेला युक्तिवाद व अपिलार्थीस प्राप्त न झालेल्या त्यांच्या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, हा पत्रातील विरोधाभास चटकन लक्षात येण्यासारखा आहे, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, "प्रभारी अधिका-यांकडून माहिती काढून घेऊन आपणास पुरविण्यास वेळ लागणार असल्याने कृपया या कार्यालयात येऊन माहिती पाहण्यास या कार्यालयाची काही हरकत नाही." मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये लेखी स्वरुपात माहितीची मागणी केली आहे. मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप अत्यंत सोपे, मर्यादित व माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी ,"त्याबाबतची सविस्तर माहिती" हा भाग वगळता, सुसंगत असे आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मोघम माहिती वगळता उर्वरित माहिती त्यांना देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पाहण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलविणे याचाच अर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एक तर दिनांक २०-०६-२००७ रोजी उपलब्ध असायला हवी किंवा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे खोटे कळविले असण्याची शक्यता आहे. कारण जन माहिती अधिकारी यांनी याच पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती काढून घेऊन ती अपिलार्थीस पुरविण्यास वेळ लागणार आहे असेही म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या या पत्रातील ही दोनही वाक्ये परस्पर विरोधी आहेत. एकाच वेळी माहिती देण्यासाठी वेळ लागणार आहे असे म्हणणे व त्याच वेळी माहिती पाहून जाण्याचे अपिलार्थीस याच पत्रात सूचित करणे हा जन माहिती अधिकारी यांच्या कृतीतील विरोधाभास त्यांनी या पत्रामध्ये अशा परस्पर विरोधी विधानांनी स्पष्ट केला आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००७ रोजीचे पत्र पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर करता आला नाही आणि त्याचबरोबर या पत्रातील वर स्पष्ट केलेला विरोधाभास पाहता, जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २०-०६-२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०३-०७-२००७ रोजी आवश्यक असलेल्या माहितीसाठी उपस्थित राहिल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे हे पाहता, असे सिध्द होते की, अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात स्वत: दिनांक ०३-०७-२००७ रोजी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता उपस्थित राहिले होते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी लेखी स्वरुपात अपिलार्थीस आजपर्यंत त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांच्या कार्यालयामार्फत पाठविली गेली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे हे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील "त्याबाबतची सविस्तर माहिती" ही माहिती अत्यंत मोघम स्वरुपाची असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता आता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कृतीव्दारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची आयुक्त (कृषि) यांना, शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि), पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

- -

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शे. अहेमद शे. उमर (चाउस), रा. मौलाना अ. क. आझाद चौक, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तलाय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९०

निर्णय दिनांक ०३-०३-२००९

१ श्री. दत्तात्रय पांडुरंग अनंतवार, अपिलार्थी
मु. पो. कवाना, तालुका हदगांव,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यानी ३० दिवसाच्या आत सुनावणी न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांना तहसील कार्यालय, हदगांव

- -

यांना रोहयो अंतर्गत किती माल आला व किती वाटप झाला या माहितीची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन २००१ ते २००७ या कालावधीतील, रोहयो अंतर्गत त्यांच्या कार्यालयात एकूण किती माल आला व किती वाटप झाला, रोहयो अंतर्गत कोणत्या दुकानदारांनी किती माल उचलला व कोणत्या कामासंदर्भात वाटप केला या अभिलेख्याशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने अर्ज करतांना त्यामध्ये ते जिल्हा अध्यक्ष अखिल भारतीय गुन्हा अन्वेषण संघटना या संघटनेचे अध्यक्ष असल्याच्या त्यांच्या पदानामाचा उल्लेख केला होता. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देतांना त्यांच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांच्याकडे ते अखिल भारतीय गुन्हा अन्वेषण संघटना, जिल्हा शाखा, नांदेडचे अध्यक्ष असल्याबाबता पुरावा मागितला व अपिलार्थीस त्यांनी सदर पुरावा सादर केल्यानंतर त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यात येईल असे त्यांना आश्वासित केले.

तथापि यापूर्वीच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील विहित मुदतीमध्ये प्रतिसाद न दिल्याने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केल होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-११-२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. याही टप्प्यावर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची मुदत संपण्याची वाट न पाहता, ही मुदत संपण्यापूर्वीच दिनांक २७-११-२००७ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली असल्याचे आयोगास अवगत केले, तथापि सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियामव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १०-०१-२००८ रोजीचे पत्र आयोगास दाखविले. या पत्रामध्ये अपिलार्थीने

- -

त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचा दिनांक २९-०८-२००७ रोजीचा मूळ अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली आहे. मात्र, या घटनाक्रमामध्ये अपिलार्थीच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार जो प्रतिसाद देणे अपेक्षित होते, तशा प्रकारचा प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जरी ते अखिल भारतीय गुन्हा अन्वेषण संघटना, या संघटनेचे जिल्हा अध्यक्ष आहेत, असे नमूद केले असले तरीही अपिलार्थी हे माहिती अधिकाराच्या तरतुदीनुसार माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी हक्क प्राप्त झालेले एक भारतीय नागरिक आहेत. त्यामुळे अपिलार्थीच्या पदनामाचा जन माहिती अधिकारी यांनी कोणताही विचार करण्याचे त्यांना कारण नव्हते. अपिलार्थीचे मूळ नाव व पदनाम या दोन्ही बाबी भिन्न आहेत. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतांना त्यांच्या पदनामाचा उल्लेख करणे देखील आवश्यक नव्हते, तरीही अपिलार्थी यांनी त्यांच्या पदनामाचा उल्लेख केला व जरी अपिलार्थीने त्यांच्या पदनामाचा उल्लेख त्यांच्या अर्जात केला असला तरीही या पदनामाचा व अपिलार्थीस माहिती देण्याचा अर्थाअर्थी कोणताही संबध नव्हता. अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात उल्लेख केलेल्या पदनामाचा जन माहिती अधिकारी यांनी अकारण बाऊ करुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या-कडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन त्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १०-०१-२००८ रोजीचे पत्र पाहता, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जच रद्द करण्याची विनंती केली आहे. या दोनही बाजूंचा एकत्रितपणे विचार केल्यास जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये विनंती केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करणे आयोगास समर्थनीय वाटत नाही.

\- \-

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रय पांडुरंग अनंतवार, मु. पो. कवाना, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७१
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रोहीदास साहेबराव जाधव,<br>रा.मैराळसावंगी, पो.गौंडगाव ता.गंगाखेड,<br>जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>नृसिंह सहकारी साखर कारखाना,<br>लोहगाव, ता.जि.परभणी<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक साखर संचालक,नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: कार्यकारी संचालक,
नृसिंह सहकारी साखर कारखाना,
लोहगाव, ता.जि.परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २९.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यावरही कोणतीही कारवाई न झाल्याने, त्यांना आयोगाकडे द्वितीय अपील सादर करणे भाग पडले.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे **त्यांच्या कारखान्याशी संबंधित २००६-२००७ या कालावधीतील गळीत हंगामात त्यांच्या कारखान्याने किती बिगर सभासदांचा ऊस गाळपासाठी नेला, त्यांची यादी,** ही माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. २४.९.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी दि. २९.६.२००७ रोजी अर्ज करुन आजतागायत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. तसेच जन माहिती अधिकारी हे त्यांच्याकडे ठेवलेल्या दि. २४.९.२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिले त्यामुळे ही सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना त्यांच्या कार्यालयाकडून सादर केला गेला नाही.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ते आता अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. सन २००६-०७ साली त्यांचा साखर कारखाना पूर्णा सहकारी साखर कारखान्याने चालविण्यासाठी ताब्यात घेतला असल्याने सन २००६-०७ साली कोणकोणत्या शेतकऱ्यांचा ऊस गळीत हंगामाकरिता प्राप्त करुन घेतला याची माहिती पूर्णा सहकारी साखर कारखान्याकडे आहे, त्यांच्याकडून ती माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे, अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे व कार्यकारी संचालक, नृसिंह सहकारी साखर कारखाना, लोहगाव ता.जि.परभणी यांनी या प्रकरणात आवश्यक त्या गांभीर्याने कार्यवाही केली नाही. त्यांनी अपिलार्थीच्या दि. २९.६.२००७ रोजीच्या

अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) द्वारे अपेक्षित असलेला प्रतिसाद दिला नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दि. २४.९.२००७ रोजीच्या सुनावणीसाठी देखील ते गैरहजर राहिले. एकंदरीत या सर्व प्रक्रीयेमध्ये अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निष्क्रीय वृत्तीमुळे व इतर कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घकाळ वंचित राहिले, हे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांनी सादर केला नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही करता आली नाही, हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. कारण त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीक अथवा तत्सम अधिकाऱ्यावर त्यांचे प्रशासकीय प्रमुख म्हणून प्रशासकीय नियंत्रण असते, कारखान्यातील प्रत्येक बाबीसंदर्भात प्रशासकीय प्रमुख म्हणून व विशेषतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यकारी संचालक, यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने, माहिती अधिकार अधिनियमानुसार कोणत्याही अर्जदाराच्या प्राप्त झालेल्या अर्जावर तीस दिवसांच्या आत माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची जबाबदारी ही अंतिमतः कार्यकारी संचालक यांची स्वतःची असते, ही बाब येथे लक्षात घेण्यासारखी आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील सर्व संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, व्यवस्थापकीय संचालक,नृसिंह सहकारी साखर कारखाना, लोहगाव ता.जि.परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यांना माहिती देण्यासाठी कारखान्याच्या प्रशासकीय विभागातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी या प्रकरणी कुचराई केली असेल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) व्यवस्थापकीय संचालक,नृसिंह सहकारी साखर कारखाना, लोहगाव ता.जि.परभणी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर कार्यवाही न करणाऱ्या सर्व संबंधितांवर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करुन, आपला अनुपालन अहवाल आयोगास याचा कालावधीमध्ये सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रोहीदास साहेबराव जाधव, रा. मैराळसावंगी, पो.गौंडगाव ता.गंगाखेड,जि.परभणी,

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,नृसिंह सहकारी साखर कारखाना, लोहगाव ता.जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक साखर संचालक,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक,नृसिंह सहकारी साखर कारखाना, लोहगाव ता.जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७२
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

१ श्री. महादेव साहेबराव रावडे, : अपिलार्थी
रा.धोंडराई ता.गेंवराई जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, धोंडराई, ता.गेवराई,
जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गेवराई,जि.बीड

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, गेवराई,जि.बीड

त्रयस्थ पक्षः श्री.कांतराव माधवराव कुलकर्णी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, माहिती अधिकाऱ्याने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज मिळाला नाही व रजिस्टर पोस्टाच्या पावतीवर त्यांची सही नाही, असे खोटे निवेदन केले, जन अपिलीय अधिकारी यांनी चौकशी न करता व खोटया माहितीच्या आधारे निकाल दिला या अभिप्रायसह अपिलार्थी यांनी या अपील

- -

अर्जामध्ये आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे व मुदतीत माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, - **"अर्जदाराच्या दि. ११.६.२००२ रोजी श्री.कांतराव माधवराव कुलकर्णी यांनी अर्जदाराला विक्री केलेल्या घर नं. ११३० च्या खरेदीखताआधारे मालकी रकान्यात का नाव लावले नाही, याचा खुलासा"** ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १०.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणी पूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.७.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळल्यामुळे व तसेच माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थी सुनावणीस गैरहजर राहिले या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचे प्रकरण पुढे चालविण्याची आवश्यकता नाही, अशा अभिप्रायासह नस्तीबंद केले व यासंदर्भात आपले कोणतेही आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला आहे, हे त्यांना गट विकास अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीचे प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवताना अवगत केले व त्यावेळी प्रथमतः त्यांना अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या कथित माहितीची कल्पना आली. त्याबरोबर त्यांनी लागलीच अपिलार्थीस दि १३.७.२००७ रोजी व्यक्तिशः ही माहिती पुरविली.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांचे शेजारी असून, ते त्रयस्थ पक्षाचे राहाते घर, कोणत्याही प्रकारे त्यांना पैसे न देता, त्यांच्यावर विक्रीसाठी दबाव आणत होते. अंतिमतः हा व्यवहार झालेला नाही.

- -

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. १६.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘माहिती’ या शब्दाच्या व्याख्येनुसार 'माहिती' चा विषय होऊ शकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " श्री. कांतराव माधवराव कुलकर्णी यांनी विक्री केलेल्या घर नं.११३० च्या खरेदीखताच्याआधारे मालकी रकान्यात नाव का लावले नाही", याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या एखाद्या कृतीबद्दल त्यांच्याकडून खुलासेवजा माहिती मागणे हे अभिप्रेत नाही, त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमान्वये मागणी केलेली ही माहिती मूळात अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने, अपिलार्थीचा माहितीचा मूळ अर्जच या प्रकरणी अवैध ठरत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली, जन अपिलीय अधिकारी यांनी खोटया माहितीवर आधारीत निर्णय दिला असे म्हटले आहे. तथापि त्यांच्या या अभिप्रायाचे समर्थन करण्यासाठी आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी अर्ज केल्याच्या पुराव्याप्रित्यर्थ जोडलेली झेरॉक्स प्रत ही कोणीही साक्षांकित केलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागविली आहे, ही माहिती उघड झाल्याने व्यापक जनहित साध्य होऊ शकेल, अशातील बाब आयोगास आढळून येत नाही. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महादेव साहेबराव रावडे मु.पो.धोंडराई ता.गेवराई जि.बीड

- -

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, धोंडराई, ता.गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),पंचायत समिती, गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७३
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

१ श्री. शेख गफार शेख हबिब, : अपिलार्थी
रा.किनवट जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी,मांडवी जि.नांदेड.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक,
जंगल कामगार संस्था,किनवट,
जि. नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, - **"जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सन २००७-०८ च्या कालावधीमध्ये झालेल्या कामांबाबत गावनिहाय अंदाजपत्रक, कामाचे, गावाचे नाव, मोजमाप पुस्तकाच्या हजेरीपटाच्या सत्यप्रती इ. माहिती"** - मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः

- -

अपेक्षिली होती व या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.१२.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. १२.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अशाचप्रकारची सन २००६-०७ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली असता, ती त्यांना पूर्णतया देण्यात आली, तथापि या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीचा विचाराधीन मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ते आता पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तिवाद आयोगास मान्य नाही. अपिलार्थीच्या दि. १.११.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १२.१२.२००७ रोजीच्या आदेशान्वये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठीच्या निश्चित कालावधीचा उल्लेख नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर जो युक्तिवाद केला अशाप्रकारचा कोणताही युक्तिवाद त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य वनसंरक्षक,औरंगाबाद यांना संबंधित

- -

जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख गफार शेख हबिब, रा. चिखली बु. ता.किनवट जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,मांडवी जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,जंगल कामगार संस्था,किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य वनसंरक्षक, 'वनभवन', उस्मानपूरा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

- -

कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७४
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

१ श्री. राजु सटवाजी गोडबोले, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,बिलोली,
जि.नांदेड.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, बिलोली,
जि.नांदेड

त्रयस्थ पक्षः १.श्री. अरुण बाबूराव लोकपनवार,
२.मे.व्यंकटेश ट्रेडिंग कंपनी.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २६.९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ४.३.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले. या पत्रामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपिलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

- -

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे, अशी विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, या प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २४७४/०७, दि. १.१०.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजु सटवाजी गोडबोले,रा. 'रामचंद्र निवास', जंगमवाडी, म.न.पा.दवाखान्याजवळ,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७५
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

१ श्री. यादवराव मुकुंदराव नेम्मानीवार, : अपिलार्थी
रा.किनवट, ता.किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद, किनवट,
जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. पी.आर.पत्की,
श्री.बाबूराव ओद्दिवार,
श्री.विजय माने,
श्री. चंद्रकांत दुधारे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३०.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.९.२००७ रोजी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९८०-८१ ते २००७-०८ या कालावधीतील, म.ना.से (वर्तणूक) नियमावली, १९७९ अंतर्गत **"श्री. पी.आर. पत्की,मुख्याधिकारी, नगरपरिषद, किनवट व बाबूराव ओद्दीवार (कार्यालय**

- -

**अधिक्षक,न.प.किनवट), श्री. विजय माने (कनिष्ठ अभियंता,न.प.किनवट), आणि श्री. चंद्रकांत दुधारे (स्वच्छता निरीक्षक,न.प.किनवट) - यांनी सादर केलेल्या मत्ता व दायित्त्व विवरणाची प्रमाणित प्रत, तसेच या कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या नावे न.प. मालमत्ता रजिस्टरला असलेल्या मालमत्तेचे क्रमांक, क्षेत्रफळ व विवरणाची प्रमाणित पत्र "** अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३.८.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, "अपिलार्थीने मागणी केलेली "माहिती" त्यांच्या कार्यालयात तसेच कार्यालयाच्या अभिलेख कक्षात उपलब्ध नसल्याचे व उपलब्ध नसल्यास माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतुद माहिती अधिकाराखाली नाही", असे अपिलार्थीस कळविले. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित अधिकाऱ्याच्या नावाने मालमत्ता रजिस्टरला असलेल्या मिळकत अभिलेखाची माहिती अपिलार्थीस पुरविली, याचबरोबर ही माहिती प्रमाणित करुन हवी असल्यास नक्कल फीकरिता एकूण रु.१५०/- इतके शुल्क भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने हे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले, तथापि याची नेमकी तारीख उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांपैकी कोणीही सांगू शकत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २६.९.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे नमूद करुन त्यांनी ज्या अधिकाऱ्यांविषयी माहिती मागितली आहे, त्या अधिकाऱ्यांनी मोठया प्रमाणात स्वतःची मिळकत गोळा केली आहे, असे आयोगास अवगत केले. तसेच आपल्या युक्तिवादामध्ये आपल्या मागणीचे समर्थन करताना आयोगास असे सांगितले की, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमावली १९७९ नुसार प्रत्येक कर्मचाऱ्यांना शासकीय नोकरीच्या सेवाकाळात दर पाच वर्षांनी त्यांच्या वरिष्ठांकडे मत्ता व दायित्त्व विवरणपत्र दाखल करणे त्यांना अनिवार्य आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी अशाप्रकारचे विवरणपत्र दाखल केले असल्यास त्याची प्रत त्यांना हवी आहे व दाखल केले नसल्यास त्यांनी म.ना.से. (वर्तणूक) नियमावली, १९७९ चा भंग केल्याने त्यांच्यावर संबंधितांकडून कारवाई केली जाणे

- -

अपेक्षित असल्याचे नमूद केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ संदर्भात त्यांनी असा युक्तीवाद केला की, म.ना.सेवेच्या नियमावलीमध्ये स्पष्ट केल्यानुसार, नातेवाईक म्हणजे कर्मचाऱ्याची पत्नी व त्यांचे सज्ञानी मूले, असे अभिप्रेत असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या विशिष्ट अशा नातेवाईकांच्या/कुटुंबियांच्या नावाचा उल्लेख केला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दि. ३.८.२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध करुन न दिल्याने त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या कुटुंबियांशी संबंधित माहिती करिता त्यांना कोणत्या वर्षातील व कोणत्या क्रमांकाच्या मिळकतीची माहिती हवी आहे, याचा उल्लेख केला नसल्यामुळे अपिलार्थीस ते माहिती देऊ शकले नाहीत, मात्र अपिलार्थीने न.प. च्या कार्यालयात येऊन संबंधित अभिलेखाची पाहणी करुन त्यांना आवश्यक असल्यास त्रयस्थ पक्षाच्या कुटुंबियांच्या मिळकतीच्या क्रमांकाची व इतर तपशीलाची माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे विचारलेली माहिती ही अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(१)(ञ) नुसार देय असणार नाही. कोणत्याही त्रयस्थ पक्षाने जमा केलेली त्यांची मिळकत ही त्यांची पूर्णतः खाजगी व वैयक्तिक बाब असून ही माहिती उघड केल्याने कोणतेही सार्वजनिक हित साध्य न होता त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होणार आहे, याची आयोगास खात्री पटली आहे. सार्वजनिक प्राधिकरणाकडे अधिकाऱ्यांच्या मत्ता व दायित्त्व विवरणपत्राच्या माहितीसंदर्भात आयोगाने वेळोवेळी अशाचप्रकारचे निर्णय दिले आहेत. अपिलार्थीने मुद्दा क्र. १ द्वारे मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास नियमाची पूर्तता करुन त्यांच्या माहितीच्या प्रमाणित प्रतींची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, ती अर्जदारास देण्यात यावी, अशी तरतुद आहे. अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये अर्जदारास आवश्यक असलेली माहिती तयार करुन देण्याची तरतुद नाही, हा मुद्दा येथे लक्षात घेण्यासारखा आहे व या मुद्याच्या आधारे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्र. २ द्वारे नगर परिषदेच्या मालमत्ता रजिस्टरमधील त्रयस्थ पक्ष व त्यांच्या कुटुंबियांच्या नावाने असलेला मालमत्तेचा

-

-

तपशील मागितला आहे. मात्र त्रयस्थ पक्षाच्या नातेवाईकांची नावे यामध्ये दिलेली नाहीत, त्यामुळे अपिलार्थीने मुद्दा क्र. २ द्वारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची ठरते व त्यामुळे ती देखील अपिलार्थीस देय असणार नाही. येथे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना जर त्रयस्थ पक्षाच्या मालमत्तेसंदर्भात काही शंका व आक्षेप असतील तर त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठांकडे किंवा इतर सक्षम प्राधिकरणाकडे रितसर तक्रार करावी म्हणजे त्यांना असलेल्या शंकेचे निरसन करुन घेता येईल.

वरील विवेचन पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस मूळात देय होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. यादवराव मुकुंदराव नेम्मानीवार, मु.पो. वेलामपूरा, वॉर्ड क्र. ३, किनवट, ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७६
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

१ श्री. बाबू नामदेव गबाळे, : अपिलार्थी
रा. कंधार, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष भूसंपादन अधिकारी,
पाझर तलाव व सिंचन तलाव,लातूर,
जि.लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
लातूर.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, तसेच या संदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले असता, त्या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय त्यांना कळविला नसल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "पाझर तलाव क्र.८ केकत सिंदगी, ता.जळकोट "- च्या संदर्भात एकूण १२ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने त्यांनी

- -

त्यांच्याकडील दि. ६.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली व उर्वरित माहिती कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर), लातूर यांच्याशी संबंधित असल्याचे अपिलार्थीस कळविले. त्याचबरोबर त्यांनी दि. ६.९.२००७ रोजीच्या वेगळया पत्राद्वारे संबंधित कार्यकारी अभियंता, यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १६.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही निर्णय पारित न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ११ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून लवकरात लवकर प्राप्त व्हावी. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांच्या दि. १६.९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.११.२००७ रोजी घेतलेल्या निर्णयाची प्रत त्यांना दि. १०.१२.२००७ रोजी म्हणजेच आयोगाकडे त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्यानंतर प्राप्त झालेली आहे. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात आले असल्याचे कळविले आहे. त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना बोलाविले नव्हते व इतर मुद्यांवरील माहितीसंदर्भात त्यांचे काहीही म्हणणे नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ११ द्वारे मागणी केलेली माहिती ही मूलतः कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्त),लातूर यांच्या कार्यालयामार्फत तयार केली गेली असल्याने अपिलार्थीस ही माहिती संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडून प्राप्त होणे आवश्यक आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता फक्त त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ११ शी संबंधित माहिती अपेक्षित आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "पाझर तलाव क्र.८(केकत सिंदगी,ता.जळकोट येथे) आपल्या कार्यालयाकडे

- -

मंजूरीसाठी संबंधित कार्यालयाने पाठविलेल्या संपूर्ण प्रस्ताव/अहवालाची सत्यप्रत" - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे कार्यकारी अभियंता यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्रत अपेक्षित असल्याचे येथे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे जरी हा प्रस्ताव मूलतः कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात तयार केला गेला असला तरी, अपिलार्थीने सदर प्रस्ताव ज्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला आहे, त्या स्वरुपात त्यांच्याकडे मागितल्याचे येथे दिसून येते. तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास उद्देशून कार्यकारी अभियंता यांनी पाठविली असल्याने ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातच उपलब्ध असावयास हवी त्यामुळे, ती अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे त्यांना देणे, हे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. कारण या प्रस्तावाप्रमाणेच जन माहिती अधिकारी यांनी भूसंपादनाची कार्यवाही केली असणार, हे उघड आहे. संपादन यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर भूसंपादनाची पुढील सर्व प्रक्रिया आधारित असते, किंबहुना भूसंपादन प्रक्रियेचा संपादन प्राधिकरणाने पाठविलेला प्रस्ताव हा भूसंपादनासंदर्भात केल्या जाणाऱ्या कार्यवाहीचा मूळ पाया असतो, ही बाब कोणीही नाकारु शकत नाही. या सर्व कारणांमुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे, अशाप्रकारे अनिवार्य होते, त्यामुळेच अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना पुरवावी लागेल. जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या यंत्रणेकडून मूलतः तयार केली गेली होती, ती यंत्रणा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार आहे, आयोग अशाप्रकारे अमान्य करीत आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ११ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ७ व ६(३)(एक) प्रमाणे योग्य ती कार्यवाही केली असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १६.९.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.११.२००७ रोजी म्हणजेच, अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर निर्णय दिला आहे. तसेच त्यांनी अपिलार्थीस फक्त अपील खारीज केल्याचा अंतिम निर्णय कळविला आहे. अपिलार्थीस अपील खारीज करण्याच्या निर्णयाप्रत जन अपिलीय

अधिकारी हे का आले, याचा बोध आयोगास जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे व त्यांनी आयोगाकडे सुनावणीसाठी कोणाही प्रतिनिधीस पाठविले नसल्यामुळे झाला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अशाप्रकारचे बेजबाबदार वर्तन इतःपर टाळावे, असे त्यांना येथे सूचित करण्यात येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ११ शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबू नामदेव गबाळे,रा.भवानीनगर, कंधार, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,पाझर तलाव व सिंचन तलाव,लातूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७७
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुंजाजी विठ्ठलराव सोनकांबळे,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, कंधार, जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,नांदेड. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: नायब तहसीलदार, कंधार, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी: तहसीलदार, कंधार,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष: श्री. शेख फारुख शेख उस्मान

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी आयोगास कोणतीही विशिष्ट अशी विनंती न करता त्यांना आवश्यक असलेल्या मूळ अर्जातील माहितीचा उल्लेख केलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जात प्रमाणपत्रासंदर्भात ९० ते ९७ या कालावधीपैकी काही विविध कालावधीमधील माहिती एकूण सहा मुद्याद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी एकूण २ मुद्यांवर माहिती अपिलार्थीस देऊ केली व याकरिता अपिलार्थीस एकूण रु.१०२४/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे

- -

भरण्याचे सूचित केले. या प्रकरणी अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ७.८.२००७ रोजी केला. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज अपिलार्थीने अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना उद्देशून केला होता. त्यांनी तो अर्ज दि. १३.९.२००७ रोजी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कंधार यांच्याकडे पाठविला. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे निर्णय देण्यात आला नसल्याचे त्यांच्याकडून आज रोजी आयोगास अवगत करण्यात आले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप, व्याप्ती व माहितीचा संबंधित कालावधी पाहता, या घटनाक्रमामध्ये आयोगास या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे आवश्यक वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १०.०९.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, याच कालावधीमध्ये या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत. सुनावणीची नोटीस अपिलार्थीस किमान दहा दिवस अगोदर प्राप्त होईल, अशी जन अपिलीय अधिकारी यांनी व्यवस्था करावी. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१०.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

- -

**दिनांक : ०४-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुंजाजी विठ्ठलराव सोनकांबळे,रा.राजा मिलींद निवास, कैलासनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७८
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

१ श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे, : अपिलार्थी
रा.अंतरवली राठी, ता.घनसावंगी जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक निबंधक सहकारी संस्था,
अंबड, जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,जालना

त्रयस्थ पक्षः श्री. नारायण श्रीमंतराव मुंढे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगाकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने विचाराधीन अपिलाप्रमाणे तंतोतंत तसेच अपील आयोगाकडे दि. ४.१२.२००७ रोजी स्वतंत्रपणे सादर केले होते. या अपील अर्जावर आयोगाने सुनावणी घेऊन दि. ६.२.२००९ रोजी निर्णय दिला आहे. अपिलार्थीने एकाच विषयावर एकाच माहितीसाठी आयोगाकडे अशाप्रकारची दोन स्वतंत्र अपिले दाखल केल्याचे दिसून येत आहे. यापैकी एका अपिलावर आयोगाचा निर्णय झाला असल्याने अपिलार्थीच्या आजच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने निर्णय देण्याचे आयोगास आवश्यक वाटत नाही.

- -

सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील २४७८/०७, दि. ८.११.२००७खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे,रा.अंतरवली राठी, ता.घनसावंगी जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था,अंबड जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८७
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विठ्ठल बालाजीराव जटाळे,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>समाज कल्याण कार्यालय,<br>जिल्हा परिषद, नांदेड<br>२ जन अपिलीय अधिकारी<br>समाज कल्याण कार्यालय,<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३०.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलाच्या निकालाची प्रत प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन, त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **"उदयगिरी मित्रमंडळ संचलित निवासी अपंग विद्यालय, कौडा तसेच तुळजा भवानी निवासी अपंग शाळा या दोन शाळा कोणत्या कारणाने, कोणत्या नियमानुसार व कोणत्या तारखेपासून स्थलांतरित केल्या "-** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

- -

अपिलार्थीच्या या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, मात्र मुख्याध्यापक, निवासी अपंग विद्यालय,कौठा यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती समाज कल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, नांदेड यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्याकडील दि. ३०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविली असून या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केलेली आहे. याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, मात्र मुख्याध्यापकाकडून आलेल्या पत्रातील माहिती दिशाभूल करणारी,चुकीची व अर्धवट आहे, असे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. २.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१.७.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी प्रत्यक्षात झाली किंवा कसे, जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात आपले आदेश पारित केले किंवा कसे, हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दूरध्वनीद्वारे दि. २७.२.२००९ रोजी दुपारी १२.५० वाजता,श्री. इंदूरकर, विस्तार अधिकारी यांच्यामार्फत सुनावणीबाबत कळवूनही जन माहिती व अपिलीय अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सुनावणीस आयोगाच्या पूर्वपरवागीशिवाय का गैरहजर राहिले, याची सखोल चौकशी करुन संबंधितावर आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करावी.

सुनावणीच्या या टप्प्यावर आयोगास अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दि. ०२.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,या संदर्भातील आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी हे अधिनियमातील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार, त्यांना सदर निर्णय प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०२.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,या संदर्भातील आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल बालाजीराव जटाळे, मु.वसरणी पो. सिडको, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८९
निर्णय दिनांक ०४-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अविनाश वानखेडे,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो),<br>जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,<br>नांदेड. | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी कोणतीही विशेष अशा प्रकारची विनंती आयोगास न करता त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील त्यांनी दिला असून या अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांना आदेशित करुनही त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोव्हेंबर २००६ ते ३१ जुलै, २००७ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित महाराष्ट्र ग्रामीण रोजगार

- -

हमी योजनेशी संबंधित माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२३२/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १.९.२००७ रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती सशुल्क प्राप्त करुन घेतली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ६.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.९.२००७ रोजी आपला निर्णय देऊन या निर्णयाद्वारे अपिलार्थीस दि. २८.९.२००७ पर्यंत संपूर्ण माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित कामाविषयी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ते प्रथमतः अपिलार्थीस ही माहिती पूर्णतया पुरवू शकले नाहीत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यासंदर्भातील माहिती त्यांनी वन विभागाकडून गोळा करुन घेऊन ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन देखील ते स्वतः ही उर्वरित माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. ३ व ४ ची वन विभागाशी संबंधित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी वन विभागाला दि. २७.८ व २८.९.२००७ रोजी स्मरणपत्र देऊन विशेष प्रयत्न करुन त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेतली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी संबंधित माहिती तयार करुन ठेवली व त्यांनी अपिलार्थीची माहिती हस्तगत करुन घेऊन जाण्यासाठी वाट पाहिली. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. त्यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण तीन वेळा प्रयत्न केला. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये तसेच अपील अर्जामध्ये वेगवेगळे व मोघम स्वरुपात पत्ते दिले असल्याने त्यांच्या माहितीची तामिली अपिलार्थीस होऊ शकली नाही. अंतिमतः त्यांनी

- -

अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपील अर्जामध्ये दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली असता, यावेळी देखील अपिलार्थी हे सदर पत्त्यावर राहत नसल्याचे त्यांना आढळून आले आहे. या अपिलार्थीच्या निवासासंदर्भात खात्री करुन घेण्यासाठी त्यांनी प्रतिभा निकेतन शाळेसमोर,कैलासनगर नांदेड येथील सरस्वती बिल्डींगचे घरमालक श्री.पत्की यांच्याशी संपर्क साधला असता श्री. पत्की यांनी गेल्या दहा वर्षात 'अविनाश वानखेडे'नावाचा कोणीही भाडेकरु त्यांच्याकडे निवासासाठी नव्हता, असे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना लेखी दिले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून अपिलार्थीने मागणी केल्यास ही माहिती ते अपिलार्थीस तात्काळ देण्यास तयार आहेत. त्यांच्या या विधानाच्यापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीच्या रजिस्टर्ड पोस्टाच्या पाकीटाची प्रत आयोगास दाखविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी, त्यांनी आपले पत्ते वेळोवेळी बदलल्याने व तसेच माहितीची व्यक्तिशः मागणी करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वेळेत उपस्थित न राहिल्याने, अपिलार्थी हेच या प्रकरणी त्यांना माहिती प्राप्त न होण्यासाठी जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांनी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून होणारी पुढील कार्यवाही ज्ञात होण्यासाठी अर्जदारांने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून माहिती हस्तगत करुन घेण्याची जबाबदारी नीटपणे पार न पाडल्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी तेच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे व अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत, त्यांना सदरचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसांच्या आत वन विभागाकडे पाठविणे गरजेचे होते, तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीचा अर्ज वन विभागाकडे न पाठविता, अपिलार्थीस स्वतः माहिती देण्यासाठी प्रयत्न केला, ही त्यांची कृती चुकीची असून इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन  खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :   ०४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश वानखेडे, प्रतिभा निकेतन शाळेसमोर, 'सरस्वती' बिल्डींग, कैलासनगर,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३२

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, अपिलार्थी

व्दारा - कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळी

वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

संशोधन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

संशोधन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव, (संशोधन विभाग) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १ श्रीमती निलिमा पांडे

२ श्री. राम बाहेती

**निर्णय**

- -

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावरुन अपिलार्थीस त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा प्रथम अपिलावर दिलेला निर्णय मान्य नसल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत प्राध्यापकांच्या समकक्षते-संदर्भात काही माहिती पोस्टाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन घेऊन जाण्याचे सूचित केले.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज संशोधन विभागाला उद्देशून केला होता, तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण पाच मुद्दयापैकी चार मुद्दे शैक्षणिक विभागाशी संबंधीत असल्याने संशोधन विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत शैक्षणिक विभागाला दिनांक ३१-०५-२००७ रोजी पाठविली. याचबरोबरच त्यांनी त्यांच्या विभागाशी संबंधीत माहितीही विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे पाठविली. तदनंतर शैक्षणिक विभागाने अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती शैक्षणिक विभागाच्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात येऊन घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या

निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही ठोस निर्णय न देता "अपिलार्थीने सादर केलेली सर्व आवश्यक ती कागदपत्रे सामाजिकशास्त्रे अधिष्ठाता यांना पुनःश्च सादर करुन अधिष्ठाता यांच्या अभिप्रायानुसार स्थानिक मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल करावा असे ठरले" असे अभिप्राय दिले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी संशोधन विभाग व जन माहिती अधिकारी शैक्षणिक विभाग अशा दोन स्वतंत्र जन माहिती अधिका-यांशी संबंधीत आहे. यापैकी जन माहिती अधिकारी, संशोधन विभाग यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना दिनांक २५-०५-२००७ रोजी त्यांना प्राप्त झाल्यानंतर दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी, शैक्षणिक विभाग यांना पुरविली व अपिलार्थीच्या अर्जाची प्रत याच पत्राबरोबर त्यांनी शैक्षणिक विभागाकडे पाठवून दिली.

जन माहिती अधिकारी, शैक्षणिक विभाग यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्या विभागाशी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०७-२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडून मागणी केलेली माहिती वेगवेगळ्या विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३०-०७-२००७, १८-०८-२००७, ०७-०८-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि दिनांक ३०-०७-२००७ व १८-०८-२००७ च्या सुनावणीसाठी अपिलार्थी हे उपस्थित राहिले नाहीत व दिनांक ०७-०८-२००७ च्या सुनावणीमध्ये उपस्थित राहून सुनावणी चालू असतांना निघून गेले.

या प्रकरणाची पार्श्वभूमी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केली. त्यामध्ये त्यांनी आयोगास अशी माहिती दिली की, अपिलार्थी हे एम. ए. समाजशास्त्र ही परीक्षा उत्तीर्ण असून त्यांनी अधिव्याख्याता पदाकरिता किमान आवश्यक पात्रता धारण न केल्यामुळे त्यांना समाजशास्त्र या विषयाकरिता अधिव्याख्याता म्हणून प्रचलीत नियमाप्रमाणे मान्यता देता येत नाही. अपिलार्थी ही मान्यता मिळविण्याकरिता माहिती अधिकार अधिनियमाचा वेगवेगळ्या प्रकारे वापर करुन त्यांच्याकडे याच विषयासंदर्भात वारंवार

- -

माहिती मागवित आहेत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या कडील दिनांक ०७-०८-२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी विद्यापीठाच्या कर्मचा-यांना शिवीगाळ करुन सुनावणी पूर्ण होण्याआधीच अपिलार्थी निघून गेले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस शैक्षणिक विभागाच्या जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती दिनांक २३-०७-२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधीत माहिती योग्य प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिली गेली नसल्याचे दिसून येत आहे. समकक्षतेच्या संदर्भात आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, प्राध्यापकांना समकक्षता देण्यासाठी संबंधीत शाखेच्या अधिष्ठातांना महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या तरतुदीनुसार प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात त्यांनी प्राचार्य, सामाजिक कार्य महाविद्यालय यांच्याकडून जशी माहिती आली तशी अपिलार्थीस पुरविली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये श्री. बाहेती व श्रीमती पांडे यांच्या वैयक्तीक सेवामान्यतेच्या आदेशाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. तथापि ह्या सत्यप्रती विद्यापीठाकडे उपलब्ध नसून सर्वसाधारण परिस्थितीत ही माहिती प्राचार्य, सामाजिक कार्य महाविद्यालय यांच्याकडे उपलब्ध असावयास हवी. ह्या प्रती अपिलार्थीस संबंधीत प्राचार्याकडून उपलब्ध करुन दिल्या गेल्या नसल्याचे दिसून येते. सबब, या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी प्राचार्य, सामाजिक कार्य महाविद्यालय, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाठवून ३० दिवसाच्या आत श्री. बाहेती व श्रीमती पांडे यांच्या सेवा मान्यतेच्या प्रती अपिलार्थीस परस्पर पाठविण्याची सूचना करावी व प्राचार्य ही माहिती या कालावधीमध्ये अपिलार्थीस पुरवतील असे पहावे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील ज्या तरतुदीन्वये संबंधीत शाखेच्या अधिष्ठातांना समकक्षता ठरविण्याचे अधिकार दिले गेले आहेत, त्या तरतुदीच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस त्यांच्या या मुद्दयांवरील माहिती प्राप्त होईल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली पाचही मुद्दयावरील काही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणारी आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास माहिती अधिकार

- -

अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी घेतलेल्या निर्णयाची कारणे, स्पष्टीकरण अथवा खुलासा अशा स्वरुपाची माहिती मागणे अनुज्ञेय नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती वेगवेगळ्या विभागांशी संबंधीत आहे, त्यामुळे अपिलार्थीने ज्या प्राधिकरणास उद्देशून माहितीसाठीचा अर्ज केला आहे त्या प्राधिकरणाने अपिलार्थीच्या अर्जाच्या प्रती, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधीत आहे त्यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदी प्रमाणे त्यांना पाठविणे व त्या पत्रांच्या प्रती अपिलार्थीस पाठविणे अपेक्षित होते, तथापि अशा प्रकारची कारवाई जन माहिती अधिकारी यांनी न केल्यामुळे अंतीमतः अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

- -

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा - कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, (संशोधन विभाग) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३३

निर्णय दिनांक   ०६-०३-२००९

१    श्री. देशमुख हनुमंत वसंतराव,    अपिलार्थी
व्दारा - कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळी
वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१    जन माहिती अधिकारी
तथा विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग,    डॉ.
बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२    जन अपिलीय अधिकारी    प्रतिवादी
समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः    जन अपिलीय अधिकारी    :    संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष    :    १    श्रीमती निलीमा पांडे
२    श्री. राम बाहेती

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

-    -

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी दाखल झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संगनमत करुन त्यांच्या चुकांवर पांघरुन घालून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला नाही. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही म्हटले आहे की, येथून पुढे ज्या ज्या प्रथम अपील सुनावण्या होतील त्यावर अपिलार्थी हे बहिष्कार टाकून अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेत आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अशा प्रकारे वेगवेगळे आरोप केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये समाजशास्त्र विभागाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत एकूण सहा वेगवेगळ्या मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी (शैक्षणिक विभाग) यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयीन वेळेमध्ये त्यांच्याकडून घेण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे कारवाई न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-८-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी अथवा निर्णय झाला नाही असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास आज रोजी अवगत केले आहे.

जन माहिती अधिकारी समाजशास्त्र विभाग यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी समाजशास्त्र विभागाऐवजी जन माहिती अधिकारी शैक्षणिक विभाग यांनी माहिती दिली हे पाहता अपिलार्थीच्या या अपील अर्जावर या प्रकरणी, या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत प्रथम सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०६-२००७

-                                   -

रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत त्यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस सदर निर्णय मान्य नसल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश त्यांना प्राप्त झ ााल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २८-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक ०६-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा - कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३४

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. श्रीकृष्ण एल. देशपांडे, अपिलार्थी
३८, सोनी महाल, महावीर हौसिंग सोसायटी,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी, जिल्हा
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०४-०३-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे अशी अपिलार्थीने विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे सादर केलेले आज रोजीचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २४३४/२००७, दिनांक १७-१२-२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

-                                                            -

**आदेश**

१. अपील क्रमांक २४३४/२००७, दिनांक १७-१२-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. श्रीकृष्ण एल. देशपांडे, ३८, सोनी महाल, महावीर हौसिंग सोसायटी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३५

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. मोहंमद अन्वरउल्लाह खान, अपिलार्थी
९-४-४५५, कय्यूम प्लॉटस्
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता (यांत्रिकी),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (प्रशासन),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा कोणताही निर्णय दिला नाही, मात्र जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयातील लिपिकाने त्यांना दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती दिली असून ही माहिती अपूर्ण असल्याने त्यांनी विचाराधीन व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी दिनांक ०३-१०-२००३ व दिनांक २५-०५-२००५ नंतर खरेदी केलेल्या वाहनासंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **वाहन खरेदीच्या ठरावाच्या प्रती, खरेदी केलेल्या वाहनाची यादी, मॉडेल, निविदा निधीची झेरॉक्स प्रत, खरेदी केलेल्या वाहनाची पावती, खरेदीप्रीत्यर्थ सादर करण्यात आलेल्या देयकाच्या प्रती, देयकाची रक्कम आणि धनादेशाचा क्रमांक व ज्या अधिकारी व पदाधिका-याकरिता गाडी खरेदी केली त्यांचे नांव** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती साक्षांकीत स्वरुपात व व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे नियमाप्रमाणे शुल्क भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दिनांक २६-०४-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वीस रुपये इतक्या शुल्काचा त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी भरणा केला. तथापि मुदत टळून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस, दिनांक २५-०५-२००७ रोजी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील लिपिकामार्फत माहिती प्राप्त झाली. तथापि सदर माहिती विलंबाने प्राप्त झाल्याने व प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित आहेत. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलातील अभिप्रायाप्रमाणे युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वेळोवेळी मागणी करतात असे आयोगासमोर स्पष्ट केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत देण्याचे त्यांनी आयोगास आश्वासित केले.

-　　-

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या अर्जास या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमावदारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या दिनांक २०-०४-२००७ च्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस हा दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. कारण जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित किती शुल्क भरावयाचे आहे याचा तपशील त्यांनी या पत्रामध्ये दिलेला नाही. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त नियमानुसार शुल्क भरण्याची विनंती केली आहे. अशा प्रकारचा प्रतिसाद अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीशी विसंगत आहे. अपिलार्थीने दिनांक २६-०४-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क भरले असतांना या प्रकरणी अपिलार्थीस दिनांक २५-०५-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. अशा प्रकारे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी २३ दिवसांचा विलंब लावल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, सन २००३ मध्ये खरेदी करण्यात आलेली मारोती, बलेनो कारची मूळ संचिका डी. सी. बिलाचे धनादेशास्तव लेखा विभागात प्रलंबीत आहे. त्यामुळे या कारच्या बाबत मागितलेली माहिती देण्यासाठी आठ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. असे नमूद करुनही ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्रामध्ये उर्वरित माहिती आठ दिवसाच्या आत देण्यासाठी दिलेले आश्वासन देखील पाळले नाही. वास्तविक अपिलार्थीच्या दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली असती तर कदाचित अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करण्याची गरज पडली नसती. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल न घेता व या अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. सबब आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिली असल्याने व तसेच जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २०-०४-२००७ रोजीचे पत्र वर उल्लेखिलेल्या कारणामुळे अवैध

ठरत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून घेतलेले माहितीपोटीचे शुल्क रुपये वीस त्यांना आता परत करावे लागेल. तसेच अपिलार्थीस अद्यापपर्यंत द्यावयाची त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती देखील अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाच्या समर्थनार्थ आज रोजी जन माहिती अधिकारी हे त्यांना आयोगाने पूर्ण संधी देऊनही काहीही उत्तर देऊ शकले नाहीत हे पाहता, जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी निःसंशयपणे पात्र ठरत आहेत अशी आयोगाची खात्री झाली आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या २३ दिवसाच्या विलंबाबाबत त्यांना प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये ५७५० /- (अक्षरी रुपये पाच हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये वीस इतके अपिलार्थीस याच आठ दिवसामध्ये परत करावे.

४. जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये ५७५० /- (अक्षरी रुपये पाच हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

- -

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरउल्लाह खान, ९-४-४५५, कय्यूम प्लॉटस्, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (यांत्रिकी), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४७९

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. गौतम खंडू कांबळे, अपिलार्थी

मु. पो. ईस्लापूर, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तांत्रिक कृषि अधिकारी,

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत कामांची सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८५६ इतके शासकीय कोषागारात भरणा करुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-११-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीच्या अभिप्रायासह त्यांची पोचसही असलेल्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः मागितली. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता ते कधीही उपस्थित राहिले नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, ही बाब तसेच अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या लागणा-या शुल्काची कल्पना त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत व विहित पध्दतीने देऊनही जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केला नाही व अंतीमत: अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००७ रोजी विनामूल्य माहिती दिली आहे. सदर माहितीच्या दर्जाविषयी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

- -

औरंगाबाद　　　　　　　　　　　　　　　( वि. बा. बोरगे )

दिनांक　　०६-०३-२००९　　　　　　　　राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१　श्री. गौतम खंडू कांबळे, मु. पो. ईस्लापूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२　जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३　जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४　निर्णय नस्ती.

-　　　　　　　　　　-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५८५

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. पठाण रहमत समिउल्ला, अपिलार्थी
पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा प्रादेशिक व्यवस्थापक, जागतिक खाद्य कार्यक्रम व
वनिकरण प्रदेश, नागपूर

त्रयस्थ पक्ष : श्री. टी. एच. चौधरी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, किनवट यांनी त्यांना चुकीची माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी तथा

- -

प्रादेशिक व्यवस्थापक, जागतिक खाद्य कार्यक्रम व वनिकरण प्रदेश, नागपूर यांनी चुकीची माहिती बरोबर असल्याची पुष्टी दिल्याने त्यांनी हा अपील अर्ज आयोगाकडे सादर केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनाच्या पदनामाबाबत किमान वेतन अधिनियम १९४८ अधिसूचना दिनांक ०२-०७-२००३ अन्वये कुशल कर्मचा-याचे वेतन २१०० रुपये इतके देण्यात येते. कुशल कर्मचा-याच्या अनुसूचीमध्ये एकूण ३३ नियमित आस्थापनेवरील पदे आहेत. त्यापैकी कार्यालयाशी संबंधीत लिपीक व टंकलेखक अशी दोन पदे व अपिलार्थी हे कार्यालयातील काम करीत असल्यामुळे त्यांना देण्यात येत असलेले वेतन हे या दोन पदापैकी कोणत्या पदाचे आहे याबाबतची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कुशल कर्मचा-याचे वेतन अदा करण्यात येत असल्याचे कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०७-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस त्यांना लिपीक किंवा टंकलेखक यापैकी कोणत्याही पदाचे वेतन दिले जात नाही, असे कळविले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून असे अवगत केले गेले की, अपिलार्थी हे वन विभागामध्ये १९८६ सालापासून कुशल कामगाराच्या दराने वन विभागाच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन मदतनीस म्हणून काम करीत आहेत. अपिलार्थी ज्या वेळेस नोकरीला लागले त्यावेळी कामगाराचे कुशल, अर्धकुशल जड काम व अर्धकुशल हलके काम असे तीन प्रवर्ग अस्तित्वात होते. तथापि २००३ साली किमान दरात सुधारणा होऊन मजुरांच्या पदाचे निश्चित असे वर्गीकरण करण्यात आले. नवीन वर्गीकरण करुन दिलेल्या पदामध्ये अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात ज्या स्वरुपाचे काम करीत आहेत त्या पदाचा समावेश नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस त्यांच्या सध्या कार्यरत असलेल्या पदाचे लिपीक किंवा टंकलेखक यापैकी एका प्रवर्गातील पदाचे नाव निश्चित करुन हवे असल्याचे दिसून येते.

- -

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, सदरचा प्रश्न आता मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत असून औद्योगिक न्यायालयाने अपिलार्थी यांच्या बाजूने दिलेल्या निकालास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कक्षेमधून या प्रश्नाकडे पाहिल्यास असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार आपला निर्णय दिलेला आहे. येथे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या मूळ गा-हाण्याचे निराकरण करण्यासाठी वन विभागाच्या अथवा कामगार विभागाच्या संबंधीत प्राधिकरणाकडे आपली तक्रार करुन आपल्या गा-हाण्याचा निपटारा करुन घ्यावा. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचे कर्तव्य पार पाडल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत व ही माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्या स्वरुपात दिली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पठाण रहमत समिउल्ला, पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, एफ. डी. सी. एम.

- -

किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, जा. खा. का. व वनिकरण प्रदेश, नागपूर, प्लॉट नंबर १२, रावल प्लॉझा, कडबी चौक, कामठी रोड, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२८ (सुधारित सिआर २५८६)

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. गजानन दादाराव बरडे, अपिलार्थी
शिवाजीनगर, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा प्रादेशिक व्यवस्थापक, जा. खा. का. व वनिकरण
प्रदेश, नागपूर

त्रयस्थ पक्ष : श्री. टी. एच. चौधरी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, किनवट यांनी त्यांना चुकीची माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी तथा

- -

प्रादेशिक व्यवस्थापक, जागतिक खाद्य कार्यक्रम व वनिकरण प्रदेश, नागपूर यांनी चुकीची माहिती बरोबर असल्याची पुष्टी दिल्याने त्यांनी हा अपील अर्ज आयोगाकडे सादर केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनाच्या पदनामाबाबत किमान वेतन अधिनियम १९४८ अधिसूचना दिनांक ०२-०७-२००३ अन्वये कुशल कर्मचा-याचे वेतन २१०० रुपये इतके देण्यात येते, कुशल कर्मचा-याच्या अनुसूचीमध्ये एकूण ३३ नियमित आस्थापनेवरील पदे आहेत. त्यापैकी कार्यालयाशी संबंधीत लिपीक व टंकलेखक अशी दोन पदे व अपिलार्थी हे कार्यालयातील काम करीत असल्यामुळे त्यांना देण्यात येत असलेले वेतन हे या दोन पदापैकी कोणत्या पदाचे आहे याबाबतची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कुशल कर्मचा-याचे वेतन अदा करण्यात येत असल्याचे कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०७-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस त्यांना लिपीक किंवा टंकलेखक यापैकी कोणत्याही पदाचे वेतन दिले जात नाही, असे कळविले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून असे अवगत केले गेले की, अपिलार्थी हे वन विभागामध्ये १९८६ सालापासून कुशल कामगाराच्या दराने वन विभागाच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन मदतनीस म्हणून काम करीत आहेत. अपिलार्थी ज्या वेळेस नोकरीला लागले त्यावेळी कामगाराचे कुशल, अर्धकुशल जड काम व अर्धकुशल हलके काम असे तीन प्रवर्ग अस्तित्वात होते. तथापि २००३ साली किमान दरात सुधारणा होऊन मजुरांच्या पदाचे निश्चित असे वर्गीकरण करण्यात आले. नवीन वर्गीकरण करुन दिलेल्या पदामध्ये अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात ज्या स्वरुपाचे काम करीत आहेत त्या पदाचा समावेश नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस त्यांच्या सध्या कार्यरत असलेल्या पदाचे लिपीक किंवा टंकलेखक यापैकी एका प्रवर्गातील पदाचे नाव निश्चित करुन हवे असल्याचे दिसून येते.

\-                                        -

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, सदरचा प्रश्न आता मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत असून औद्योगिक न्यायालयाने अपिलार्थी यांच्या बाजूने दिलेल्या निकालास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कक्षेमधून या प्रश्नाकडे पाहिल्यास असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार आपला निर्णय दिलेला आहे. येथे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या मूळ गा-हाण्याचे निराकरण करण्यासाठी वन विभागाच्या अथवा कामगार विभागाच्या संबंधीत प्राधिकरणाकडे आपली तक्रार करुन आपल्या गा-हाण्याचा, निपटारा करुन घ्यावा. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचे कर्तव्य पार पाडल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत व ही माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्या स्वरुपात दिली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन दादाराव बरडे, शिवाजीनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, एफ. डी. सी. एम. किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

- -

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, जा. खा. का. व वनिकरण प्रदेश, नागपूर, प्लॉट नंबर १२, रावल प्लॉझा, कडबी चौक, कामठी रोड, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२९ (सुधारित सिआर २५८७)

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. पडलवार ज्ञानेश्वर गंगाराम, अपिलार्थी
व्दारा - मातोश्री फोटो स्टुडिओ, शिवाजीनगर, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, मुखेड, तालुका
मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, खोटी व बनावट स्वरुपाची माहिती दिली व त्यांना माहिती देण्यासाठी जाणुनबुजून विलंब लावल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता प्रकरण निकाली काढल्यामुळे त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील करणे भाग पडले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च

- -

२००३ ते मार्च २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन तसा पुरावा देखील त्यांनी या अर्जासोबत जोडला होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७५ इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर अपिलार्थीने दिनांक ०७-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना परत पत्र लिहिले व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याने त्यांना शुल्काचा भरणा करण्याचे अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न इ ााल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. मात्र यासंदर्भात त्यांनी दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या कार्यालयीन पत्राव्दारे अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००७ रोजी मुद्देनिहाय माहिती पुरविली. तथापि याही माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाली आहे, तथापि प्राप्त झालेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून शेती मोजणी व हद्दबंदी अर्जाच्या झेरॉक्स प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाहीत. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मोजणीच्या दिनांकाबाबतच्या मुद्दयाचा या प्राप्त माहितीमध्ये समावेश नाही. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी आतापर्यंत दिनांक १४-०९-२००७ व दिनांक १८-१०-२००७ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थी यांच्या युक्तिवादामध्ये मांडलेल्या मुद्दयाशी ते सहमत आहेत. अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता.

-                    -

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीकडून त्यांच्या दिनांक ०७-०७-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत यासंदर्भात वैध पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला होता. तथापि या पुराव्याकडे दुर्लक्ष करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्रास उत्तर देऊन अपिलार्थीने त्यांना दिनांक ०७-०८-२००७ रोजी त्यांची चूक लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०९-२००७ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातर्फे मोजणी केल्याचा दिनांक त्यामध्ये दर्शविला नसल्याचे दिसून येते. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेल्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००७ रोजी दिलेली माहिती पाहता, यामध्ये देखील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या "दिनांक" या मुद्दयाचा समावेश नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आतापर्यंत दोन टप्प्यामध्ये दिनांक १४-०९-२००७ व दिनांक १८-१०-२००७ रोजी माहिती पुरविली गेली आहे. तथापि अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे मोजणीचे दिनांक व अर्जदारांनी केलेल्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती या दिलेल्या माहितीमध्ये समाविष्ट नाहीत, ही बाब येथे या प्रकरणी सप्रमाण सिध्द होत आहे. अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिका-याकडे माहिती मागितली होती ते जन माहिती अधिकारी सध्या तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, मुखेड या पदावर कार्यरत नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी सुरुवातीस दिनांक ०३-०८-२००७ रोजीचे दिशाभूल करणारे पत्र का लिहिले याबद्दल उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगासमोर कोणताही खुलासा करु शकत नाहीत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०७-०७-२००७ रोजी माहिती मागितली असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२००७ रोजी अगर तत्पूर्वी या अर्जासंदर्भातील आपला निर्णय कळविणे अथवा अपिलार्थीस माहिती देणे अधिनियामतील कलम ७ (१) नुसार त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय ३९ इतके दिवस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले असल्याचे येथे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या

- -

अभावाबद्दल जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपर्यंत न दिलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दामहून चुकीची माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व विलंबाने माहिती दिल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे व त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याचे आयोग आदेशित करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख मुखेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पडलवार ज्ञानेश्वर गंगाराम, व्दारा - मातोश्री फोटो स्टुडिओ, शिवाजीनगर, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

- -

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवनासमोर, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३० (सुधारित सिआर २५८८)

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. भिकाजी शेषराव घुगे, अपिलार्थी
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत संपूर्ण माहिती न दिल्याने त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

- -

हिंगोली जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत शासनाकडून प्राप्त व वाटप झालेल्या धान्य कोठ्यासंदर्भात व यासंदर्भात झालेल्या चौकशी अहवालाच्या प्रतींची मागणी एकूण तीन मुद्दयाव्दारे केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथमतः प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि यापूर्वीच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०८-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती दिनांक २८-०८-२००७ पूर्वी देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एकूण तीन मुद्दयापैकी त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत मुद्दा क्रमांक १ ची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०८-२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने ती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही. आज रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक २३-०८-२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती कोणाकडे उपलब्ध होईल याबाबतचा तपशील दिनांक २८-०८-२००७ पूर्वी अपिलार्थीस कळविण्याचे आदेशित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती तर मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत

- -

माहिती जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या कार्यालयाशी संबंधीत होती, त्यामुळे या प्रकरणी या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार कारवाई करणे गरजेचे होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांनी सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसाच्या आत जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे यावेळी त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली नाही, त्यामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः सुसंगत असल्याने तसेच ही माहिती मागण्याचा अपिलार्थीचा अधिनियमातील कलम ३ प्रमाणे हक्क असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमातील कलम ६ (३) (एक) व ७ (१) प्रमाणे प्रतिसाद देणे भाग होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अपिलार्थीस ती माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २५-०५-२००७ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे भाग होते, ती माहिती अपिलार्थीस अंशतः दिनांक २१-०८-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. तर उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असून ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास ते तयार असल्याचे त्यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) व ६ (३) (एक) चा भंग केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी पात्र ठरत आहेत. सबब सचिव (महसूल) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

- -

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०६-०३-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भिकाजी शेषराव घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३१ (सुधारित सिआर २५८९)

निर्णय दिनांक ०६-०३-२००९

१ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, अपिलार्थी
४३ "दिपज्योती" उल्हासनगर, मालेगाव रोड,
तरोडा (खु.), नांदेड - ०५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : १ श्री. हरिकिशन राधेशाम
२ श्री. सुरेंद्र तोष्णीवाल

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक २४-०८-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील अर्ज केला असता त्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुध्दा माहिती देण्यास जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **सेलू तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. हरकिशन राधेश्याम व श्री. सुरेंद्र तोष्णीवाल यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलचे वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती, पुरवठा निरीक्षक यांच्याकडून तपासणी केलेल्या मासिक तपासणी अहवालाच्या सत्यप्रती आणि शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेल टँकरच्या पोच पावत्यांच्या सत्यप्रती** - ही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सदर माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या अपील अर्जाव्दारे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने अर्ज पाठविल्याचा व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने अपील अर्ज सादर केल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीचे दिनांक २४-०८-२००७ रोजीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सेलू यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश जारी करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या

तरतुदीनुसार सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्या-पासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, ४३ "दिपज्योती" उल्हासनगर, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड - ०५.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत दिनांक २४-०८-२००७ च्या प्रथम अपील अर्जाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८२
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

१ श्री. नागनाथ राचय्या स्वामी, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१,औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १५.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती पुरविण्यासाठी जी अक्षम्य दिरंगाई झाली आहे, त्याबद्दल माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ऑगस्ट २००६ या कालावधीमधील माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१) व (९) नुसार ठराविक नमुन्यात कर्मचाऱ्यांची माहिती माहे ८/२००६, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून

- -

दरमहा वैधता प्रमाणपत्र देण्याचे सरासरी प्रमाण किती आहे व दै.सामना दि. १४.९.२००६ च्या पृष्ठ ७ वरील बातमीसंदर्भातील वस्तुस्थिती, या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ८.१०.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी त्यांच्याकडे केली, त्यावेळी त्यांच्या कार्यालयात फक्त पाच कर्मचारी कामाला होते व त्यांच्याकडे संपूर्ण मराठवाडा विभागतील आठ जिल्हयांचा कार्यभार सोपविण्यात आला होता. युक्तिवादामध्ये पुढे त्यांनी उपलब्ध कर्मचारी आणि त्यांच्यावर असलेला कार्यभार यातील अशाप्रकारचे व्यस्ततेचे प्रमाण आयोगाच्या निदर्शनास आणले. तदनंतर शासनाने त्यांच्या कार्यभाराची व्याप्ती समजावून घेतली व आता याच कामासाठी वीस कर्मचाऱ्यांची नेमणूक केली गेली आहे. हे लक्षात घेता, त्यावेळी त्यांचे कर्मचारी कामाच्या ओझ्याखाली किती दबून गेले असावेत, याची कल्पना आयोगास आली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीपासून हेतूतः माहिती दडविण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता व अपिलार्थीस त्यांनी दि. ११.६.२००७ व ७.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे संपूर्ण माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ११.६.२००७ व दि. ७.७.२००७ रोजी अपेक्षित असलेली माहिती पूर्णतया प्राप्त झाली आहे. मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पहिला मुद्दा सोडल्यास मुद्दा क्र. २ ची माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय मागितले आहेत. तसेच 'दरमहा वैधता प्रमाणपत्र देण्याचे सरासरी प्रमाण', ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध करुन ठेवली जात नसल्याने

-                    -

ती मूळात अपिलार्थीस देय होत नाही. मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीने दै.सामना या वर्तमानपत्राच्या दि. १४.९.२००६ रोजीच्या अंकातील पृष्ठ क्र. ७ वर आलेल्या बातमीबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे वस्तुस्थितीदर्शक माहिती मागितली आहे, या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, वर्तमानपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी शासनाच्या प्रसिध्दी संचालनालयाला किंवा त्यांच्या वरिष्ठांकडे जर एखाद्या बातमीसंदर्भात खुलासा दिला असेल तरच तो खुलासा अर्जदारास या अधिनियमातील तरतुदीनुसार देय ठरतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या बातम्यांवर अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासेवजा मागितलेली माहिती अर्जदारास, ती अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने देय होत नाही. मात्र अशाप्रकारचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेख्यावर दुसऱ्या कोणत्याही संदर्भात उपलब्ध असल्यास ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दै. सामना या वृत्तपत्रातील दि. १४.९.२००६ रोजीच्या बातमीसंदर्भात त्यांच्या वरिष्ठांकडून कोणताही खुलासा मागविला गेला नव्हता, त्यामुळे साहजिकच जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारचा 'खुलासा', 'माहिती' म्हणून त्यांच्याकडे उपलब्ध असणे शक्य नव्हते, एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ७.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे संदर्भिय बातमीसंदर्भात अपिलार्थीस योग्य तो खुलासा केला आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने माहिती लपविण्याचा उद्देश असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही. मात्र अपिलार्थीस जी माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ११.११.२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अनुज्ञेय होते, ती माहिती अपिलार्थीस अंदाजे सात महिन्याच्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेली असल्याची बाब या ठिकाणी नजरेआड करुन चालणार नाही. या विलंबाबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या खुलाशावरुन असे आढळून येत आहे की, नियमित कामाच्या त्यांच्या आवाक्यापेक्षा मोठया कार्यभारामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही व याबद्दल जन अपिलीय अधिकारी यांनी आज आयोगासमोर दिलगीरी देखील व्यक्त केली आहे. अपिलार्थीने ज्या वेळी माहितीची मागणी केली त्यावेळी निवडणूक याद्या व शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश याद्या व जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रकरणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रचंड प्रमाणात होती, मात्र या प्रकरणी आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग त्यांच्याकडे नव्हता, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करणे हे सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्याच्या दैनंदिन कर्तव्याचा एक अविभाज्य

-

-

भाग आहे. याची जाण त्यांनी इत:पर ठेवून, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या माहितीसाठीच्या प्रत्येक अर्जावर अधिक सतर्कतेने कार्यवाही करावी. त्यांना आयोगातर्फे अशाप्रकारे सूचित करण्यात येऊन अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणातील त्यांच्या वर्तनाबाबत आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नागनाथ राचय्या स्वामी,रा.२-६३,'पार्वती मॅन्शन', कोळ्ळे गल्ली,निलंगा, जि.लातूर-४१३५२१

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

-                    -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९१
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

१ श्री. विठ्ठल पांडुरंग काळम, : अपिलार्थी
रा.उस्माननगर, ता. कंधार, जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तलाठी सजा शेख राजूर,
ता.पालम,जि.परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,पालम, जि.परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २८.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी दि. ४.८.२००७ रोजी तलाठी सजा शेख राजूर तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असता, तीस दिवसांची विहित मुदत टळून गेल्यानंतरही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने तहसीलदार, पालम यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार प्रथम अपील केले. तथापि, त्यांनीही त्यावर कोणताही निर्णय आजतागायत दिलेला नाही. त्यामुळे व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केलेले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी अशीही विनंती केली आहे की, अपेक्षित असलेली माहिती त्यांना संबंधितांकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व संबंधित अधिकाऱ्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित, शेतजमीन सर्व्हे नं. १५/२ बाबत फेरफार क्रमांक २६९७ व २६९८ रद्द करण्या-संबंधी एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतदुीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.९.२००७ रोजी प्रथम अपील केले.तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी काहीही निर्णय दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. दि.१६.२.२००९ रोजीच्या लेखी नोटीसव्यतिरिक्त आयोगाच्या कार्यालयातून दूरध्वनीद्वारे त्यांच्या कार्यालयातील श्री. तुपे, लिपीक यांच्यामार्फत दि.४.३.२००९ रोजी १२.०० वाजता निरोप देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. याबद्दल आयोगातर्फे तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत असून जिल्हाधिकारी परभणी यांना तलाठी सजा शेख राजूर व तहसीलदार, पालम यांच्या या गैरहजेरीबाबत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा दि. २७.०७.२००७ रोजीचा प्रथम अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून, सदर अर्ज तलाठी सजा शेख राजूर यांना दि. १०.८.२००७ रोजी प्राप्त झालेला आहे. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.९.२००७ रोजी दाखल केलेला प्रथम अपील अर्ज देखील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. माहिती अधिकाऱ्यास मूळ अर्ज पाठविल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाची पावती आयोगास सादर केली आहे व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील आवक-जावक लिपीकाने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ६.९.२००७ रोजी पोचसही देखील दिली आहे, हा पुरावा ग्राहय धरण्यात येऊन अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे अनुमान आयोग काढत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी काहीशी सुसंगत दिसते. या अर्जावर अपिलार्थीने, "तपशीलवार लेखी माहिती" अशा अर्थाचे शब्दप्रयोग बहुतेक सर्व मुद्यांमध्ये वापरले आहेत. परंतु निश्चित कोणता तपशील अपिलार्थीस हवा आहे, याचा उल्लेख या मुद्यांमध्ये अपिलार्थीने केलेला नाही, अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीतील "तपशीलवार लेखी माहिती" ही माहिती मोघम सिध्द होत असल्याने ही, त्यांच्या मूळ अर्जातील माहितीपैकी हा भाग त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ

- -

अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देणे अनिवार्य आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा शेख राजूर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या दि. ६.९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत होऊनही निर्णय न देऊन जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्याने त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद यथायोग्यरित्या घेण्यात यावी, असे जिल्हाधिकारी,परभणी यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस मिळण्याचा अपिलार्थीचा हक्क असूनही अपिलार्थीस प्रदीर्घ काळ त्यांच्या माहिती प्राप्त होण्याच्या हक्कापासून वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत.

आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगाच्या कार्यालयातून त्यांना दि. ४.३.२००९ रोजी पालम तहसील कार्यालयातील लिपीक श्री. तुपे यांच्यामार्फत दूरध्वनीद्वारे सूचना देऊनही ते आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

-    -

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल पांडुरंग काळम, रा.उस्माननगर, ता.कंधार, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा शेख राजूर,ता.पालम,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(रजिस्टर्ड पोस्टाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९२
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
मु.टेंभुर्णी पो.ता.अहमदपूर जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.२,लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
लातूर.

त्रयस्थ पक्षः श्री. गुलाब उध्दव साळुंके

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.९.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दि. २५.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे उपस्थित केलेल्या सर्व आक्षेपांची पूर्तता करुन व आवश्यक त्या रकमेचे तिकीट लावून दि. ६.१०.२००७ रोजी पूर्तता केली. तथापि दि. ५.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, सदरील दोन्ही अधिकारी पैसे खाऊन माहिती दडवित असतात,

- -

वेळेत माहिती उपलब्ध करुन देत नाहीत, अपिलार्थीच्या अर्जास तुच्छ लेखत असल्यामुळे त्यांना अधिनियमातील प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे शास्ती व वेगळा दंड रु. २०००/- लावण्यात यावा व अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे आयोगाने आदेश द्यावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. गुलाब उध्दव साळुंके,परिचर, पंचायत समिती, अहमदपूर यांच्या जात प्रमाणपत्रासंदर्भात माहिती विचारली होती. ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषाखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस असे कळविले की, त्यांच्याकडे करावयाच्या अपिलाकरिता रु.२०/- इतक्या किमतीचे कोर्ट-फी-स्टॅम्प,डी.डी. अथवा रोखीने भरणे आवश्यक आहे, तथापि अपिलार्थीने अर्जासोबत केवळ रु.१०/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प लावल्याने अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांना स्वीकारता येणार नाही, त्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दि. ३.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक तो रु. १०/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प जोडून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविला, तथापि यावेळी अपिलार्थीची तिकीट पाठविण्याची ही कृती मुदतबाहय झाल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विचार करता येणे शक्य नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले.जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्टीकरण दिले की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज ज्यावेळी केला, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना दि. ६.३.२००९ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे दिली गेली असून सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहे.

-                                   -

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जामध्ये माहिती मागताना अविवेकी भाषा वापरल्याचे दिसून येते. उदा. "प्रकरण स्थगित कोणत्या प्रलोभनापाई ठेवण्यात आले आहे काय?, आपणास कोणत्या दबावाखाली घेतले आहे काय? किंवा अमीश दाखविले आहे काय?" अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अशाच एका वेगळया अपील प्रकरणात यापूर्वी अपिलार्थीने अशाप्रकारच्या अमूर्त स्वरुपाच्या व अविवेकी भाषेतून माहिती मागविल्याने अपिलार्थीचे द्वितीय अपील आयोगाने फेटाळलेही होते. परंतु विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, त्यातील काही माहितीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे माहिती देणे आयोगास गरजेचे वाटते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ६.३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती,"सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे काय व नोटीस देण्याचा आदेश झाला आहे काय", या मुद्यांवरील व "अपिलार्थीने दि. २०.२.२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली", या मुद्यावर माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. सदरची माहिती अपिलार्थीस दि. ६.३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर सांगत आहेत. तथापि अपिलार्थीस निश्चितपणे जी कोणती माहिती पुरविली, ती जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर उपलब्ध करुन दिली नाही, यावरुन ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वर स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी शब्दच्छल न करता सकारात्मक दृष्टीकोन ठेवून सुनावणी घेतली असती तर, अपिलार्थीस कदाचित राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज सादर करण्याची गरज पडली नसती. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जाबाबत, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंब झाल्यास त्या अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना सदर विलंब क्षमापित करुन निर्णय देता येतो व तशी स्पष्ट तरतुद अधिनियमामध्ये सुध्दा आहे, त्या तरतुदींचा जन अपिलीय अधिकारी यांनी जर वापर केला असता तर त्यांचा माहिती अधिकाराप्रती असलेला सकारात्मक दृष्टीकोन दिसून आला असता, तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही या प्रकरणी

जन अपिलीय अधिकारी यांनी केलेली नाही. सबब त्यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन निर्णय घेतल्यास अपिलार्थीचा आयोगाकडे अपील करण्यामधील व आयोगाचे आदेश प्राप्त होण्यामधील कालापव्यय टळू शकतो. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यवाहीने त्यांच्या अधिपत्त्याखालील जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असलेली माहिती अधिक परिणामकारकतेने जनसामान्यांपर्यंत पोहोचू शकेल, अशी आयोगास खात्री आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २३.७.२००७ रोजीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावामुळे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. सुरेश कांबळे, विशेष समाजकल्याण अधिकारी,लातूर) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु. टेंभूर्णी पो.ता. अहमदपूर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्रमांक-२,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २४९३/०७, २४९४/०७ व २४९५/०७

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९३,२४९४ व २४९५
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

१. श्री. कंधारकर महमद शहेजादा महंमद सुलतान, : अपिलार्थी
रा.मुदखेड जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नांदेड.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नांदेड.

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १.१०.२००७ रोजीची, राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१०.२००७ रोजी दाखल झालेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थीच्या या तीनही द्वितीय अर्जांचे एकत्रितपणे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने वेगवेगळया स्वरुपाची माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे तीन स्वतंत्र अर्जाद्वारे एकाच दिवशी केली होती. या संदर्भातील प्रथम अपील व द्वितीय अपील देखील अपिलार्थीने एकाच दिवशी संबंधित प्राधिकरणाकडे केले असल्याने अपिलार्थीच्या अपील क्र.२४९३/०७, २४९४/०७ व २४९५/०७ या तीनही द्वितीय अपिलावर एकत्रितरित्या सुनावणी घेण्यात येत आहे.

- -

या तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.०७.२००७ रोजी उपरोक्त जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले तथापि त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपिलांवर मुदत संपून गेल्यानंतरही निर्णय दिला नाही. परिणामी अपिलार्थीस शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विलंब व टाळाटाळ होत असल्याचे कारणास्तव त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने अपील क्र.२४९३/०७, २४९४/०७ व २४९५/०७ या तीनही प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ७.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे **-(१) सन १९९५ ते २००७ या कालावधीमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्त्या देण्यात आलेल्या नियमांची माहिती, सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवारांची मागणी करण्यात आली होती काय, तसेच वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिरातीची सत्यप्रत, २९ दिवसांच्या रोजंदारीवर काम केलेल्या कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादीप्रमाणे कायम नियुक्त्या केल्या असल्यास त्या कर्मचाऱ्यांची यादी व आदेशाच्या सत्यप्रती (२) चतुर्थश्रेणी,तृतीय श्रेणी व द्वितीय श्रेणी या पदावर धरणग्रस्त,प्रकल्पग्रस्त,स्वातंत्र्यसैनिक,अपंग, अंशकालीन इ. प्रवर्गातून देण्यात येणाऱ्या कायमस्वरुपी नियुक्त्यासंदर्भातील प्रमाणपत्रांच्या प्रती आणि (३) दि. १.१.१९९० ते ३१.१२.२००५ या कालावधीमध्ये २९ दिवसांचे कर्मचाऱ्यांच्या आदेशाच्या व त्यासंबंधित अभिलेख्याच्या रजिस्टरच्या सत्यप्रती व जेष्ठता यादी व पदोन्नतीसंबंधी दिनांकासह आदेशाच्या सत्यप्रती, -** या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने तीनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसाधारण टपालाद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या उपरोक्त प्रकरणाशी संबंधित असलेल्या तीनही प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली असता, या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे तीन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

\-　　　　　　　　　　-

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचे पत्र त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध नाही व तसेच त्यांना आयोगाने अपिलार्थीस त्यांनी माहिती दिली किंवा कसे, याची माहिती विचारली असता, त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे, परंतु आता ती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आयोगासमोर कबूल केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी प्रथम अपील केले, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी या पदावर डॉ. डी.एस.कुलकर्णी नावाचे अधिकारी कार्यरत होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, उपरोक्त तीनही अपील प्रकरणी अपिलार्थीने सादर केलेल्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे देय होत आहे. या तीनही प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद देण्याचे सौजन्य संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दाखविले नाही, एवढे असूनही जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दि. १९.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांची अक्षम्य उपेक्षा केल्याचे या प्रकरणी आयोगास दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीनही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तीस दिवसांच्या आत देण्याचे आयोगास आश्वासित केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे तीस दिवसांची मुदत मागितली आहे. सदर मुदत मान्य करण्यात येऊन, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त तीनही प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली अर्जनिहाय संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत स्वतंत्ररित्या विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जांना कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. राजेश हिरे, सध्या बी.जे.मेडीकल कॉलेज येथे सहयोगी प्राध्यापक, औषधीनिर्मिती शास्त्र विभाग येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जांची उपेक्षा करुन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग करुन

- -

स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे. सबब सचिव, (वैद्यकीय शिक्षण) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, याची यथायोग्य नोंद संचालक (वैद्यकीय शिक्षण व संशोधन) यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांची विचाराधीन तीनही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. २४९३/०७, २४९४/०७ व अपील क्र. २४९५/०७ मान्य करण्यात येत आहेत.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या तीनही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अर्जनिहाय, व स्वतंत्रपणे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. राजेश हिरे, सध्या सहयोगी प्राध्यापक, बी.जे.मेडीकल कॉलेज येथे औषधीनिर्मिती शास्त्र विभागात कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान,रा.नवी आबादी, मुदखेड,ता.मुदखेड जि.नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. राजेश हिरे, बी.जे.मेडीकल कॉलेज,औषधीनिर्मिती शास्त्र विभाग,पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ प्राचार्य, बी.जे.मेडीकल कॉलेज,पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, दंत महाविद्यालय बिल्डींग, ४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९६
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

१ श्री. दत्ता भिवाजी खानसोळे, : अपिलार्थी
मु.पो.कामळज, ता.मुदखेड जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत, कामळज,
ता.मुदखेड, जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुदखेड, जि. नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, ग्रामसेवक मौ. कामळज, ग्रामपंचायत व सरपंच यांच्याकडून मासिक सभा, ग्रामसभा न घेऊन व अंदाजपत्रक २००५-०६ व २००६-०७ या वर्षाची माहिती त्यांनी अपिलार्थीस न दिल्याबद्दल त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कामळज यांच्याकडे, "मौजे कामळज ता.मुदखेड येथील २००५-०६ व २००६-०७ या दोन वर्षाची आर्थिक पत्रके, ग्रामपंचायतीत झालेल्या ग्रामसभा, वार्षिक ग्रामसभा व मासिक सभेच्या

- -

इतिवृत्ताच्या सत्यप्रती" ही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.७.२००७ रोजी प्रथम अपील केले.या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.८.२००७ रोजी निर्णय घेऊन, या निर्णयाद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. १.९.२००७ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार ते दि. २७.९.२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे गेले असता, अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार करण्यास नकार दिला. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यातील मूळ स्वरुपातील माहिती आवश्यक आहे. अपिलार्थी हे ग्रामपंचायत सदस्य असून कायद्यान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ग्रामसेवक व सरपंच यांच्या ताब्यात असते, ती मूळ स्वरुपात ग्रामपंचायत सदस्यांकडे ठेवण्याची तरतुद कायद्यात नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.९.२००७ रोजी देऊ केलेली माहिती पाहता, असे दिसून येते की, या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या मासिक सभा,ग्रामसभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती समाविष्ट नाहीत. याचा खुलासा विचारला असता,ग्रामसेवक यांनी आयोगास असे सांगितले की, ग्रामसभा व मासिक सभेच्या बैठकीचे रजिस्टर सरपंच श्रीमती सुंदराबाई लक्ष्मण कोकरे यांच्या ताब्यात असून त्या ही कागदपत्रे ग्रामसेवकांकडे देण्यास तयार नाहीत. यासंदर्भात ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जर संबंधित सरपंच अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती स्वतःकडे ठेवून अपिलार्थीस देण्यासाठी कोणत्याही मार्गाने प्रतिबंध करीत असतील तर उपरोक्त प्रकरणी त्यांनी आवश्यक वाटल्यास संबंधित तालुक्याच्या पोलीस यंत्रणेशी संपर्क साधून सरपंच श्रीमती सुंदराबाई लक्ष्मण कोकरे यांच्याकडून त्यांच्या मदतीने ती हस्तगत करुन घ्यावी व तदनंतर त्या माहितीसाठीच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन

- -

द्याव्यात. या सर्व प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांच्या आत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड, जि. नांदेड यांच्या सहकार्याने पार पाडावयाच्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या संबंधित सरपंच माहितीचे रजिस्टर त्यांना उपलब्ध करुन देत नाहीत, या मुद्यांसंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, जर संबंधित सरपंच जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीशी संबंधित अभिलेखे हस्तांतरित करण्यासाठी काही प्रतिबंध करीत असतील तर त्यांच्यावर मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ३९(१) प्रमाणे कारवाई करावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या ताब्यात असलेल्या मूळ माहिती तपासणी वगळता अन्य प्रयोजनार्थ उपलब्ध करुन देणे या तरतुदीमध्ये अनुज्ञेय नाही, त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या फक्त साक्षांकित प्रतीच या प्रकरणी प्राप्त होऊ शकतील. तसेच त्यांनी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून कार्यालयातील संबंधितांकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घ्यावी लागेल, ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना त्यांचा कोणताही अधिकृत अथवा अनधिकृत प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे अनुज्ञेय असणार नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीमुळे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता भिवाजी खानसोळे,मु.पो.कामळज, ता.मुदखेड जि.नांदेड द्वारा बळी पाटील जाधव यांचा वाडा,साईमोटार गॅरेजसमोर,दत्तनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, कामळज,ता.मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, मुदखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९७
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रल्हाद सेवाजी चव्हाण,<br>मु.पो. हरडप, ता. माहूर जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,ग्रामपंचायत<br>वाई (बाजार), ता.माहूर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, माहूर, जि. नांदेड | | |

त्रयस्थ पक्षः श्री. अंबादास मल्लेशु राजुरकर,
श्री. हैदरखान बाबुखॉ,
श्री. डाखोरे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्षापैकी श्री. अंबादास मल्लेशु राजूरकर उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ५.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करुन देखील गट विकास अधिकारी यांच्याकडून निर्णय देण्यासाठी कसूर होत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे वाई (बाजार) ग्रामपंचायत कार्यालयाच्या हद्दीतील जागेबाबत एकूण ३ मुद्याद्वारे माहिती मागविली होती. या

- -

माहितीतील मुद्दा क्र. २ द्वारे मागितलेली माहिती, त्रयस्थपक्ष श्री. अंबादास मल्लेशु राजुरकर यांचेशी संबंधित होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस प्रत्यक्षात दि. १.७.२००७ रोजी उपलब्ध करुन दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.७.२००७ रोजी प्रथम अपील केले.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.८.२००७ व १०.८.२००७ रोजी सुनावणी घेतली, तथापि त्यावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १.७.२००७ रोजी प्रत्यक्षात माहिती प्राप्त झाल्याचे आयोगासमोर कबूल केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी ग्रामपंचायतीच्या ज्या जागेविषयी माहिती मागितली होती, ती जागा डॉ. डाखोरे यांना पूर्वी दिली होती. तथापि त्रयस्थ पक्ष श्री. राजूरकर यांनी स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करुन ही जागा आपल्या वडिलांच्या नावावर करुन घेतली. ही जागा श्री. राजूरकर यांनी स्वतःच्या वडिलांच्या नावाने कशाप्रकारे करुन घेतली याची माहिती त्यांना आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी दि. १.७.२००७ रोजी प्रत्यक्षात उपलब्ध करुन दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. ३.८.२००७ व १०.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली असल्याचे त्यांना आढळून आल्यावरुन त्यांनी यासंदर्भात कोणताही निर्णय पारित केला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १.७.२००७ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिली आहे. मूळात अपिलार्थी यांनी आज सुनावणीच्या वेळी उपस्थित केलेल्या व जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीतील ज्या मुद्यासंदर्भात समाधानी नाहीत, त्या मुद्यावर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये कोणतीच माहिती

मागितल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्यासंदर्भात माहिती प्राप्त होण्याचा अर्थाअर्थी कोणताही संबंध पोहोचत नाही. अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी, या प्रकरणी, योग्य व अचूक प्रकारे न करता आल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिले आहेत. यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा कोणताही दोष असल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दोन वेळा सुनावणी घेऊन त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली गेली आहे, म्हणून सुनावणीशी संबंधित निर्णय न देणे ही त्यांची कृती सर्वथा गैर आहे, कारण अपिलार्थीने दि. १.७.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली असताना त्यानंतर दि. ३.७.२००७ रोजी त्यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यामुळे सुनावणी ठेवूनही निर्णय न देण्याची जन अपिलीय अधिकारी यांची कृती सर्वथा गैर असल्याचे दिसून येते. त्यांना आयोगातर्फे इतःपर अशाप्रकारे सुनावणी ठेवून निर्णय न देण्याचे त्यांनी टाळावे, अशी सूचना देण्यात येत आहे.

थोडक्यात, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी त्यांनी मूळ अर्जामध्ये सदोषरित्या माहितीची मांडणी केल्याने ते स्वतः जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रल्हाद सेवाजी चव्हाण,मु.पो. हरडप, ता. माहूर जि.नांदेड-४३१ ७२१.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत वाई (बाजार) ता.माहूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

४.	निर्णय नस्ती.

-	-

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९८
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

१ श्री. महंमद अन्वरउल्ला खान पि.बरकतउल्ला खान, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य लिपीक/कार्यालयीन अधीक्षक,
विभागीय वन कार्यालय,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
विभागीय वन कार्यालय,नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: मुख्य लेखापाल,
उपवनसंरक्षक, नांदेड यांचे कार्यालय,
नांदेड
जन अपिलीय अधिकारी: सहायक वनसंरक्षक (रोहयो),
नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.२४.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. ९.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना किनवट वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडून अद्यापही प्राप्त झालेली नाही. या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्यांनी दि. २४.७.२००७ रोजी नांदेड येथे शासकीय कोषागार कार्यालयात भरल्यानंतरही किनवट वनक्षेत्रपाल यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती शिक्षेची कारवाई करावी.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नोव्हेंबर, २००६ ते जुलै, २००७ या कालावधीतील महाराष्ट्र ग्रामीण रोहयो आणि इतर योजनांसंदर्भात मान्यताप्राप्त झालेल्या कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दि. १२.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व वनक्षेत्रपाल यांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे वनक्षेत्रपाल, नांदेड, देगलूर व हदगाव यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती पुरविली तथापि वनक्षेत्रपाल, किनवट यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क नांदेड येथील शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने दि. २४.७.२००७ रोजी या प्रकरणी आवश्यक त्या शुल्काचा भरणा नांदेड येथील कोषागारात केला. तथापि वनक्षेत्रपाल, किनवट यांच्याकडून आवश्यक ती माहिती वेळेवर प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय दि. २७.९.२००७ रोजी दिला. या निर्णयाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ७.१०.२००७ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले, तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ७.१०.२००७ रोजी साध्या पोस्टाने माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. ४३८१, दि. ७.१०.२००७ द्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्यांसंदर्भातील सर्व माहितीचा समावेश होत असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने माहितीचा प्रथम अर्ज उपवनसंरक्षक कार्यालातील मुख्य लिपीक (मुख्य लेखापाल), ज्यांची या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे, त्यांच्याकडे केला होता. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अशी माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या योजनेसंदर्भात मागितली आहे, त्या योजनेचे सनियंत्रण करताना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अशी माहिती नियमितपणे संकलीत करुन ठेवली जात असते. तथापि एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाच्या प्रती संबंधित वनक्षेत्रपाल यांना प्रथमतः पाठविण्याची सकृतदर्शनी आवश्यकता नव्हती, असे आयोगाचे मत आहे.अपिलार्थीस वनक्षेत्रपाल,किनवट यांच्याकडील माहितीशिवाय उर्वरित सर्व वनक्षेत्रपाल यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाल्याचे त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि आज रोजी आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ७.१०.२००७ रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविल्याचा कोणताही ठोस पुरावा ते आयोगासमोर आज सादर करु शकले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती खरोखरीच पाठविली किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवावी व अपिलार्थी ज्यावेळी या माहितीसाठी व्यक्तिशः संपर्क साधतील त्यावेळी त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहावे लागेल. ही माहिती अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीकडून किनवट वनक्षेत्रपाल यांनी माहितीपोटीचे शुल्क रु.४/- प्राप्त करुन घेऊनही त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस हे शुल्क आता परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.४/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल

- -

त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सकारात्मक कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत उपलब्ध करुन ठेवावी व अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित झाल्यास ती माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. अपिलार्थी यांना त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील आदेश क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.४/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

५. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे सर्व सहायक यांना उपरोक्त प्रकरणातील त्यांच्या वर्तनाबाबत आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महंमद अन्वरउल्ला खान पि. बरकतउल्ला खान, ९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड-४३१ ६०४.

- -

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल,उपवनसंरक्षक, नांदेड यांचे कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४९९
निर्णय दिनांक ०७-०३-२००९

१ श्री. कृष्ण दिगंबरराव पांडे, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य लिपीक,
उपवनसंरक्षक, नांदेड यांचे कार्यालय,
नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो),
नांदेड.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः मुख्य लेखापाल,
उपवनसंरक्षक, नांदेड यांचे कार्यालय,
नांदेड
त्रयस्थ पक्षः श्री. भालचंद्र बंडे व श्रीमती पारुबाई दासरवाड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि २७.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी कोणतीही विशिष्ट अशी विनंती आयोगास केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९७-१९९८ ते २००५-२००६ या कालावधीशी संबंधित एकूण ४ मुद्यांद्वारे

- -

जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. बंडे यांनी दि. ३१.७.२००६ रोजी केलेला तक्रार अर्ज, श्रीमती पारुबाई दासरवाड यांचा दि. १६.७.२००२ रोजीचा तक्रार अर्ज व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे पत्र दि. २४.२.१९९७ व २५.५.१९९८ यांच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले.सदर आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे व अपिलार्थीच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या व १९९७-९८ या वर्षातील दोन पत्रांचा शोध घेऊन त्या पत्रांच्या प्रती अपिलार्थीस देण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३ मधील दि. २४.२.१९९७ व २५.५.१९९८ च्या पत्राच्या प्रती त्यांच्या कार्यालयात बराच शोध घेऊनही त्यांना उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील श्री. कृष्णा दि.पांडे लिपीक यांनी त्यांच्या निलंबन आदेशावर मुख्य वनसंरक्षक,औरंगाबाद यांच्याकडे सादर केलेल्या पुर्नविलोकन अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी अद्यापही अपिलार्थीस पुरविली नसल्याचे मान्य केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत अपिलार्थीच्या निलंबन आदेशावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील माहिती दिली नाही. अपिलार्थीच्या दि. ९.७.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जो प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ८.८.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे अनिवार्य होते, तो प्रतिसाद त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दि. ३.९.२००७ रोजी दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशाप्रकारे विलंबाने दिलेल्या

- -

प्रतिसादाबद्दल ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस या प्रकरणी निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून न दिल्या गेलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कृष्ण दिगंबरराव पांडे, 'सर्वेश', परिमलनगर, जलशुध्दिकरण केंद्राजवळ, पावडेवाडी पथ, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उपवनसंरक्षक, नांदेड यांचे कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

-                    -

४. मुख्य वनसंरक्षक, 'वनभवन', उस्मानपूरा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

-                                                            -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. भंडारी रसिकलाल किसनलाल, अपिलार्थी
संगमनेर रोड, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, दादा वामन जोशी नवीन मराठी शाळा,
श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, (शैक्षणिक संस्था),
बोरकर नगर, नगर-सावेडी रोड, अहमदनगर, जिल्हा
अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. दा. वा. जोशी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता, निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची पत्नी कै. विद्या भंडारी यांच्या वेतननिश्चिती व वेतन फरकाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपाची वेगवेगळ्या मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १५-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याचे कळविले. मात्र हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याने, अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे वाटून त्यांनी उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी युक्तिवाद केला. अपिलार्थी यांच्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थी यांच्या पत्नी कै. विद्या भंडारी, यांची वेतननिश्चिती व तदअनुषंगाने मिळणारे इतर आर्थिक फायदे त्यांना अद्याप संबंधीत संस्थेकडून प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असून या माहितीव्दारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित असल्याचे दिसून येते, जे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे

-                -

मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत, या टप्प्यावर आयोग आला आहे. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व संबंधीत शिक्षण संस्था यांच्याकडे मागणी केलेली माहिती, ज्या परिस्थितीमध्ये केली आहे ती लक्षात घेता या टप्प्यावर या प्रकरणी आयोगास लक्ष घालणे गरजेचे वाटते. अपिलार्थीच्या पत्नी सौ. विद्या भंडारी यांचे दिनांक २७-०६-२००३ रोजी दु:खद निधन झाले. तदनंतर श्रीमती विद्या भंडारी यांना देय असलेले सर्व आर्थिक फायदे अपिलार्थीस संबंधीत शिक्षण संस्थेने त्वरेने अदा करणे गरजेचे होते. तथापि या घटनेस आज रोजी सहा वर्षे होऊन देखील त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. आज रोजी आयोगासमोर झालेल्या युक्तिवादामध्ये संबंधीत संस्थेचे सचिव आणि मुख्याध्यापक यांनी अपिलार्थीच्या पत्नीचे जे आर्थिक फायदे देय आहेत ते १० एप्रिल २००९ रोजी अगर तत्पूर्वी त्यांना अदा करण्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. हे पाहता, संबंधीत संस्थेचे सचिव यांनी या प्रकरणी स्वतः यासंदर्भातील सर्व संबंधीतांमध्ये आवश्यक त्या बाबींचा समन्वय साधून अपिलार्थीस त्यांच्या पत्नीचे फायदे या कालावधीमध्ये अदा केले जातील असे पहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणाची विशिष्ट पार्श्वभूमी लक्षात घेता शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असे सूचित करण्यात येते की, संबंधीत शिक्षण संस्थेकडून अपिलार्थीशी संबंधीत त्यांच्याकडे या विषयावर प्राप्त झालेल्या सर्व संदर्भांवर त्यांनी त्वरेने कारवाई करावी, जेणेकरुन श्रीमती भंडारी यांच्या वारसदारांना देय असलेली रक्कम अदा करणे संबंधीत शिक्षण संस्थेस सुलभ होईल.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दयांचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अमूर्त स्वरुपाची व कोणतेही संकेत न बाळगता माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. सबब माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी करीत असतांना त्यांनी विवेक बाळगावा अशी त्यांना आयोगातर्फे येथे सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

- -

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भंडारी रसिकलाल किसनलाल, संगमनेर रोड, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, दादा वामन जोशी नवीन मराठी शाळा, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, (शैक्षणिक संस्था), बोरकर नगर, नगर-सावेडी रोड, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. अनंत मधुकर लिहीणे, अपिलार्थी
ह.रा. सागर अपार्टमेंट, फराटे गल्ली, दौंड,
तालुका दौंड, जिल्हा पुणे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल शाखा),
अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर,
जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अपर चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय (कुळ कायदा शाखा), अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. फाळके

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०२-२००८ रोजी दाखल झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०४-११-२००७ रोजी त्यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द केले असून, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना दिनांक १२-११-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४ ते २००७ या कालावधीशी संबंधीत "परवानगी विषयी" या विषयावर एकूण नऊ मुद्दयांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७ इतके शासकीय कोषागारात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती ज्या इतर प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्या प्राधिकरणाकडून अपिलार्थीस माहिती घेण्यासाठी त्यांनी सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात त्यांच्या प्रतिनिधीमार्फत सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, श्री. शिवाजी फाळके यांना पेट्रोलपंपाकरिता ज्यांच्याकडून परवानगी देण्यात आली ते प्रांताधिकारी श्री. पलांडे यांचे नातेवाईक असल्याची तक्रार केली होती तसेच श्री. जयसिंग फाळके हे जिल्हा परिषद अहमदनगर येथे उपाध्यक्ष असल्याने राजकीय दबावाखाली त्यांना माहिती दिली गेली नाही. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भिय पेट्रोलपंपास परवानगी कशी दिली हा प्रश्न येथे उपस्थित होत असल्याने त्यांना सदरची माहिती प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या संचिकेमध्ये उपलब्ध होती त्या संचिका पाहण्यासाठी अपिलार्थीस दिनांक ११-०७-२००७ रोजी उपलब्ध करुन दिल्या गेल्या होत्या व या संचिकेमधील माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांची पोचसही घेण्यात आली आहे. तसेच अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती ज्या इतर प्राधिकरणाकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे त्या प्राधिकरणाशी संपर्क

-                    -

साधण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीस त्यांनी जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करुन दिली असून उपविभागीय अधिकारी, कर्जत यांना त्यांच्याकडील माहिती अपिलार्थीस देण्यासाठी सूचित केलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. शिवाजी फाळके यांना पेट्रोलपंपासाठी दिल्या गेलेल्या परवानगीसंदर्भात एकूण नऊ मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, ३, ४, ६, व ९ याव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होते. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २, ५ व ७ या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अंशतः देय होते तर मुद्दा क्रमांक ८ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस देय होत नाही. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय, स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती त्यांच्याकडे मागितली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य नाही. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ५ व ७ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांना अपेक्षित असलेली, दिवाणी न्यायाधीश, कर्जत यांनी दिलेल्या पत्राची दखल घेतली काय, मी माझे म्हणणे सादर केले आहे ते उपविभागीय अधिकारी यांनी चौकशी अहवालासोबत जोडले आहे काय, मला म्हणणे देण्यासाठी पत्र दिले होते काय, ही माहिती देखील अपिलार्थीस वर दिलेल्या स्पष्टीकरणानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी स्पष्ट केल्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील व त्यांना देय होणारी संपूर्ण माहिती ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे त्यांनी या प्रकरणी प्रथमतः अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करणे येथे अपेक्षित होते. या तरतुदीप्रमाणे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रती सर्व संबंधितांना, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत देऊन त्या पत्रांच्या प्रती अपिलार्थीस देणे जन माहिती

-                -

अधिकारी यांना आवश्यक होते. मात्र त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत प्राधिकरणाशी परस्पर संपर्क साधण्याचे सूचित केले. संबंधीत जन माहिती अधिकारी यांची ही कृती चूकीची असून अशा प्रकारच्या चूकीबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कने कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांना उपरोक्त प्रकरणी पेट्रोलपंपाकरिता परवानगी कशी दिली याचे उत्तर हवे असल्याचे दिसून येते. या प्रकरणी त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांना श्री. शिवाजी फाळके यांना देण्यात आलेल्या पेट्रोलपंपाकरिताच्या परवानगीबाबत काही आक्षेप असतील तर त्याचे निराकरण त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनंत मधुकर लिहीणे, ह.रा. सागर अपार्टमेंट फराटे गल्ली, दौंड, तालुका दौंड, जिल्हा पुणे.

२ जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय (कुळ कायदा शाखा), अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, कोपरगांव, जिल्हा
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर,
जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सचिव, गौतम शिप गोट रिअरींग, प्रोसेसिंग ॲण्ड मार्केटिंग को. ऑप. सोसायटी, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गौतम शिप गोट रिअरींग, प्रोसेसिंग ॲण्ड मार्केटिंग को. ऑप. सोसायटी लि., गौतमनगर यांच्यासंदर्भात स्थापनेपासून ते सन १९९२ पर्यंतच्या कालावधीतील माहिती एकूण चार मुद्दयांव्दारे मागविली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था, कोपरगांव यांना उद्देशून केला होता. या प्रकरणी सचिव, गौतम शिप गोट रिअरींग, प्रोसेसिंग ॲण्ड मार्केटिंग को. ऑप. सोसायटी हे जन माहिती अधिकारी असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी त्यांच्याकडे दिनांक १७-१२-२००७ नुसार हस्तांतरीत केली. संबंधीत संस्थेच्या सचिवाकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या आदेशानुसार आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधीत संस्थेने त्यांना अपिलार्थीस ते त्या संस्थेचे सभासद नसल्याने माहिती देण्याचे नाकारले होते परंतु अपिलार्थीने त्यांनी ते संबंधीत संस्थेचे सभासद असल्याचा आवश्यक तो पुरावा त्यांच्याकडे दाखल केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या संस्थेकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी केली होती ती संस्था सहकारी संस्था असून ती महाराष्ट्र सहकार कायदा १९६० प्रमाणे स्थापन झाली असून या संस्थेतील सर्व कागदपत्रे सहायक निबंधक, सहकारी संस्था अथवा सहकार विभागातील सक्षम अधिका-यास पाहणीकरिता उपलब्ध होऊ शकतात. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दयांचे

अवलोकन करता अपिलार्थीस ही माहिती संबंधीत संस्थेने न देण्याचे कोणतेही प्रयोजन असण्याची शक्यता असल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब सचिव, गौतम शिप गोट रिअरींग, प्रोसेसिंग ॲण्ड मार्केटिंग को. ऑप. सोसायटी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, आदेशित कालावधीत अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्यास त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली, मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, संबंधीत संस्थेच्या अभिलेख्यावरुन, अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव, गौतम शिप गोट रिअरींग प्रोसेसिंग ॲण्ड मार्केटिंग को. ऑप. सोसायटी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, गौतम शिप गोट रिअरींग प्रोसेसिंग ॲण्ड मार्केटिंग को. ऑप. सोसायटी, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), अहमदनगर, जिल्हा

- -

अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, — अपिलार्थी

मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव,

जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी

तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर,

जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १३-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीच्या नकला अद्यापपर्यंत प्राप्त झाल्या नसून त्यांना मुदतीत माहिती व माहितीसाठीचा खर्च जन माहिती अधिकारी यांनी कळविला नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे नकला प्राप्त झालेल्या नाहीत.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत आखेगाव डोंगर तालुका शेवगांव जिल्हा अहमदनगर संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६१९ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ३०-०१-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयातील पावती क्रमांक ४० व्दारे केला. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०४-०२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाली, तथापि ती माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००८ पूर्वी जन माहिती अधिकारी यांना सशुल्क माहिती पुरविण्याचे आदेशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ - मौजे आखेगांव डोंगर येथील सर्व्हे नंबर, गावाचा नकाशा किती तारखेस जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला त्याची माहिती, सर्व्हे नंबर १३/५६/१ व १३/५६/२ च्या मधील बांधावर विहीर आहे की नाही याची, सर्व्हे नंबर १३/५६/२ च्या ७/१२ वर विहीर बांधावर आहे अशी नोंद केव्हापासून आहे व ती नोंद कोणी करुन घेतली, याची माहिती अद्यापपर्यंत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना आठ दिवसाच्या आत पुरविण्याचे आयोगासमोर मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना

- -

आवश्यक असलेल्या माहितीची मागणी व्यवस्थितपणे केलेली नाही, त्यामुळे आज रोजी अपिलार्थीच्या वकिलाने सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादामधील व मूळ अर्जामध्ये समाविष्ठ असलेले मुद्दे येथे विचारार्थ घेण्यात येत आहेत. अपिलार्थीने आखेगांव डोंगर तालुका शेवगाव येथील सर्व्हे नंबर किती तारखेला हजर झ ाला याची माहिती विचारली आहे. त्यामध्ये सर्व्हे नंबरचा उल्लेख न केल्याने ही माहिती मोघम स्वरुपाची आहे, तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आठ दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीच्या युक्तिवादातील सर्व्हे नंबर १३/५६/२ मधील बांधावर विहीर आहे की नाही ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने देय होत नाही. अपिलार्थीच्या युक्तिवादातील शेवटच्या मुद्दयासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसून ती संबंधीत गावाच्या तलाठ्याकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. मात्र अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर अशा वेळी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कारवाई करणे अपेक्षित असतांना अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करुन, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारे विलंबाने व अपूर्ण माहिती दिली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने अपिलार्थीने या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरलेले शुल्क रुपये ६१९ इतके हे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता परत करावे लागेल व तसेच अपिलार्थीच्या युक्तिवादातील दोन मुद्दयावरील माहिती त्यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस आखेगांव डोंगर येथील सर्व्हे नंबर त्यांना प्राप्त झाल्याचा दिनांक व सर्व्हे नंबर १३/५६/२ च्या ७/१२ च्या उता-या-वरील नोंदीसंदर्भातील माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या विलंबामुळे व त्याव्दारे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग करुन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब भिवशेन काटे,<br>मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव,<br>जिल्हा अहमदनगर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर,<br>जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव, जिल्हा अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ३०-१०-२००७ रोजी अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर यांना उद्देशून केला होता व यासंदर्भातील प्रथम अपील दिनांक ३०-१२-२००७ रोजी उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक प्रदेश, नाशिक यांच्याकडे केले होते. भूमि अभिलेख विभागाचे माहिती अधिकारी म्हणून तालुका निरीक्षक भूमि अभिलेख व जन अपिलीय अधिकारी म्हणून अधीक्षक, भूमि अभिलेख हे नेमले गेले आहेत. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्याप सुनावणी झाली नसल्याचे आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर यांच्याकडून सुनावणी होणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत झाले आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्या-पासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अहमदनगर

( वि. बा. बोरगे )

- -

दिनांक ०९-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, अपिलार्थी
मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगांव,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : १ श्री. माळी
२ श्री. नंदनवनकर
३ श्री. गणेश काटे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्षापैकी श्री. नंदनवनकर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २६-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्या

- -

निर्णयाविरुध्द, त्यांनी दिलेला निर्णय त्यांना मान्य नसल्याचे व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणुनबुजून विलंब केल्याचे या अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत एकूण १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे केव्हा प्रतिसाद दिला हे जन माहिती अधिकारी यांना सुनावणीमध्ये आयोगासमोर सांगता आले नाही. यासंदर्भात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००८ रोजी आपला निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या निर्णयाव्दारे अपिलार्थीस एकूण चार मुद्दयांशी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांना देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना राज्य माहिती आयोगासमोर त्यांची भूमिका स्पष्ट करुन सांगता आली नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक चार व्दारे जुलै २००५ मध्ये झालेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या नकला मागितल्या आहेत. अपिलार्थीस निश्चितपणे कोणाच्या व कोणत्या विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या नकला हव्या याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. तसेच आयोगाने या मुद्दयावर वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार अपिलार्थीस उत्तरपत्रिकांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होण्याचा हक्क नसल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक चार व्दारे मागणी केलेली माहिती मूळात अवैध ठरत असल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य नीट पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, टपालपेटी क्रमांक १००२६, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. दत्तात्रय रामचंद्र पद्मा, अपिलार्थी

व्दारा : के. रविंद्र टेलर्स, जुन्या ओम स्वीट कॉर्नर मागे,

एकता कॉलनी, कलानगर, गुलमोहर रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळण्यासाठी विलंब झ ााल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत. अपिलार्थीने आज सुनावणीपूर्वी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे

आयोगाच्या अर्जावर लेखी दिले आहे. मात्र ही माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाली या मुद्दयावर त्यांना आयोगाकडील आदेश अपेक्षित असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०९-२००७ अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज त्यांना दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्राप्त झाला आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके भरण्याचे त्यांना सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२००७ रोजी अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती दिली व दिनांक १८-१२-२००७ रोजी मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती दिली. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती मुदतीत दिली आहे. मात्र अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ३२ दिवसांचा विलंब लावला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापना विभागाशी संबंधित असल्याने ही माहिती त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी, त्यांना वेळ लागला व तसेच अपिलार्थीकडून त्यांनी दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे माहिती देण्यासाठी मुदत मागितली होती. केवळ आस्थापना शाखेकडून माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब लागल्याने अपिलार्थीस तीनपैकी एका मुद्दयावर त्यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली.

या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीने शुल्क भरुनही, प्रथमतः अपूर्ण माहिती प्राप्त झाली व तदनंतर उर्वरित माहिती विलंबाने प्राप्त झाली हे सिध्द होते. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी हे स्वतः दोषी नसून त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व आस्थापना विषयक शाखेमधील कर्मचारी जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक व संबंधीत कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी आस्थापना विभागातील कर्मचारी जबाबदार असल्याचे दिसून

येते. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावयाची माहिती त्यांना विलंबाने देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव सिध्द केलेला आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी सहाय्य करणारे त्यांचे सहायक / कर्मचारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने माहितीपोटी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिध्द झाले असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना आता परत करावे लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे, त्यांच्या कार्यालयाने घेतलेले शुल्क रुपये ४० अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटी घेतलेले शुल्क रुपये ४० इतके अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत परत करावे.

३. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक / कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

- -

१ श्री. दत्तात्रय रामचंद्र पद्मा, व्दारा : के. रविंद्र टेलर्स, जुन्या ओम स्वीट कॉर्नर मागे, एकता कॉलनी, कलानगर, गुलमोहर रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५९

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शकील अकबरखान पठाण,<br>H-२६, फातेमा हौसिंग सोसायटी, A/P/T, वॉर्ड क्रमांक १,<br>श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोणी,<br>तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर,<br>जिल्हा अहमदनगर | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी हेतुपुरःस्सर दिशाभूल केली आहे व विलंब लावून आपल्या कर्तव्यात कसूर केला असल्याने

त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी व नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी. तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २२-०८-२००७ रोजी सुनावणी ठेवलेल्या दिवशी जन अपिलीय अधिकारी हे त्यांच्या कार्यालयात हजर नव्हते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदूर लोणी रस्ता या रस्त्याच्या कामासंदर्भात सन २००० ते २००७ या कालावधीशी संबंधीत माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने कामाचा संपूर्ण तपशील आणि सर्व कामांच्या चालू व अंतीम देयकांच्या इ ोरॉक्स प्रती याची मागणी केली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस निरंक माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त इ ालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ३१-०८-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, संगमनेर यांना १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनाशुल्क माहिती देण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केली की, मूळात अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या चार कामांची माहिती मागितली आहे ती कामे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसल्याने त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये, त्यांच्या प्रथम अर्जासंदर्भात निरंक माहिती पुरविली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत होती त्यांच्याकडे का पाठविला नाही याची कारणे विचारली असता, उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगाकडे कोणताही समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत.

- -

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून ती माहिती घेण्यासाठी अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती, त्यांनी ज्या माहिती अधिका-याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. वास्तविक पाहता, या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज, त्यांनी मागितलेली माहिती ज्या जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध होती त्यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत पाठविणे व त्याची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. परंतु अशा प्रकारची कोणतीही कृती न करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळ वंचित ठेवले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली असल्याने आवश्यक त्या माहितीच्या मूळ अर्जासंदर्भातील घडामोडी ज्ञात करुन घेणे ही सर्वस्वी अपिलार्थीची जबाबदारी होती. तथापि अपिलार्थीने आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांचा अपिलाचा निर्णय देतांना नियोजित वेळी ते त्यांच्या निर्णय प्रक्रियेसाठी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असता जन अपिलीय अधिकारी हे त्यावेळी त्यांच्या कार्यालयात उपस्थित नव्हते.

आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी हे तत्कालीन जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांना या मुद्दयावर कोणतीही माहिती देता आली नाही मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावरुन असे दिसून येते की, त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य केले आहे.

आज रोजी सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये तयार आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही मुद्दयांवर निश्चित अशा स्वरुपाची माहिती मागितलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये फक्त कामांची नावे नमूद केली असून 'कामाचा संपूर्ण तपशील द्यावा' अशी मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना ती विशिष्ट स्वरुपात व निश्चित मुद्दयासंदर्भात

मागितली पाहिजे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली काही माहिती मोघम स्वरुपात असल्याचे दिसून येत आहे. अशी मोघम स्वरुपातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय असणार नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन मूळ अर्जातील चालू व अंतीम देयकांच्या झेरॉक्स प्रती वगळता, उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील "चालू व अंतीम देयकाच्या प्रती" ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात आज रोजी तयार असल्याचे त्यांनी कबूल केले आहे. मात्र माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिशः प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे. याकरिता त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहून ही माहिती हस्तगत करणे ही अपिलार्थीची जबाबदारी आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली "चालू व अंतीम देयकाच्या झ ेरॉक्स प्रती" ही माहिती विनामूल्य देण्याकरिता त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवावी. तसेच अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी याच कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन ही माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी. अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होणार नाही.

अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे प्रामुख्याने या प्रकरणी जबाबदार असल्याने उपरोक्त प्रकरणी त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत आहे. सबब, त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

- -

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. अपिलार्थीने वरील क्रमांक २ मध्ये निर्देशित केलेल्या कालावधीमध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी.

४. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शकील अकबरखान पठाण, H-२६, फातेमा हौसिंग सोसायटी, A/P/T, वॉर्ड क्रमांक १, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोणी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६०

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. निलेश सत्यवान म्हसे, अपिलार्थी
एरीगेशन कॉलनी, फकीरवाडा, औरंगाबाद रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर,
जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती दिली गेली नसल्याचे नमूद केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या योजनेनुसार नगर-करमाळा या रस्त्याच्या मंजूर निविदामधील "चॅप्टर व्हेरिएशन क्लॉज" अंतर्गत पानांच्या सत्यप्रती तसेच या क्लॉजअंतर्गत मंजूर व दिल्या गेलेल्या रकमेविषयी कामनिहाय माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १५-०३-२००७ रोजी भरल्यानंतर दिनांक २०-०३-२००७ रोजी अपिलार्थीस ही माहिती देण्यात आली. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती ३० दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०९-२००७ रोजी उर्वरित माहिती विनामूल्य पुरविली. तथापि ही माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडून अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली गेली आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०३-२००७ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिलेला आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन मात्र अपिलार्थीस त्यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी अपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी "या व्हेरिएशन क्लॉज अंतर्गत झालेल्या कामांची माहिती" ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत दिली नसल्याने अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण ठरते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २५-०९-२००७ रोजी उर्वरित उपरोक्त कामांची माहिती मिळाली आहे.

- -

अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी उपरोक्त कामांच्या मंजूर व दिल्या गेलेल्या रकमा निरंक होत्या. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविले नाही. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे भरुनही त्यांना, विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे असे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती विनामूल्य देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये २ /- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ज्या जन माहिती अधिका-याने विलंब लावला आहे, ते जन माहिती अधिकारी नियत वयोमानानुसार आता सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत, मात्र तदनंतर हा पदभार स्वीकारणारे जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमाप्रमाणे सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये २ /- इतके त्यांना सात दिवसाच्या आत परत करावे.

३. जन माहिती अधिकारी (श्री. खेडकर) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

- -

१ श्री. निलेश सत्यवान म्हसे, एरीगेशन कॉलनी, फकीरवाडा, औरंगाबाद रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४६१

निर्णय दिनांक ०९-०३-२००९

१ श्री. मच्छिंद त्र्यंबक मंडलीक, अपिलार्थी
मु. माळीझाप अकोले, तालुका अकोले,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मोहिम अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०३-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-१२-२००७ रोजी सादर केलेले व दिनांक ०३-०३-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शेतावर दिनांक ०८-०६-२००७ रोजी तक्रार निवारण समितीने केलेल्या पाहणी संदर्भातील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देउन अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दिनांक ०९-०७-२००७ रोजी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. तसेच या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले की, "समिती सदस्यांच्या उपलब्धतेप्रमाणे पाहणीसाठी दिनांक निश्चित केला जातो. तसेच शेतक-यांचा जबाब अहवालात नोंदविलेला आहे." तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०४-१०-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीच्या विचाराधीन प्रकरणातील दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०६-०८-२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे जरी सकारात्मक प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने पुरेसा नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये दुस-या संदर्भात लिहिलेल्या पत्राचे अवलोकन करता या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेल्या माहितीतील सर्व मुद्दयांचा समावेश असल्याचे

- -

दिसून येते, मात्र अपिलार्थीस सरळ प्रतिसाद देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या वेगळया विषयाच्या संदर्भात अपिलार्थीस दिली आहे त्या पत्राचा संदर्भ देऊन अपिलार्थीची बोळवण केली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची असून त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती मुद्देनिहाय, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी सरळपणे उत्तर न दिल्याने आयोगातर्फे त्यांना ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी स्वतंत्रपणे कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मच्छिंद त्र्यंबक मंडलीक, मु. माळीझाप अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मोहिम अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ७१/२००८ व ७२/२००८**

निर्णय दिनांक १२-०३-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
रा.पिंपळगाव रेणुकाई, जि. जालना.

**विरुध्द**

१ **अपील क्र.७१/२००८**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>उपविभाग,अंबड जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर),<br>विभाग जालना. | :प्रतिवादी |

२ **अपील क्र.७२/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>उपविभाग,घनसावंगी, जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर),<br>विभाग जालना. |

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपील क्र. ७१/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी, अपील क्र.७२/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त दोनही प्रकरणामध्ये अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०७.२००८ रोजी दाखल झालेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीने दोन्ही प्रकरणी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग, जालना यांना उद्देशून लिहिलेली दि. ६.३.२००९ व ७.३.२००९ रोजीची दोन पत्रे आयोगास सादर केली आहेत.

- -

या दोनही पत्रांमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सर्व माहिती दाखविली व माहितीविषयी त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार राहिलेली नसल्याने त्यांची प्रकरणे निकाली काढण्यात यावीत, अशी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दाखविण्यात आलेल्या माहितीने समाधान झाले असल्याचे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद करुन प्रकरणे निकाली काढण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन दोनही अपील अर्जावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नसल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले, क्र. ७१/०८ व ७२/०८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.७१/०८, दि. २८.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्र.७२/०८ दि. २८.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगाव रेणुकाई, भोकरदन, जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग,अंबड जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग,घनसावंगी जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर),विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०५
निर्णय दिनांक १२-०३-२००९

१ श्री. बळीराम देविदास मोरे : अपिलार्थी
रा.वाई (बाजार), ता.माहूर, जि. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वाई (बाजार), ता.माहूर,
जि. नांदेड.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, माहूर,
जि.नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३०.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना दि. ९.४.२००७ रोजी पंचायत समिती, माहूर येथून मिळालेली माहिती अपूर्ण असून पंचायत समिती माहूर व प्रकल्प संचालक, नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेल्या कायम प्रतिक्षा यादीमध्ये तफावत आहे व या यादीमध्ये योग्य लाभार्थीस वगळले आहे. या द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थीने वेगळा अर्ज जोडला असून त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, प्रतिक्षा यादीमध्ये योग्य लाभार्थ्यांची निवड न करता

- -

तसेच शासनाचे नियम तोडून मनमानी करुन योग्य लाभार्थ्यांना वगळले व त्याठिकाणी जास्त गुण असलेल्या व पूर्वी घरकुल मिळालेल्या लोकांची नावे सदर लाभार्थ्यांच्या यादीमध्ये समाविष्ट करुन पक्क्या घरवाल्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला व खऱ्या लाभधारकांना सदरील घरकूलाच्या कायम प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट केले गेले नाही. तसेच त्यांना पंचायत समिती कार्यालय माहूर येथून मिळालेल्या यादीतील लाभार्थी व प्रकल्प संचालक कार्यालयाकडून मिळालेल्या यादीतील लाभार्थी वेगळे आहेत. त्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी करुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस न्याय द्यावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित वाईबाजार गावातील आठवडी बाजार, बैल बाजार, बकरी बाजार, दलाली हर्रास ,शेणखत हर्रास, इंदिरा आवास योजना व राजीव गांधी निवारा योजनेच्या संदर्भात दि. १४.३.२००७ ते २००६-२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. परंतु अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.४.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दि. ३१.५.२००७ रोजी पत्र स्वरुपात पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ७.६.२००७ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली. तथापि प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे एकूण ४ ग्रामपंचायतीचा पदभार असून

- -

ते ग्रामपंचायत वाईबाजार येथे नेहमीच उपलब्ध असतात असे नाही. ग्रामपंचायतीच्या कार्यालयामध्ये ते पूर्वनियोजित दिनांकासच उपलब्ध असतात. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांनी मूळ अर्ज रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविला होता, मात्र ज्यावेळी संबंधित पोस्टमन सदरच्या अर्जाचे पाकीट जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात घेऊन गेले, त्यावेळी जन माहिती अधिकारी हे कार्यालयात उपस्थित नव्हते. तसेच संबंधित पोस्टमनने जन माहिती अधिकारी यांच्या नावाने लिहिलेले पाकीट केवळ त्यांनाच देता येते असे सांगितल्याने अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही कर्मचाऱ्याकडे हस्तांतरित झाला नाही व परिणामी अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही. अपिलार्थीच्या या प्रथम अर्जाची कल्पना त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने या संदर्भात प्रथम अपील केल्यानंतर आली व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. ७.६.२००७ रोजी विनामूल्य पुरविली. अपिलार्थी म्हणतात, त्याप्रमाणे प्रकल्प संचालक व गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये कोणताही फरक नसून जी यादी ग्रामसभेत तयार केली आहे, तीच यादी त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे.यासंदर्भात अपिलार्थीने केलेल्या वेगळया तक्रार अर्जास अनुसरुन या प्रकरणाची प्रकल्प संचालक यांच्या कार्यालयातर्फे चौकशी देखील झाली होती. तथापि या चौकशीमध्ये कोणतेही तथ्य आढळले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या यादीचा संदर्भ दिला आहे, ती यादी मूळात संबंधित ग्रामपंचायतीतील ग्रामस्थ एका विशिष्ट सभेद्वारे -ग्रामसभेद्वारे निर्णय घेऊन तयार करीत असतात. यामध्ये प्रशासनाचा कोणताही सहभाग नसतो. संबंधित ग्रामपंचायत ज्याप्रमाणे यादी तयार करील ती यादी ग्रामसेवकामार्फत तयार करुन गट विकास अधिकाऱ्यामार्फत प्रकल्प संचालक यांना सादर केली जाते. उपरोक्त प्रकरणी देखील असेच घडले आहे. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सत्य माहिती पुरविली आहे.

-                                                                 -

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहे. जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद जरी सकृतदर्शनी, वास्तववादी वाटत असला तरी या प्रकरणी त्यांच्या कार्यालयीन व्यवस्थेमधील उणीवांमुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे वेळीच प्राप्त झाला नसल्याचे दिसून येते. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांना या प्रकरणी असे सूचित करण्यात येते की, त्यांनी पोस्टाकडून त्यांना प्राप्त होणाऱ्या रजिस्टर्ड पाकीटाची तामिली योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने संबंधित पोस्ट ऑफीसशी संपर्क साधून अशा प्रकारासंदर्भात त्यांनी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अचूक माहिती पुरविली असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयावरील यादी तयार करताना ग्राम विकास अधिकारी व गट विकास अधिकारी हे कोणत्याही प्रकारे अथवा कोणत्याही नात्याने या निर्णय प्रक्रियेमध्ये समाविष्ट असू शकत नाहीत, हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना या प्रकरणी लाभार्थ्यांच्या केलेल्या यादीबाबत काही शंका असतील तर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे वेगळयाने तक्रार नोंदवून आपल्या गाऱ्हाण्याचा परस्पर निपटारा करुन घ्यावा. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, इतकीच प्रक्रिया अभिप्रेत असून या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली आहे, हे पाहता, तसेच अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये व्यक्त केलेल्या अभिप्रायाचे समर्थन करण्यासाठी व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी हे उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे

- -

विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बळीराम देविदास मोरे, मु.पो.वाई (बाजार), ता.माहूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाई (बाजार), ता.माहूर,जि. नांदेड.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, माहूर,जि.नांदेड- यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०६
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार,<br>रा.किनवट, जि. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा),<br>किनवट,जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जंकासं),<br>किनवट, जि.नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थीने प्रथमतः विचाराधीन द्वितीय अपील उपवनसंरक्षक, नांदेड यांच्याकडे दि.६.११.२००७ रोजी केले होते. तथापि द्वितीय अपील प्राधिकरण राज्य माहिती आयोग असल्याने, उपवनसंरक्षक,नांदेड यांनी अपिलार्थी यांचे त्यांच्याकडे प्राप्त झालेले द्वितीय अपील आयोगाकडे पाठवून दिले. सदर अपील दि. २६.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झाले असून आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी द्वितीय अपील प्राधिकरणाकडून आयोगाच्या स्तरावर खुलासा अपेक्षित केला आहे व त्यांना आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुन ७२० तास ओलांडून गेल्यानंतरही त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्याच्या निषेधार्थ त्यांनी विचाराधीन अपील द्वितीय अपील प्राधिकरणाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

- -

त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३२०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या या दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे आवश्यक असलेला सर्व तपशील अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थीने दि. २४.९.२००७ रोजी शासकीय कोषागारात रु.१३२०/- इतक्या रकमेचा भरणा केला. तथापि यानंतर एक महिन्याचा कालावधी ओलांडून गेल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १४.११.२००७ रोजी यासंदर्भातील आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे अनुदान विभागीय कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने उपवनसंरक्षक, नांदेड यांच्याकडे द्वितीय अपील केले व त्यांनी अपिलार्थीचे द्वितीय अपील वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे पाठविले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी द्वितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस दि. २०.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना लेखी कबूली दिली आहे. मात्र इतर तपशील पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.९.२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१३२०/- इतके भरण्याचे सूचित केले, त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. २४.०९.२००७ रोजी रु. १३२०/- इतक्या रकमेचा भरणा शासकीय कोषागारात केल्यानंतर अंतिमतः अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २०.१२.२००७ रोजी प्राप्त झाली. या विलंबाचे विश्लेषण करताना आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यापृष्ठयर्थ येणाऱ्या खर्चाची तजवीज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केली गेली नव्हती. यासाठी जन माहिती अधिकारी यांना उपवनसंरक्षक, नांदेड यांच्या

-　　-

कार्यालयावर अवलंबून राहावे लागत होते. वरिष्ठ कार्यालयाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली. अपिलार्थीने या प्रकरणी दि. २४.९.२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती प्रत्यक्षतः अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ३.१०.२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे गरजेचे होते, तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचे आवश्यक ते अनुदान जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने अंतिमतः ही माहिती अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाली. या विलंबास जन माहिती अधिकारी हे प्रत्यक्षतः दोषी वा जबाबदार नाहीत. त्यांनी उपरोक्त प्रकरणी आपले कर्तव्य अधिनियमातील तरतुदीनुसार वेळेवर पार पाडले आहे. मात्र अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जो निधी जन माहिती अधिकारी यांना आवश्यक होता, तो त्यांच्याकडे त्यांच्या खात्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदीअभावी सहज उपलब्ध न झाल्याने अपिलार्थी, आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुनही, माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिलेले आहेत, हे मात्र निश्चित! अशाप्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून, त्यांनी शुल्क भरुनही वंचित राहण्याचे कारण म्हणजे शासकीय कार्यालयातील नियमित पध्दतीमध्ये असलेल्या उणिवा हेच दिसून येईल. कार्यालयीन पध्दतीमध्ये जरी अशाप्रकारच्या काही उणिवा असतील तरी त्यासाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याची अनुज्ञेय दि. ३.१०.२००७ ही तारीख या प्रकरणी टळून गेल्याने अपिलार्थी हे अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य माहिती प्राप्त होण्यासाठी पात्र ठरत आहेत. या प्रकरणी अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी रु.१३२०/- इतके शुल्क चलनाद्वारे स्वीकारलेले आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु.१३२०/- परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी चलनाद्वारे स्वीकारलेले शुल्क रु.१३२०/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीकडून आयोगाकडे प्राप्त झालेल्या द्वितीय अपील अर्जातील इतर मुद्यांचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील इतर मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

-　　　　-

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.१३२०/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, मु.पो.सरस्वती विद्या मंदीर परिसर, हनुमान मंदिराजवळ,किनवट ता.किनवट जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा),किनवट,जि.नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकासं),किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०७
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड, जि.नांदेड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: मंडळ कृषि अधिकारी, मुदखेड, जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील दाखल केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी देखील या प्रकरणामध्ये माहिती देण्यासाठी जाणुनबुजून विलंब लावला व टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी हे अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, दि. १.४.२००६ ते ३०.६.२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली

होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०३२/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. या शुल्काच्या रकमेमध्ये अपिलार्थीने दि. ११.७.२००७ रोजी केलेल्या वेगळया विषयावरील अर्जासंदर्भातील माहितीसाठीच्या शुल्काचा समावेश असून अपिलार्थीच्या विचाराधीन मूळ अर्जासंदर्भातील आवश्यक त्या माहितीसाठीच्या शुल्काची रक्कम रु.९२०/- इतकी त्यामध्ये समाविष्ट आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून शुल्काचा भरणा करण्याच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १३.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. ३०.८.२००७ रोजी सुनावणीसाठी हजर राहण्याचे सूचित केले. तथापि प्रस्तावित सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर न राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होऊ शकला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती सशुल्क देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ते निर्णय घेऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे त्यांचे दि. २१.७.२००७ व दि. २१.८.२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठयर्थ योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला असून या प्रकरणी असे सिध्द होत आहे की, प्रथमतः अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कळवूनही, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही, तसेच ते जन अपिलीय अधिकारी

-                                    -

यांच्या कार्यालयात त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भातील सुनावणीसाठी उपस्थित राहिले नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबी पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, जे अपिलार्थीस भरणे अनिवार्य आहे, त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केलेला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही. आजही जन माहिती अधिकारी अपिलार्थीस ही माहिती सशुल्क देण्यास तयार आहेत, हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असेल तर त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून सशुल्क हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे वर स्पष्ट केल्याप्रमाणे स्वतःच जबाबदार असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०८
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड, जि.नांदेड. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः मंडळ कृषि अधिकारी, मुदखेड, जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २.७.२००७ रोजी पोस्टाद्वारे अर्ज पाठवूनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यास जाणुनबुजून विलंब लावला व टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन

२००६-०७ व दि. १.४.२००७ ते ३०.६.२००७ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे राबविल्या गेलेल्या रोजगार हमी योजना व रोपवाटिका योजनेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामार्फत रो.ह.यो.चे या कालावधीमध्ये एकही काम झाले नसल्याने, 'निरंक' माहिती अपिलार्थीस कळविली व उर्वरित मुद्यांकरिता अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११२/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेचे पालन न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १३.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दि. ३०.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर असल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला गेला नाही. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये दि. ३०.८.२००७ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याचे पत्र त्यांच्या कार्यालयाने दि. २२.८.२००७ रोजी अपिलार्थीस पाठविले होते. तथापि अपिलार्थी सुनावणीस उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय पारित केला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २.७.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.७.२००७ रोजी म्हणजेच, अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रतिसाद दिलेला आहे, मात्र अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती

-                                                    -

प्राप्त झालेली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अनुक्रमे दि. २१.७.२००७ व २२.८.२००७ रोजी आवश्यक ती पत्रे पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला असून, या पुराव्यावरुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे. मात्र अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी, असा त्यांचा मानस असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणे हे त्यांना अनिवार्य आहे. आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणे अनिवार्य असल्याची कल्पना असूनही या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे देखील त्यांनी प्रस्तावित सुनावणीनंतर कोणत्याही प्रकारे संपर्क साधल्याचे देखील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. यावरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची आजही तयारी आहे. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावल्याचे अथवा टाळाटाळ केल्याचे कोणत्याही प्रकारे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, मुदखेड,जि.नांदेड यांना

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५०९
निर्णय दिनांक १२-०३-२००९

१ श्री. बळीराम रामनारायण राऊत, : अपिलार्थी
मु.पो.नाळवंडी, ता.जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: मुख्याध्यापक,
श्रीहरी विद्यालय, वाहेगाव आमला,
ता.गेवराई,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी: शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १८.०२.२००६ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, सदर अपील हे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना उद्देशून केले आहे.

अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भातील दि. ७.१२.२००५ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविल्याचे दिसून येते व अपिलार्थीचा सदर अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी त्यांच्याकडील दि. ३०.१२.२००५ रोजीच्या पत्रान्वये निकाली काढल्याचे दिसून येते.

या घटनाक्रमात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केला नसल्याचे आढळून येत आहे. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७,

- -

दि. २६.११.२००७ नुसार आता शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.बीड यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २.२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, याच कालावधीमध्ये या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या दि.०२.०२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित एम. देशमुख, गजानन प्रोव्हीजन स्टोअर्स, कारंजा रोड, बीड-४३१ १२२

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्रीहरी विद्यालय, वाहेगाव आमला,ता.गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना अपिलार्थीच्या दि. ०२.०२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

-                                -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५१०
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीकृष्ण एल.देशपांडे,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>बिलोली, जि. नांदेड.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>बिलोली, जि. नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून अपिलार्थीने त्यामध्ये असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही व या संदर्भात कोणताही निकाल न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २०.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित कामाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने

- -

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता आयोगास या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, याच कालावधीमध्ये या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०८.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीकृष्ण एल.देशपांडे, ३८, सोनी महाल, महावीर हौसिंग सोसायटी,नांदेड-४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,बिलोली, जि. नांदेड

- -

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,बिलोली, जि. नांदेड यांना अपिलार्थीच्या दि. ८.९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५११
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दत्तात्रय शिवलिंगअप्पा मठपती,<br>रा.पेठवडज,ता.कंधार,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी-२, वर्ग-३ च्या २००५ मध्ये झालेल्या भरती प्रक्रियेसंदर्भातील माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्हा परिषदेमधील शिक्षण विस्तार अधिकारी,श्रेणी-२, वर्ग-३ च्या पदासाठी झालेल्या भरतीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क व दोन टप्प्यात पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.६.२००७ रोजी प्रथमतः व तदनंतर दि. २९.१२.२००७ रोजी अशा दोन टप्प्यात व्यक्तिशः दिली असून

- -

त्यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोच देखील दिलेली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन करताना, उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी काही कागदपत्रे जिल्हाधिकारी यांच्या ताब्यात असल्याने, सदरची माहिती जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याशी पत्रव्यवहार करुन ती माहिती त्यांना प्राप्त करुन घ्यावी लागली. या पत्रव्यवहारामध्ये झालेल्या कालापव्ययामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना हा विलंब लागला. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत व तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दोन टप्प्यात पुरविल्याचा योग्य तो पुरावा सादर केला आहे, तसेच अपिलार्थीने आयोगाकडे दि. १६.११.२००७ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाल्याचा निष्कर्ष काढण्यात येत असून अपिलार्थीच्या अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मठपती दत्तात्रय शिवलिंगअप्पा, मु.पो.पेठवडज, ता.कंधार, जि.नांदेड-४३१७१४

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५१२
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण ग्यानबा बापमारे,<br>रा.मंगरुळ,ता.माजलगाव,जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी संचालक,<br>माजलगाव सहकारी साखर कारखाना लि.,सुंदरनगर,<br>तेलगाव,ता.माजलगाव,जि.बीड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०४.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही पूर्ण माहिती दिली नाही, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये लाभार्थ्यांची नावे, योजना, शासन निर्णय, परिपत्रके, अधिकार व कर्तव्ये वगैरे कलम ४ मधील १७ कामाची माहिती परिपूर्णरित्या दिली गेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारे अपूर्ण माहिती दिली गेली असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६-०७ या कालावधीतील काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी विचारलेली माहिती पूर्णपणे तयार करण्यात आली असून टपालखर्च व माहितीची फीस भरुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीतील मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने अधिनियमातील कलम ४ च्या संदर्भातील मागितलेल्या माहितीविषयी अपिलार्थीस असे कळविले की, या मुद्यासंदर्भात त्यांना कोणताही बोध होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.१०.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या दिवशीच अपिलार्थीस माहिती विनामूल्य पुरविली असल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. २५.१०.२००७ रोजी पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. २५.१०.२००७ रोजी निर्णय देऊन निर्णयाच्या प्रतीबरोबरच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ६.९.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली व एका मुद्यावरील माहिती संदर्भात अपिलार्थीस त्यांचा खुलासा मागितला. तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीची फीस भरुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १८.९.२००७

रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रथम प्रतिसाद हा पूर्णतः अवैध आहे. कारण अपिलार्थीस माहिती पुरविण्याआधी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे निश्चित शुल्क व त्याचा तपशील (माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३) (क) प्रमाणे कळविणे गरजेचे आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने घोषित करावयाच्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे केलेली विचारणा ही चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ मध्ये या तरतुदी स्पष्टपणे नमूद केल्या आहेत. त्यामुळे या मुद्यावर अपिलार्थीकडे खुलासा मागण्याचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही प्रयोजन असण्याची शक्यता कोणत्याही प्रकारे संभवत असावी, असे आयोगास वाटत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दि. २५.१०.२००७ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली कथित माहिती आज रोजी आयोगास दाखविली, यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये काही अतिरिक्त मुद्दे उपस्थित केले आहेत व त्या मुद्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या अतिरिक्त मुद्यांचा समावेश नाही, त्यामुळे मूळात ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या, अधिनियमातील कलम ४ प्रमाणे त्यांनी तयार केलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती देखील बऱ्याच प्रमाणात सदोष असल्याचे आयोगास आढळले आहे. अर्थात् ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात पुरविलेली आहे. येथे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, ही माहिती त्यांनी आपल्या स्तरावर परत तपासून अचूक माहिती स्वयंप्रेरणेने जनसामान्यांना उपलब्ध होईल, असे पहावे. तसेच अधिनियमातील कलम ४ मध्ये काही मुद्यांचा या कथित माहितीमध्ये समावेश नसल्याचे आयोगास आढळले आहे. तेव्हा या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ४ मधील संपूर्ण माहिती मुद्देनिहाय तयार करुन ती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या पध्दतीनुसार प्रसारित करावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे नाकारल्याचे अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु.पो.मंगरुळ नं.१, ता. माजलगाव जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,माजलगाव सहकारी साखर कारखाना लि., सुंदरनगर, तेलगाव ता.माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५१३
निर्णय दिनांक १२-०३-२००९

१ श्री. आत्माराम भीमराव शिंदे, : अपिलार्थी
रा.नाथापूर ता.जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल, नाथापूर ता.जि.बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, बीड जि.बीड

त्रयस्थ पक्षः श्री. शेळके, श्री. तांबे व सौ.शिनगारे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १५.४.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०४.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने दि. १५.९.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज दिला असता, संबंधित शिक्षणाधिकारी यांनी तो दि. २०.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये मुख्याध्यापक, नाथ हायस्कुल, नाथापूर यांच्याकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित केले. त्यांना, उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती उपशिक्षणाधिकारी यांनीच देणे अपेक्षित असताना ती त्यांनी न देता मुख्याध्यापक यांना माहिती देण्याचे आदेशित केले. मुख्याध्यापकाकडून अपेक्षित माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी, मुख्याध्यापक यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ६३ दिवसांचा विलंब लावल्याचा निष्कर्ष काढून त्यांच्यावर रु.१५७५०/- इतका दंड

- -

करण्याची शिफारस आयोगाकडे केली आहे. अपिलार्थीच्या मते शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व संबंधित शाळेचे मुख्याध्यापक या दोघांनीही अपिलार्थीस माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २० (२) प्रमाणे कारवाई व्हावी व तसेच त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.९.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे सन २००१ ते २००६ या कालावधीसंबंधित शिक्षण सेवक म्हणून नेमल्या गेलेल्या काही कर्मचाऱ्यांच्या आदेशाच्या प्रती मागितल्या होत्या. तथापि उपरोक्त प्रकरणी संस्थेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,बीड यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल,नाथापूर यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याचे त्यांना सूचित केले व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,बीड यांच्याकडे दि. २१.११.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर गट शिक्षणाधिकारी यांनी दि. ६.१.२००७ रोजी निर्णय घेतला. या निर्णयाद्वारे त्यांनी मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल यांना रु.१५७५०/- इतकी शास्ती लावण्याची आयोगाकडे शिफारस केली आहे. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विशिष्ट असे कोणतेही आदेश दिलेले नाहीत. तसेच या आदेशामध्ये त्यांनी मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल, नाथापूर यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ही त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीप्रमाणे नसल्याचा निष्कर्षही काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत आयोगाच्या कार्यालयातून दि. १२.२.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे तसेच दि.९.३.२००९ रोजी दु. ०१.४५ वा. आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनीद्वारे श्री. वाघमारे, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,बीड यांच्यामार्फत कळवूनही ते आज सुनावणीस उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद घेण्यात येत आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रत्यक्षतः शिक्षणाधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. तसेच अपिलार्थीने अर्ज करतेवेळी मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल यांना शिक्षण उपसंचालक यांच्या दि. २९.९.२००५ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी म्हणून विशिष्ट नेमणूका दिल्या गेल्या असल्याने व तसेच नाथ हायस्कूल हे अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र असे सार्वजनिक प्राधिकरण असल्याने अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मुख्याध्यापक यांच्याकडे करावयास हवा होता, परंतु अपिलार्थीने त्याप्रमाणे कृती केली नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे की, शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या वेगळया व स्वतंत्र प्राधिकरणाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती संकलीत करुन अपिलार्थीस पुरवावयास हवी होती, हे आयोगास मान्य नाही. कारण मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल,नाथापूर हे त्यावेळी स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण अस्तित्त्वात होते. आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल, नाथपूर जि.बीड हे आयोगाने दूरध्वनीद्वारे कळवूनही उपस्थित नाहीत आणि त्यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिली असल्याचा जन अपिलीय अधिकारी यांनी निष्कर्ष काढला आहे, हे पाहता, मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या ६३ दिवसांच्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.१५,७५०/- इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन, हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. मात्र ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने त्रयस्थ पक्षाचे म्हणणे नोंदविणे आयोगास आवश्यक वाटत नाही.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

- -

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल, नाथापूर यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथ हायस्कूल कृ.मा.प.४... प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या ६३ दिवसांच्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.१५,७५०/- इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आसाराम भीमराव शिंदे, मु.पो.नाथापूर, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नाथ हायस्कुल, नाथापूर, ता. जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,बीड जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५१४
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,<br>रा.परळी वै.जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग)<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ९.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २४.७.२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे पत्र त्यांना दि. २४.७.२००७ रोजी दुपारी २.०० वाजता प्राप्त झाल्याने, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस हजर राहता आले नाही, याबाबत त्यांनी दि. ३०.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे खुलासा देऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.

३१.१०.२००६ व दि. २२.३.२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जासंदर्भात झालेल्या कार्यवाहीसंदर्भात काही माहिती मागितली होती. सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.७.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातून दि. १२.२.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे तसेच दि.९.३.२००९ रोजी दु. ४.३५ वा. दूरध्वनीद्वारे त्यांच्या कार्यालयातील श्री. खान यांच्यामार्फत संदेश देऊनही ते आज सुनावणीस उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद घेण्यात आली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. २४.७.२००७ रोजी सुनावणीसाठी हजर राहण्याबाबत त्यांना दिलेले पत्र अपिलार्थीस सुनावणीच्या दिवशीच दुपारी २.०० वा. प्राप्त झाले व त्यामुळे अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी ४.०० वा. सुनावणीसाठी उपस्थित राहू शकले नाहीत आणि केवळ अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत, म्हणून जन अपिलीय यांनी अपिलार्थीचे अपील, त्यांना म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी न देता, केवळ जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिल्याच्या पुराव्यावरुन, निकाली काढले. जन अपिलिय अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती आणि अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, याच कालावधीमध्ये या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत. सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे पत्र अपिलार्थीस सुनावणीच्या दिवसापूर्वी किमान दहा दिवस अगोदर प्राप्त होईल, असे जन अपिलीय अधिकारी यांनी पहावे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०९.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, द्वारा कनकदंडे निवास सरकारवाडा,अंबावेस, परळी (वै), जि.बीड- ४३१ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७१
निर्णय दिनांक १२-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अजित एम.देशमुख,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी संचालक,<br>रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि.,<br>भोकरदन जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सहसंचालक (साखर),<br>औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १८.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये शासनाच्या आदेशाच्या व नियमाच्या प्रतींचा समावेश नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची शिफारस त्यांच्या निर्णयामध्ये केलेली नसून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(२) व २०(१) प्रमाणे कारवाई करण्याचे व अधिनियमातील कलम ७(६) अनुसार अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ३०.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांना दि. १६.५.२००७ ते दि. ३०.८.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्याद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.१०.२००७ रोजीच्या त्यांच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि. १८.९.२००७ रोजीच्या त्यांच्या कार्यालयीन पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत योग्य ती माहिती दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दि. १८.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि या माहितीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या शासन आदेशाच्या अथवा अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयासंबंधी असलेल्या नियमांच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्या विषयाशी संबंधित कोणतेही निश्चित नियम विहित केले गेलेले नाहीत, मात्र एखाद्या कारखान्याच्या क्षेत्रात जर ऊसाचे उत्पादन जास्त झाले तर, जास्त ऊसाचे गाळप कशाप्रकारे करावयाचे यासंदर्भात २००६-०७ साली साखर संचालनालयाने काही मार्गदर्शनपर सूचना पारित

-                                                   -

केल्या होत्या, असे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांना यासंदर्भात असे सूचित करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये संदर्भित केलेल्या साखर संचालनालयाच्या सूचनेची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी, जेणेकरुन अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध होऊ शकेल.

अपिलार्थीने दि. ३०.८.२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. ८ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम ४ मध्ये स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती विचारली आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १८.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कोणतीही माहिती दिली नसल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव आपल्या कृतीद्वारे स्पष्ट केला असल्याने अध्यक्ष, रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि.भोकरदन, जि.जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती देण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष, रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि.,भोकरदन जि.जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

- -

**दिनांक : १२-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित एम. देशमुख,द्वारा गजानन किराणा स्टोअर्स,कारंजा रोड, बीड,४३११२२.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि.,भोकरदन जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि.,भोकरदन जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, अपिलार्थी
मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दिनांक ०९-०३-२००९ रोजीचे एक निवेदन सादर केले असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस

- -

आवश्यक असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०३-२००९ रोजी दाखविली असून या माहितीने अपिलार्थीचे पूर्ण समाधान झाले आहे व त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार राहिली नाही. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीचे दिनांक ०८-०३-२००९ रोजीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांनी आवश्यक ती माहिती पाहिली असून त्यांचे पूर्णपणे समाधान झाले असल्याचे व तसेच या अनुषंगाने त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे नमूद केले आहे व कार्यकारी अभियंता यांना त्यांचे प्रकरण निकाली काढण्याची विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या निवेदनावरुन व अपिलार्थीच्या दिनांक ०८-०३-२००९ रोजीच्या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या, त्यांनी आज रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या पुराव्याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पोहोचली असल्याचे अथवा त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ०८-०३-२००९ रोजी पाहावयास मिळाली आहे (प्रत्यक्ष उपलब्ध झाली नाही). अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाहण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त कालावधी गेल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

- -

२. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, अपिलार्थी
मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा
जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास केलेले एक निवेदन सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने अपिलासंदर्भात माहिती पाहिली असल्याचे व ही माहिती पाहून अपिलार्थीचे पूर्णपणे समाधान झाले असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या या

- -

विधानाप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीचे दिनांक ०६-०३-२००९ रोजीचे जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले व वीस रुपये इतक्या रकमेचे कोर्ट फी स्टॅम्प डकविलेले पत्र आयोगास सादर केले असून त्या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दिनांक ०६-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अवगत केली आहे व त्यांच्यासमोर ठेवली असता ही माहिती पाहून व वाचून त्यांचे समाधान झाले आहे व आता त्यांना कुठल्याही प्रकारच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीची गरज नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या या पुराव्याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत व अपिलार्थीने कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांना उद्देशून लिहिलेले पत्र पाहता अपिलार्थीस कोणत्याही कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीची गरज नाही असे त्यांनी या पत्रामध्ये म्हटले आहे, या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीच्या आयोगाकडे दाखल केलेल्या विचाराधीन अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास उरले नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

४ निर्णय नस्ती.

\- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक ७५/२००८, ७६/२००८ व ७७/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५, ७६ व ७७

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, अपिलार्थी
मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ७५/०८ व ७६/०८
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद,
उपविभाग, जालना

२ अपील क्रमांक ७७/०८
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद,
उपविभाग, परतूर, जिल्हा जालना

अपील क्रमांक ७५/०८, ७६/०८ व ७७/०८ प्रतिवादी
जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा
परिषद, जालना

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस प्रकरणांशी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

- -

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजीचे एक व दिनांक ११-०२-२००८ रोजी दाखल केलेली दोन अशी एकूण तीन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १३-०३-२००९ रोजीचे प्रत्येक अपिलाचे एक, अशी तीन पत्रे आयोगास सादर केली आहेत. या पत्रांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दाखविली आहे. त्यामुळे त्यांचे समाधान झाले असून यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार उरली नाही.

खुद्द अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अवलोकनार्थ प्राप्त झाली असल्याचे व त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार नसल्याचे वीस रुपयाच्या कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर लिहून दिले असल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जांवर निर्णय घेण्यासाठी आयोगास कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही. सबब अपिलार्थीची वरील तीनही अपिले (अपील क्रमांक ७५/२००८, ७६/२००८ व ७७/२००८) खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ७५/२००८, दिनांक २४-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ७६/२००८ दिनांक ११-०२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ७७/२००८ दिनांक ११-०२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४८१

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. मोतीराम गयबू काळे, अपिलार्थी

मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (महसूल),

तहसील कार्यालय, लोहा, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा,

जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २९-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असून अपिलार्थीची या संदर्भात कोणतीही तक्रार राहिली नाही. त्यांच्या या विधानाच्या पृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस लिहिलेले दिनांक १६-०१-२००८ रोजीचे पत्र आयोगास दाखविले. पत्राच्या मूळ प्रतीवर

- -

अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाली असल्याने राज्य माहिती आयोग, खंडपीठ, औरंगाबाद यांच्यासमोर अपिलार्थीने केलेले दिनांक २४-१२-२००७ रोजीचे अपील ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने हे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्रावर दिनांक १६-०१-२००८ रोजी दिले आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही हे पाहता व त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्रावर दिलेले अभिप्राय पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे. तसेच अपिलार्थी हे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेत आहेत. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर निर्णय घेण्यासाठी आयोगास कोणतेही प्रयोजन उरल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १३-०३-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**
**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २५१५/०७, २५१६/०७, २५१७/०७ व २५१८/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५१५/०७, २५१६/०७, २५१७/०७ व २५१८/०७

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल,
रामरहिमनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम,
चैतन्यनगर रोड, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. महमद जावेद, श्रीमती नाझेमा अंजुम (अपील क्रमांक २५१७/०७)

**<u>निर्णय</u>**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष (अपील क्रमांक २५१७/०७ च्या संदर्भात) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ व दिनांक १३-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दाखल केलेली प्रत्येकी दोन अशी चार अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. विचाराधीन अपील क्रमांक २५१५/०७ व २५१६/०७ या अपिलाशी संबंधीत मूळ अर्ज एकच असून एकाच अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीने दोन स्वतंत्र

अपिले आयोगाकडे केलेली आहेत. असाच प्रकार अपील क्रमांक २५१७/०७ व २५१८/०७ मध्ये झालेला आहे त्यामुळे या चारही अपिलांची एकत्रित सुनावणी आज रोजी घेण्यात येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने दिनांक १२-०३-२००९ रोजी ०४-४५ वाजता दूरध्वनीव्दारे त्यांच्या कार्यालयातील श्री. सय्यद यांच्यामार्फत निरोप देऊनही जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीसाठी हजर राहिले नाहीत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

या चारही व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींतर्गत मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, यांच्याकडे माहितीची मागणी केली असता त्यांना मुख्याध्यापकाकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनतुल उलुम संस्था, यांच्याकडे यासंदर्भात रजिस्टर्ड पोस्टाव्दारे प्रथम अपील केले असता प्रथम अपील अधिकारी यांनी त्यांची रजिस्ट्री घेण्यास नकार दिला. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत.

अपिलार्थीच्या या चारही व्दितीय अपील प्रकरणाशी संबंधीत त्यांनी केलेल्या माहितीच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती व स्वरुप लक्षात घेता आयोगास अपिलार्थीच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या चारही प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे या टप्प्यावर गरजेचे वाटते. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांची या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. हे पाहता, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या चारही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत त्यांनी सुनावणी घ्यावी व याच कालावधीमध्ये यासंदर्भातील आपले आदेश पारित करावेत. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश मान्य न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

-                    -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली चारही व्दितीय अपिले (अपील क्रमांक २५१५/०७, २५१६/०७, २५१७/०७ व २५१८/०७) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २५१५/०७, २५१६/०७, २५१७/०७ व २५१८/०७ ही निकाली काढण्यात येत आहेत.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या चारही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, रामरहिमनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या वरील अपिलासंदर्भातील चारही प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रती)

४ सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम, चैतन्यनगर रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५१९

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम
संस्था, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त,
नांदेड विभाग, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी विचाराधीन प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम संस्था, नांदेड यांच्याकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यासाठी जाणुनबुजून विलंब केला. या प्रकरणी त्यांनी प्रथम अपील सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे

दिनांक २८-०६-२००७ रोजी केले. या अपिलावर त्यांनी कोणत्याही प्रकारचा निकाल न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे अध्यक्ष, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम संस्था, नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत मार्च २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **जन माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक मदिनातुल उलुम हायस्कूल यांना नॉनसॅलरी ग्रॅन्टची रक्कम त्यांच्या संस्थेच्या खात्यामध्ये जमा करण्यासाठी दिनांक १७-०३-२००७ रोजी कोणत्या नियमाच्या आधारे पत्र लिहिले त्या नियमाची प्रत, शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या सर्वसाधारण सभेत अशा प्रकारे ठराव मंजूर झाला असल्यास व महानगरपालिकेचे मालमत्ता कर व बिल्डींग भाडे हे देण्याचे अधिकार शिक्षण संस्थेस आहे किंवा जिल्हा परिषदेला आहे -** ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांच्याकडूनही कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे केला त्यावेळी या कायद्याची त्यांना पुरेशी कल्पना नसल्याने अपिलार्थीस संस्थेकडून ही माहिती पुरविली गेली नाही. त्यामुळे त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे यासंदर्भात मार्गदर्शन मागितले होते. परंतु त्यावेळी अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील केल्याने अपिलार्थीस ही माहिती पुरविली गेली नाही. आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

- -

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही संबंधीत शिक्षण संस्थेच्या कार्यालयाशी संबंधीत आहे. उक्त शिक्षण संस्था ही स्वतः सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे शिक्षण संस्थेने आपल्या कार्यालयाकरिता स्वतंत्रपणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका करणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक होते. तथापि या प्रकरणी अशा प्रकारची कारवाई मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम संस्थेकडून वेळेत केली गेली नसल्याचे दिसून येते. आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या संस्थेचे सचिव हे जन माहिती अधिकारी असून संस्थेचे अध्यक्ष हे जन अपिलीय अधिकारी आहेत. या नेमणूका त्यांनी गतवर्षी केलेल्या आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत माहिती देण्यास तयार असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. तथापि सहायक धर्मादाय आयुक्त यांचा या प्रकरणाशी जन अपिलीय अधिकारी म्हणून कोणताही संबंध पोहोचत नाही. सर्वसाधारणतः जन अपिलीय अधिकारी हे संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी असावेत अशी तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये आहे. त्यामुळे अपिलार्थीस जर सहायक धर्मादाय आयुक्त यांच्यामार्फत या माहितीची आवश्यकता होती तर त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी माहितीसाठीचा प्रथम अर्ज करावयास हवा होता. तथापि या प्रकरणामध्ये असे घडले आहे की, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी या दोघांची प्राधिकरणे पूर्णतः वेगवेगळी असून या दोघांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरता माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून कोणताही संबंध पोहोचत नाही. सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दखल घेऊन अपिलार्थीस दिनांक १८-०७-२००७ रोजी, या प्रकरणी ते सक्षम प्राधिकरण नसल्याचे कळवून त्यांनी अपिलार्थीचा अर्ज अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-०७-२००७ रोजीच्या पत्राबरोबर परत पाठविला. तथापि सहायक धर्मादाय आयुक्तांचे दिनांक १८-०७-२००७ चे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसावे त्यामुळे सहायक

-                -

धर्मादाय आयुक्त यांनी निर्णय दिला नाही, असे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटले असावे, असे अनुमान काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम संस्था, नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, मॅनेजिंग कमेटी, मदरसे मदिनातुल उलुम संस्था, चैतन्यनगर रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २५२०/०७ व २५२१/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५२०/०७ व २५२१/०७

निर्णय दिनांक   १३-०३-२००९

१   श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,   अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २५२०/०७

१   जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सना उर्दू माध्यमिक शाळा व कनिष्ठ
महाविद्यालय, नांदेड

२   जन अपिलीय अधिकारी
तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर व एज्युकेशन सोसायटी, नांदेड

अपील क्रमांक २५२१/०७

१   जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा,
नांदेड

२   जन अपिलीय अधिकारी
तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर व एज्युकेशन सोसायटी, नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक २५२०/०७ व २५२१/०७ शी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

-   -

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने एकाच संस्थेसंदर्भात दोन स्वतंत्र प्रथम व व्दितीय अपिले अनुक्रमे दिनांक ०७-०७-२००७ व दिनांक १३-११-२००७ रोजी केली असल्याने या दोनही अपिलांची आज रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वरील प्रकरणाशी संबंधीत दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००७ रोजी दोन स्वतंत्र अर्जाव्दारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधीत माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे दिनांक ०७-०७-२००७ रोजी प्रथम अपील अर्ज केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जांची सुनावणी न घेता माहिती देण्यास जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत.

**<u>अपील क्रमांक २५२०/२००७</u>**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १६-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधीत शैक्षणिक वर्ष २००७-०८ संबंधीत काही माहिती साधारण टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आज सांगितले. तथापि अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा त्या आयोगास सादर करु शकल्या नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याचे आयोगातर्फे अनुमान काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे दिनांक ०७-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी

- -

अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राचा पुरावा म्हणून पोस्टाची रजिस्टर्ड पावती सादर केली आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०८-२००७ रोजी माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. तथापि हे पत्र देखील अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहितीची मागणी करत असतात व त्यांना माहितीसाठी आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केल्यानंतर या शुल्काचा भरणा न करता उलट जन माहिती अधिकारी यांना दमदाटी करत असतात. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

**<u>अपील क्रमांक २५२१/०७</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधीत शैक्षणिक वर्ष २००७-०८ या कालावधीतील काही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीचा दिनांक १६-०६-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १७-०७-२००७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याच्या संदर्भात आयोगास पोस्टाच्या रजिस्टर्ड पावतीची मूळ पावती दाखविली व तिची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. मात्र अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियामातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे दिनांक ०७-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

- -

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेला दिनांक ०७-०७-२००७ रोजीचा कथित अपील अर्ज त्यांच्याकडे अद्यापपावेतो प्राप्त झालेला नाही.

उपरोक्त दोनही अपील प्रकरणातील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या अपील क्रमांक २५२०/२००७ व २५२१/२००७ च्या संदर्भात अपिलार्थीच्या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि अपील क्रमांक २५२०/२००७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. मात्र अपील क्रमांक २५२१/२००७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. तसेच अपिलार्थीच्या दिनांक ०७-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाला जन अपिलीय अधिकारी यांनी अपील क्रमांक २५२०/२००७ च्या प्रकरणाशी संबंधीत, अपिलार्थीचे प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला तर अपील क्रमांक २५२१/२००७ च्या संदर्भातील अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. या दोनही प्रकरणात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासंदर्भात त्यांनी जोडलेल्या कागदपत्रामध्ये असे म्हटले आहे की, त्यांनी उपरोक्त दोनही प्रकरणात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागितली होती, तथापि अपील क्रमांक २५२१/२००७ च्या संदर्भात असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक १६-०७-२००७ रोजी अर्ज केला असून तदनंतर दिनांकातील महिन्यामध्ये खाडाखोड करुन सातच्या ऐवजी सहा अशी तारीख अपिलार्थीने टाकली आहे व तशी प्रत आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या वर्तनाबाबत आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा गैरवापर करुन संबंधीत संस्थेस वारंवार वेगवेगळ्या प्रकारे माहिती मागवून माहितीपोटीचे शुल्क न भरता उलट जन माहिती अधिकारी यांना धमक्या देतात. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच आयोगाकडे दाखल झालेल्या अपील अर्जांवरुन देखील अपिलार्थी या संस्थेकडे वारंवार मोठ्या व्याप्तीची माहिती मागवित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहिती अधिकार

- -

अधिनियमातील वापर करुन सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागवितांना विवेक बाळगावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मोघम स्वरुपात पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतर्फे आकारण्यात येणा-या फी च्या रकमेचा विशिष्ट उल्लेख केलेला आहे. मात्र अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार फी घेण्यात येते असे कळविले आहे. असे कळविण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या रकमेमध्ये दरवर्षी बदल होत असल्याने त्यांनी अपिलार्थीस नियमानुसार फी आकारण्यात येते असे कळविले. मात्र अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एका विशिष्ट कालावधीशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस विशिष्ट स्वरुपात दिली नाही. हे पाहता, दोनही जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले (अपील क्रमांक २५२०/२००७ व २५२१/२००७) अंशतः मान्य करण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २५२०/२००७ व २५२१/२००७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. दोनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

- -

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू माध्यमिक शाळा, व कनिष्ठ महाविद्यालय, नोमानीया नगर, तरोडा (बु.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर व एज्युकेशन सोसायटी, नोमानीया नगर, तरोडा (बु.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानीया नगर, तरोडा (बु.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५२२

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका
मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड, मार्फत
नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टामार्फत पाठवूनही त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती दिली नाही. त्यासाठी त्यांनी दिनांक १३-०८-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही त्यांना अद्यापपावेतो संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या

- -

शाळेशी संबंधीत सन २००१ ते ३१ मार्च २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. शिक्षण संचालनालयाच्या पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अनुसार शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांची नांदेड जिल्ह्यातील शाळेकडील माहितीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झ ाली असल्याने, शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. सुनावणीची नोटीस अपिलार्थीस नियोजित सुनावणीच्या दिनांकापूर्वी किमान ८ दिवस अगोदर प्राप्त होईल असे जन अपिलीय अधिकारी यांनी पहावे. त्यांना असेही निर्देशित करण्यात येत आहे की, या आदेशासोबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना प्रत्येकी एक याप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या दोन झेरॉक्स प्रती त्यांना पाठविण्यात येत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

- -

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या दोन प्रती)

४ सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड, मार्फत नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २५२३/०७ व २५२४/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५२३ व २५२४

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २५२३/०७ व २५२४/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा,
मौजे हाणेगांव, तालुका देगलूर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, मार्फत मौलाना आझ
ाद उर्दू प्राथमिक शाळा, मौजे हाणेगांव, तालुका देगलूर,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, दोनही अपील प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी एकाच संस्थेच्या संदर्भात नोंदविलेली दोन स्वतंत्र अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

- -

या दोनही अपील प्रकरणी अपिलार्थीने एकाच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दोन वेगवेगळ्या स्वतंत्र माहिती अर्जाव्दारे माहिती मागविली असल्याने व प्रथम अर्ज व प्रथम अपील यांचा दिनांक एकच असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, यांच्याकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी प्रथम अपील रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपिले केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मुख्याध्यापक, मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा, मौजे हाणेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या त्यांच्या दोन स्वतंत्र मूळ अर्जाव्दारे त्यांच्या शाळेच्या संबंधात काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०८-२००७ रोजी प्रथम अपिले केली. हे अपील अर्ज त्यांनी दिनांक १६-०८-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या दोनही अपील अर्जावर निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या लेखी नोटिशीव्यतिरिक्त दिनांक १३-०३-२००९ रोजी संध्याकाळी ५-४५ वाजता दूरध्वनीव्दारे श्री. व्यंकटेश पाटील, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देगलूर यांच्यामार्फत निरोप देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आज सुनावणीसाठी उपस्थित नाहीत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून सुनावणी होणे आयोगास या

-                                                    -

टप्प्यावर गरजेचे वाटते. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८) ६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये शिक्षण संस्थेशी संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक / प्राथमिक) यांची नेमणूक केली आहे. हे पाहता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच, झ ालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार ते सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले (अपील क्रमांक २५२३/२००७ व २५२४/२००७) निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २५२३/२००७ व २५२४/२००७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या दोन प्रथम अपील अर्जांवर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा, मौजे हाणेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत अपिलार्थीच्या दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या दोन प्रती)

४ सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, मार्फत मौलाना आझाद उर्दू प्राथमिक शाळा, मौजे हाणेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २५२५/०७ व २५२६/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५२५ व २५२६

निर्णय दिनांक १३-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २५२५/०७ व २५२६/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक / प्राचार्य,
इंदिराबाई देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, हाणेगांव, तालुका
देगलूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, देगलूर मार्फत
इंदिराबाई देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, हाणेगांव, तालुका
देगलूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, दोनही अपील प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी एकाच संस्थेच्या संदर्भात नोंदविलेली दोन स्वतंत्र अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

- -

या दोनही अपील अर्जांचे अवलोकन करता असे दिसून येते की, दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या एकाच मूळ माहितीच्या अर्जावर दिनांक ०१-०८-२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले व दिनांक १३-११-२००७ रोजी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत. या साधर्म्यामुळे या अपिलांची एकत्रित सुनावणी आज रोजी घेण्यात येत आहे.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २८-०६-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज पाठवून मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, देगलूर यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००७ रोजी प्रथम अपिले केली होती. तथापि त्यांच्या या अपिलासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलांची सुनावणी न घेता प्रकरणे प्रलंबीत ठेवल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधीत सन २००५ ते २००७-०८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जांस कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००७ रोजी प्रथम अपिले केली.

अपिलार्थीने अपील अर्ज करतेवेळी संबंधीत शिक्षण संस्थेचे सचिव यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले होते. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीचे प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले किंवा कसे यासंदर्भात आयोगास योग्य त्या पुराव्याअभावी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे कोणतेही अनुमान काढता येत नाही.

आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८) ६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये शिक्षण संस्थेशी संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिका-याची नेमणूक केली गेली आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-

-   -

२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी होणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. सबब, शिक्षणाधिकारी (माध्यमिक / प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत. (सुलभ संदर्भाकरिता जन अपिलीय अधिकारी यांना या निर्णयाबरोबर अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांच्या प्रती पाठविण्यात येत आहेत) जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार ते, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे, व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले (अपील क्रमांक २५२५/२००७ व २५२६/२००७) निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २५२५/२००७ व २५२६/२००७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक / प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००७ रोजीच्या दोन प्रथम अपील अर्जांवर झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

- -

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक / प्राचार्य, इंदिराबाई देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, हाणेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ शिक्षणाधिकारी (माध्यमिक / प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांच्या प्रती)

४ सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, देगलूर मार्फत इंदिराबाई देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, हाणेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २०१३/०७, २०१४/०७, २०१५/०७ व २०१७/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०१३/०७, २०१४/०७, २०१५/०७ व २०१७/०७

निर्णय दिनांक १६-०३-२००९

१ सौ. कोमल एस. विटेकर, अपिलार्थी

प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळूज महानगर,

औरंगाबाद

**विरुध्द**

अपील क्रमांक २०१३/०७, २०१४/०७, २०१५/०७ व २०१७/०७

जन माहिती अधिकारी

१ तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी,

औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद |

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०६-२००७ रोजी दाखल झालेली वरील चार व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीनुसार त्यांनी ठेवलेल्या सुनावणीमध्ये निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे केलेली आहेत.

उपरोक्त चारही प्रकरणाशी संबंधीत आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता असे दिसून येते की, या चारही प्रकरणी अपिलार्थीने एकाच दिवशी माहितीसाठीचे प्रथम अर्ज एकाच दिवशी चारही मूळ अर्जांसंदर्भात एकच प्रथम अपील व एकाच दिवशी राज्य माहिती आयोगाकडे चार स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केली असल्याने आणि सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती एकसारखीच असल्याने या अपिलांची आयोगातर्फे एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **या गावांमध्ये गटनिहाय झालेल्या कामावरील सर्व मजुरांची रोजगार पत्रिका, लॅमिनेटेड जॉबकॉर्ड, ओळखपत्रांचा क्रमांक, पोस्ट बँक खाते क्रमांक, तसेच राष्ट्रीयकृत बँकेचे नांव, ठिकाण व मजुरांची नांवे लिहिलेले हजेरीपट आणि मोजमाप पुस्तिका** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १७-०२-२००७ रोजी अर्ज करुन दिनांक २०-०२-२००७ पर्यंतची म्हणजेच भविष्यकाळातील माहिती विचारली असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले व या व्यतिरिक्त अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत छायांकीत प्रतींची संख्या भरपूर असल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (९) नुसार एवढी माहिती एकाच वेळी देणे शक्य नाही. तथापि त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती तयार असून अपिलार्थीस ही माहिती पाहण्यासाठी सूचित केले. तसेच अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी पुरविण्यात येणा-या माहितीच्या छायांकीत प्रतीसाठी प्रतिपृष्ठ दोन रुपये याप्रमाणे चलनाव्दारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर परत अपिलार्थीस दिनांक २८-०२-२००७ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे शुल्काच्या रकमेचा भरणा करण्याचे सूचविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०३-२००७ रोजी या मूळ अर्जांसंदर्भात एकच प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेले रजिस्टर्ड पत्र त्यांनी स्वीकृत न केल्याने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १७-०२-२००७ रोजीचे पत्र स्वीकृत करुन त्या पत्रातील सूचनेप्रमाणे कारवाई करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तदनंतर दिनांक १०-०५-२००७ रोजी सुनावणी घेऊन या सुनावणीचा इतिवृत्तांत तयार करुन ठेवला व या इतिवृत्तांताची प्रत अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००७ रोजी पोस्टाने पाठविली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही ठोस निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्या वारंवार गेल्या असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत संबंधित कर्मचारी उपस्थित नसतात. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून जन माहिती अधिकारी यांनी वंचित ठेवल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार शास्ती लावावी. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०३-२००७ रोजी त्या माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता उपस्थित राहिल्याचा आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगास सादर केला आहे. तसेच त्यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीची निश्चितपणे किती रक्कम भरावयाची याची विचारणा केली असता या पत्राचे उत्तर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या अर्जामध्ये त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे मजुरांची नांवे व मोजमाप पुस्तिका एवढीच माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असते. कामावरील सर्व मजुरांच्या रोजगार पत्रिका या संबंधीत गावच्या ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असतात व मजुरांचे जॉबकार्ड, ओळखपत्र व बँक खाते क्रमांक, राष्ट्रीय बँकेचे नांव व ठिकाण ही संपूर्ण माहिती मजूरांकडे उपलब्ध असते.

- -

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थींच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी दिनांक २८-०२-२००७ रोजी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी तो चुकीचा आहे, कारण या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क व या शुल्काचा तपशील, जो त्यांना अधिनियामतील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे अनिवार्य होते, तो तपशील अपिलार्थींस पुरविला नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागवून त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०३-२००७ रोजी उपस्थित राहिल्याचा आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने त्यांचे दिनांक १७-०२-२००७ रोजीचे पत्र स्वीकृत केले नसल्याचे नमूद केले आहे. तथापि या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींस फक्त त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ दोन रुपये इतके चलनाव्दारे त्यांच्या खाती भरण्याचे सूचित केले आहे, मात्र अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अंदाजे किती पृष्ठांची आहे व या पोटी अपिलार्थींस भराव्या लागणा-या शुल्काचा उल्लेख त्यामध्ये आढळून येत नाही. यावरुन अपिलार्थींस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे त्यांनी निश्चित किती शुल्क भरावयाचे याची कल्पना न आल्याने अपिलार्थी हे शुल्क शासकीय कोषागारात भरु शकल्या नाहीत. हे सर्व पाहता, या प्रकरणी अपिलार्थींस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी अपिलार्थींस दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद चुकीचा सिध्द होत असल्याने त्यांना अपिलार्थींस ही संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी लागेल. तसेच अपिलार्थींचा मूळ अर्ज त्यांनी आता संबंधीत ग्रामपंचायतीकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थींस देणे भाग आहे, ही कृती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत करावी. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, मार्च महिन्यातील कामाची गर्दी हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याची आयोगाकडे विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थींस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक टप्प्यावर तयारी दर्शविली आहे.

-                                    -

अपिलार्थीस या प्रकरणी कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारले नाही. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविलेल्या पत्राचा स्वीकार केला नाही, हे देखील या प्रकरणी सिध्द झाले असल्याने अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची मागणी आयोग मान्य करीत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ माहितीमध्ये काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष संबंधीत नव्हती. ही माहिती संबंधीत मजुरांकडे व संबंधीत ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून, अधिनियमाताील कलम ६ (३) (एक) प्रमाणे, पाच दिवसाच्या आत संबंधीत ग्रामपंचायतीकडे पाठविणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करुन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले (अपील क्रमांक २०१३/०७, २०१४/०७, २०१५/०७ व २०१७/०७) अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक २०१३/०७, २०१४/०७, २०१५/०७ व २०१७/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जांव्दारे मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जांची प्रत संबंधीत ग्रामपंचायतीकडे हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत पाठवावी.

-                    -

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कोमल एस. विटेकर, प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळूज महानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २४५२/०७, २४५३/०७, २४५४/०७, २४५५/०७ व २४५६/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५२/०७, २४५३/०७, २४५४/०७, २४५५/०७ व २४५६/०७

निर्णय दिनांक १६-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

अपील क्रमांक २४५२/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू,
जिल्हा परभणी

अपील क्रमांक २४५३/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम,
जिल्हा परभणी

अपील क्रमांक २४५४/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

- -

तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड,

जिल्हा परभणी

<u>अपील क्रमांक २४५५/०७</u>

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ,

जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी(महसूल), परभणी

<u>अपील क्रमांक २४५६/०७</u>

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी,

जिल्हा परभणी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| त्रयस्थ पक्ष | (२४५२/०७) | : | १ | श्री. हरि किशन राधेशाम |
| | | | २ | श्री. सुरेंद्र तोष्णीवाल |
| | (२४५३/०७) | : | १ | श्री. राधाकिसन सखाराम |
| | | | २ | महेश ट्रेडिंग कंपनी |
| | | | ३ | श्री. नारलेवार |
| | (२४५४/०७) | : | १ | श्री. गुंडाळे |
| | | | २ | श्री. राठोड |
| | | | ३ | श्री. प्रभाकर रामलिंगप्पा |
| | | | ४ | श्रीमती रेवनवार |
| | (२४५५/०७) | : | १ | श्री. अब्दुल कादर |
| | | | २ | श्री. मुस्तफा बंदेमिया |
| | | | ३ | श्री. दाते |
| | | | ४ | मे. श्रीकृष्ण किराणा स्टोअर्स |

- -

(२४५६/०७) : १ श्री. वट्टमवार
२ श्री. कत्रुवार
३ श्री. अग्रवाल

## निर्णय

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालीलप्रमाणे हजर / गैरहजर आहेत.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी | त्रयस्थ पक्ष |
|---|---|---|---|---|
| १ | २४५२/०७ | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |
| २ | २४५३/०७ | प्रतिनिधी हजर | गैरहजर | सर्व हजर |
| ३ | २४५४/०७ | हजर | गैरहजर | तीन हजर |
| ४ | २४५५/०७ | हजर | गैरहजर | सर्व हजर |
| ५ | २४५६/०७ | हजर | हजर | एक हजर |

तर अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दाखल केलेली एकूण पाच व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. या सर्व अपील अर्जाशी संबंधीत मूळ माहितीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने ०१-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाव्दारे सर्व जन माहिती अधिकारी यांना त्रयस्थ पक्षांशी संबंधीत एकाच प्रकारची काही माहिती मागितली होती. तसेच या प्रकरणाच्या संबंधाने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक २४५३/०७ वगळता दिनांक १५-०६-२००७ रोजी प्रथम अपिले केली आहेत. अपील क्रमांक २४५३/०७ शी संबंधित प्रथम अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००७ रोजी केले आहे. सर्व अपिलातील या समान बाबी पाहता या अपिलांची एकत्रित सुनावणी आज घेण्यात येत आहे.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीची मागणी करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०६-२००७ रोजी प्रथम अपिले (अपील क्रमांक २४५३/०७ च्या संदर्भात दिनांक १२-०६-२००७ रोजी) केली असता मुदत संपल्यानंतरही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व माहिती देण्यासाठी विलंब व टाळाटाळ होत असल्याने त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत.

- -

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचे दिनांक ०१-०५-२००७ रोजीचे माहितीसाठीचे प्रथम अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाव्दारे पाठविले आहेत. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले केली. या अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलातील अपील क्रमांक २४५५/०७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सोनपेठ यांच्याकडून दिनांक १२-०३-२००८ रोजी म्हणजेच अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर माहिती मिळाल्याने अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यासाठी तहसीलदार, सोनपेठ यांना विनंती केली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे अपील क्रमांक २४५५/०७ ची सुनावणी घेण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील क्रमांक २४५५/०७ हे खारीज करण्यात येत आहे. मात्र उर्वरित सर्व अपिलांसंदर्भात सर्व जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या त्यांच्याशी संबंधित दिनांक १५-०६-२००७ व दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास अपिलार्थी अधिनियामातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करु शकतील. ही सुनावणी घेत असतांना अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदींचे पालन होईल याची दक्षता जन अपिलीय अधिकारी यांनी घेणे गरजेचे आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २४५५/०७ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक २४५२/०७, २४५३/०७, २४५४/०७ व २४५६/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

- -

२. अपील क्रमांक २४५२/०७, २४५३/०७, २४५४/०७ व २४५६/०७ शी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या प्रकरणी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

११ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७२

निर्णय दिनांक १६-०३-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल सुर्यकांतराव बिडवई,<br>४, विद्यानगर, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,<br>नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,<br>लातूर विभाग, लातूर | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : १ सचिव, श्री. स्वामी विवेकानंद प्रा. आश्रमशाळा वाघाळा
२ सचिव, महात्मा फुले माध्य. आश्रमशाळा, वाघाळा

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत माहिती न मिळाल्याने केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

- -

**- स्वामी विवेकानंद प्राथमिक आश्रमशाळा, वाघाळा, तालुका नांदेड व महात्मा फुले माध्यमिक आश्रमशाळा, वाघाळा, तालुका नांदेड या शाळांच्या सुरुवातीपासून दिनांक २६-०७-२००७ पर्यंत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पदस्थापनेसाठी किती लोकांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते, यापैकी किती लोकांचे प्रस्ताव मंजूर झाले व नामंजूर झालेल्या लोकांचे संपूर्ण नांव व पत्ता सविस्तर माहिती सह** - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. मात्र हा अपील अर्ज त्यांनी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयात सादर केला. त्या कार्यालयाने या प्रकरणाशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांच्या कार्यालयाकडे न पाठविता तो विनाकारवाई स्वतःकडेच ठेऊन घेतला. परिणामी अपिलार्थी आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिले व त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस परस्पर दिनांक ११-१०-२००७ व दिनांक २७-१०-२००७ रोजी व्यक्तिशः पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे आयोगाने मागितला असता जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाने परस्पर माहिती पुरविली असल्याने सदरचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक ०५-१०-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ते निर्णय घेऊ शकले नाहीत.

- -

अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागितलेली माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने या प्रकरणी त्रयस्थ पक्षाची अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वामी विवेकानंद प्राथमिक आश्रमशाळा, वाघाळा व महात्मा फुले माध्यमिक आश्रमशाळा, वाघाळा या दोन आश्रमशाळेशी संबंधीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदस्थापनेसंदर्भात माहिती मागितली होती. आश्रमशाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या नेमणुकांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मान्यता दिली जाते. हे पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असूनही त्यांनी संबंधीत आश्रमशाळेच्या मुख्यध्यापकांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सूचित करण्याची त्यांची कृती सर्वथा गैर व चूकीची आहे. तसेच अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्रत्यक्षतः प्राप्त झाली किंवा कसे यासंदर्भातही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे कोणतीही माहिती अथवा पुरावा उपलब्ध करुन तयार ठेवला नसल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट झाले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच शाळेच्या मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि आता सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस येथे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करणे त्यांना अनिवार्य आहे.

- -

या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद न देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असूनही ती अपिलार्थीस संबधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडून उपलब्ध करुन घेण्याच्या सूचना दिल्या. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यास टाळाटाळ करणे, अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद न देणे, स्वतःकडे माहिती असतांना मुख्याध्यापकास माहिती देण्यास सांगणे आणि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचे प्रथम अपील न पाठविणे या कृतीव्दारे जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन, स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले असल्याने सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. ए. आर. देशवटवार, सध्या संशोधन अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था, पुणे या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी (श्री. ए. आर. देशवटवार, सध्या संशोधन अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था, पुणे या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- -

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल सुर्यकांतराव बिडवई, ४, विद्यानगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३६
निर्णय दिनांक १७-०३-२००९

१ श्री. बबन बंडू शिंदे, : अपिलार्थी
मु.पो.बाजारसावंगी, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
बालविकास प्रकल्प अधिकारी,
खुलताबाद, जि.औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या विनादिनांकाच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित पूरक पोषण आहार योजनेसंदर्भात एकूण १५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. १८.६.२००७

- -

रोजी प्राप्त झाला. या अर्जास त्यांनी दि. २७.६.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ही माहिती त्यांच्या कार्यालयात दि. १०.७.२००७ रोजी सकाळी ११.०० वा. उपस्थित राहून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. परंतु जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १०.७.२००७ रोजी उपस्थित राहिल्यानंतर दुपारी २.०० वाजेपर्यंत जन माहिती अधिकारी हे कार्यालयात न आल्यामुळे अपिलार्थीने आपल्या उपस्थितीची नोंद त्यांच्या कार्यालयात करुन अपिलार्थी कोणत्याही माहितीशिवाय जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून परत गेले व त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.८.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३.९.२००७ रोजी माहिती पुरविली, तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,४,६,८,१०,१३ व १५ बाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही, या मुद्यांच्या माहितीचा त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ३.९.२००७ रोजी प्राप्त झालेल्या माहितीमध्ये समावेश नव्हता. या माहितीची त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजही आवश्यकता आहे. त्यांना विलंबाने माहिती मिळाल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस अद्यापपर्यंत न दिलेली माहिती आता त्या अपिलार्थीस विनामूल्य सात दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने त्यांनी

-                                                  -

अपिलार्थीस माहिती न पुरविता ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूरक पोषण आहार योजनेसंदर्भात एकूण १५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. यापैकी काही मुद्यांवर माहिती त्यांना मिळाली असून त्यांना अद्याप मुद्दा क्र. १,२,४,६,८,१०,१३ व १५ या मुद्यांशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यांचे परीक्षण केल्यास असे दिसून येते की, अपिलार्थीस यापैकी मुद्दा क्र. १,१३ व १५च्या संदर्भातील माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कामकाजातील निर्णयाविषयी खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित केल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या निर्णयाबद्दल खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागणे त्यांना अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या स्पष्टपणे उद्‌धृत करण्यात आली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही अर्जदाराने या कायद्यातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात अथवा न देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने या मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,१३ व १५ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १० द्वारे अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे, याचा बोध होत नसल्याने व ती स्पष्ट स्वरुपात नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून याही मुद्यावरील माहिती

देय होत नाही. मात्र मुद्दा क्र. २,४,६ व ८ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस देणे भाग आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात आयोगास असे अवगत केले की, पोषण आहाराचा ठेका अकरा महिन्यांचा असतो, प्रतिलाभार्थी सरासरी ८० ग्रॅम आहार देण्यात येतो तसेच पोषण आहाराच्या तपासणीची कोणतीही पध्दत अद्यापपावेतो निश्चित केली गेलेली नाही आणि या आहाराव्यतिरिक्त लाभधारकांना इतर काही वस्तू मिळत नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे अशाप्रकारे अपिलार्थीस अद्याप न मिळालेली माहिती त्यांच्या युक्तिवादामध्ये दिली आहे. मात्र हीच माहिती त्यांनी लिखीत स्वरुपात अपिलार्थीस केवळ ती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे, म्हणून उपलब्ध करुन दिली नाही, ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून घडलेली अनियमितता आहे, असे मानण्यात येत आहे. केवळ अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रत्येक मुद्यासमोर प्रश्नचिन्ह लावल्यामुळे ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी पाहता, जन माहिती अधिकारी यांचे कामकाज अधिकाधिक पारदर्शक कसे होऊ शकेल, याच्या अनुषंगाने या अधिनियमामध्ये तरतुदी केल्या गेल्या आहेत. अपिलार्थीने माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असली तरी या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांच्याकडील ज्या अभिलेख्यांमध्ये उपलब्ध आहेत, अशा कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी पुरविणे येथे सुसंगत राहिले असते, तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती त्यांनी केली नाही. एवढेच नव्हेतर अपिलार्थीस दि. १०.७.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात माहिती पाहण्यासाठी बोलावून जन माहिती अधिकारी या त्या वेळी त्यांच्या कार्यालयात अनुपस्थित राहिल्या. जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, खुलताबाद यांना असे आदेशित करण्यात येते की,

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,४,६ व ८ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. २,४,६ व ८ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, खुलताबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बबन बंडू शिंदे, मु.पो. बाजारसावंगी ता. खुलताबाद जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी

- -

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३७
निर्णय दिनांक १७-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गंगाधर कडाजी वायाळ,<br>मु.पो. पांगरी बू. ता.मंठा,जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग परतूर,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>जालना. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित मौ. किनखेडा ता. मंठा जि. जालना येथील

ग.क्र.२५,८६ व ५५ मध्ये सुरु असलेले गाव तलाव/पाझर तलावाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - काम करणाऱ्या मजूरांची नावे, कामाचे मूल्य, रोख व धान्य स्वरुपात,सदर धान्य व रोख रक्कम किती व केव्हा देण्यात आली, मौजे किनखेडा येथे गट नं. २५,८६, ५५ बुडीत क्षेत्रात सरकारी रस्ता/गाडी रस्ता जातो काय?, सदर सरकारी रस्त्यास पर्यायी रस्ता भूसंपादन करुन जिल्हाधिकारी यांनी दिला आहे काय? - या मुद्यांचा समावेश होता. ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि. ३.७.२००७ व दि. ११.७.२००७ रोजी व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा योग्य तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला आहे व तसेच या मुदतीनंतर दि. ३०.७.२००७ व ८.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे सादर केला असल्याने अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.८.२००७ रोजीचा त्यांचा प्रथम अपील अर्ज दि. २१.८.२००७ रोजी सादर केला. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा या संदर्भात कोणताही निर्णय पारित न केल्याने अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध होण्यापासून अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित राहिले व यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करते वेळी ते या पदावर कार्यरत नसल्याचे आयोगास अवगत करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार करण्यात आलेल्या अपील अर्जावर सुनावणी घेताना काही अर्जदारांनी कार्यालयात गोंधळ घातल्याने त्यांच्या कार्यालयाने अशाप्रकारच्या अपिलांवर सुनावणी न घेण्याचे धोरण अवलंबिले होते तसेच या प्रकरणी त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार करुनही त्याचा कोणताही उपयोग झाला नाही, असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीने बुडीत रस्त्याविषयी विचारलेल्या माहिती व्यतिरिक्त उर्वरित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने किनखेडा येथील पाझर तलावाच्या संदर्भात बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या रस्त्याविषयी मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणारी असल्याने, ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही.याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या उर्वरित माहितीची व्याप्ती अशा मोठया स्वरुपाची नव्हती की, ती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामुग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागला असता, असेही या प्रकरणी आयोगाच्या निदर्शनास येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसांच्या आत देण्याचे कबूल केले आहे. हे पाहता, अपिलार्थीस अधिनियमाद्वारे

विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न होण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. एस.ई.मोरवाल सध्या घनसावंगी येथे कार्यरत) हे जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयामध्ये घेण्यात येणाऱ्या सुनावणीचे वेळी काही अर्जदारांनी कार्यालयीन कामकाजामध्ये व्यत्यय आणून गोंधळ घातला व परिणामी अपिलाची सुनावणी होऊ शकली नाही, अशी घटना घडल्याचे व यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडे आवश्यक तो पत्रव्यवहार करुनही त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही, असे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी आयोगाच्या निदर्शनास आणलेली ही बाब निश्चितपणे गंभीर असल्याचे आयोगास वाटते. जर जिल्हा पोलीस यंत्रणेकडून शासनाच्या क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना अशाप्रकरणी कोणतेही संरक्षण दिले जात नसेल तर माहिती अधिकार अधिनियमाची अपेक्षित अंमलबजावणी होणे दुरापास्त आहे, असे आयोगास वाटते. तेव्हा या प्रकरणी पोलीस महासंचालक यांना आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणाची त्यांच्या स्तरावर चौकशी करुन कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) जालना यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना

- -

यांच्याकडे केलेल्या संबंधित अर्जदाराने घातलेल्या गोंधळाच्या प्रकरणाच्या संबंधाने कार्यवाही का केली नाही व येथून पुढे अशाप्रकारच्या घटना घडल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक कशाप्रकारे कार्यवाही करु शकतील या मुद्यावर आपला अहवाल आयोगास नव्वद दिवसांच्या आत सादर करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा केवळ काही प्रकरणात अर्जदारांनी घातलेल्या गोंधळाच्या प्रकरणाच्या पार्श्र्वभूमीवर त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या इतर कोणत्याही प्रथम अपिलावर सुनावणी न घेण्याचा निर्णय व कृती बरोबर नसून त्यांनी यापुढे त्यांना आवश्यक वाटल्यास जिल्हयातील पोलीस यंत्रणेचे सहकार्य घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर सुनावणी घेण्याचे काम चालू ठेवावे, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.
४. पोलीस महासंचालक, मुंबई यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्त.) जालना यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडे या

प्रकरणी केलेल्या विनंतीस अनुसरुन का कार्यवाही झाली नाही व येथून पुढे कोणती कार्यवाही करण्यात येईल, यासंदर्भातील आपला अहवाल आयोगास नव्वद दिवसांच्या आत सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वायाळ गंगाधरराव कडाजी, मु.पो. पांगरी बू. ता.मंठा जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३८
निर्णय दिनांक १७-०३-२००९

१ श्री. शंकर मारुती इंगळे, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नगररचनाकार,नांदेड-वाघाळा शहर
महानगरपालिका,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक संचालक, नांदेड-वाघाळा शहर
महानगरपालिका ,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, ते आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क भरावयास तयार असताना सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारले नाही, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसांत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात अधिनियमातील कलम ६(३) नुसार दुसऱ्या विभागाकडे त्यांचा अर्ज पाठविला नाही व अयोग्य कारणास्तव त्यांनी मागणी केलेली माहिती फेटाळली. या अर्जामध्ये अपिलार्थीने असेही म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.

- -

७.९.२००७ रोजीच्या आदेशाचे देखील जन माहिती अधिकारी यांनी पालन न केल्याने आता त्यांना अधिनियमातील कलम ७(६) नुसार त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य मिळावी व अपील करण्यास लागलेला व सुनावणीस हजर होण्यास त्यांना लागलेला खर्च जन माहिती अधिकारी व सहायक आयुक्त यांच्याकडून मिळावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण ११ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ व ६ शी संबंधित माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस, 'संचिका क्रमांक, बांधकाम परवानगीधारकाचे नाव', हा तपशील त्यांना कळविण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शुल्काचा भरणा करण्याकरिता उपस्थित राहिले, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती तयार नसल्याचे सांगून अपिलार्थीने पैसे भरल्यानंतर माहिती तयार करुन देण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले व तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे पावती पुस्तिका नसल्यामुळे पैसे स्वीकारता येणार नसल्याचे अपिलार्थीस सांगितले. अपिलार्थीने या सर्व बाबी लिखीत स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३०.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सादर केल्या असून अपिलार्थीचे हे दि. ३०.७.२००७ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून यासंदर्भात अपिलार्थीस परत दि. ६.८.२००७ रोजी प्रतिसाद प्राप्त झाला. यामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४०/- इतक्या रकमेचा लेखाविभागात भरणा करण्याचे सूचित केले व ही पावती सादर केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे

- -

आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र अपिलार्थीस दि. ९.८.२००७ रोजी प्राप्त झाले. त्यावेळी अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ९.८.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.९.२००७ रोजी आपला निर्णय घेऊन त्यासंदर्भातील आदेश दि. १४.९.२००७ रोजी निर्गमित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ६(३) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जातील जी माहिती दुसऱ्या प्राधिकरणाशी संबंधित आहे, त्या माहितीसाठी अपिलार्थीचा अर्ज त्या प्राधिकरणाकडे पाठविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. ७ व ९ ची अपूर्ण माहिती प्राप्त झाली असून इतर कोणत्याही मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही, ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती देण्यासाठी हेतुपूरस्सर विलंब लावला गेला व ते माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. ७ व ८ शी संबंधित माहिती दुसऱ्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती, ती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ६.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन शुल्काचा तपशील अपिलार्थीस कळविला आहे. तथापि हे शुल्क निश्चितपणे कसे व कोठे

-                    -

भरावयाचे, याचा तपशील  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. या बाबी निदर्शनास आल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे हा तपशील कळविला. यानंतरही अपिलार्थीने शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देताना अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैसे भरण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिल्यानंतरही पावतीपुस्तिकेच्या अनुपलब्धतेमुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे शुल्क स्वीकारण्यास नकार दिला, या मुद्यावर त्यांनी कोणतेही भाष्य केले नाही. या प्रकरणी मुख्यतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील दुसऱ्या प्राधिकरणाशी संबंधित असलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) द्वारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही, त्यामुळे जरी अपिलार्थीने या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा केला असता  तरीही  अपिलार्थीस  अपूर्ण  माहिती प्राप्त झाली असती, हे उघड आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती देणे त्यांना अनिवार्य आहे, ही तरतुद पाहता व जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) चा केलेला भंग पाहता या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

-                -

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर मारुती इंगळे,रा. आनंदनगर चौक, नांदेड-४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३९
निर्णय दिनांक १७-०३-२००९

१ श्री. विलास धुळप्पा काकनाळे, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहा. शिक्षण संचालक,
उपसंचालक कार्यालय, लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक,
लातूर.

**त्रयस्थ पक्ष :-** १) श्री.शेटे
२) श्री.जालनापूरकर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व संबंधित संस्थेचे सचिव उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे दिनांक १४-०९-२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्रयस्थ पक्ष श्री.काकनाळे, श्री.शेटे व श्री. जालनापुरकर यांची शिक्षण सेवक मान्यता व २००२ पासून सेवा ग्राहय धरुन कायम करण्याबाबत संबंधित शिक्षण संस्थेने शिक्षण उपसंचालक यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावातील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींची मागणी अपिलार्थीने कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १३.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीसंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मूळ अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास दि. १७.७.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले व त्यांच्या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी हे महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत, असे त्यांना अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्याकडे माहिती मागितली असता, संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी दि. २५.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती दिल्यास ग्रिव्हन्स कमिटीच्या औरंगाबाद ब्रँच या न्यायालयाच्या कामकाजात दखल दिल्यासारखे होईल, असे वाटल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. मात्र न्यायालयाच्या निकालानंतर माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस त्यांनी आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी,उदगीर यांच्याकडे दि. ०८.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर संस्थेच्या सचिवांनी दि. १६.८.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेप्रमाणेच भूमिका घेऊन, आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही. या सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता, त्यामुळे त्यांना या प्रकरणी ज्या माहितीची आवश्यकता आहे, ती माहिती शिक्षण

उपसंचालक कार्यालयातूनच त्यांना प्राप्त होणे गरजेचे आहे. कारण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, उदगीर यांनी त्यांना याच विषयावर दिलेली माहिती त्यांच्या मागणीशी विसंगत व अपूर्ण आहे.

आज रोजी सुनावणीस शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित असून त्यांच्याकडे संबंधित शिक्षण संस्थेने सदर कार्यालयातील त्रयस्थ पक्षाच्या मान्यतेचे प्रस्ताव मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत असे दिसून येते. ही नस्ती अपिलार्थीने अवलोकन केली असून अपिलार्थीस संबंधित शिक्षण संस्थेने यातील काही माहिती पुरविली नसल्याचे सिध्द झाले आहे. शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आता तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता, आता अपिलार्थीस विचाराधीन अपील प्रकरणी संपूर्ण माहिती प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.	श्री. विलास धुळप्पा काकनाळे, द्वारा ढगे निवास,शिवनगर,बिदर रोड,उदगीर जि,लातूर

२.	जन माहिती अधिकारी तथा सहा. शिक्षण संचालक,उपसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४२
निर्णय दिनांक १७-०३-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
पंचायत समिती,
मुदखेड, जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,मुदखेड,
जि.नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,मुदखेड,
जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.०३.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०३.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.११.२००६ रोजी त्यांचा

- -

अर्ज पाठविला असता त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून टाळाटाळ केली व विलंब लावला त्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१.२००७ रोजी प्रथम अपील केले असता मुदत संपून गेल्यानंतरही माहिती देण्यासाठी संबंधितांनी टाळाटाळ केल्याने व त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब लागला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "मुदखेड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री. व्ही.बी.गंगावणे यांनी १४ समाजकल्याण योजनेअंतर्गत वसुल केलेला लाभार्थी हिस्सा तसेच १७ समाज विकास योजने अंतर्गत वसूल केलेला लाभार्थी हिस्सा अशी एकूण १४,६४५/- रुपये तसेच २००४-२००५ या आर्थिक वर्षात लोकवाटा ही रक्कम कार्यालयात जमा केली काय?, जमा केली असेल तर त्याचा दिनांक व जमा केली नसेल तर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड यांनी विस्तार अधिकारी श्री. गंगावणे यांच्याविरुध्द सदरील रकमेचा अपहार केल्याचा गुन्हा नोंद केला काय ? जर गुन्हा नोंद नसेल तर त्याचे कारण काय याचा लेखी खुलासा" अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती साधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या प्रकरणाची सद्यस्थिती कळविली. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने हे अपील गट विकास अधिकारी यांच्याकडे केले. तथापि या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २१.४.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीची मागणी फेटाळून अपील निकाली काढले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचा हा

- -

निर्णयही अपिलार्थीस प्राप्त न झाल्याचे, त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावरुन दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, मुदखेड यांनी यासंदर्भात असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. २८.११.२००६ रोजीच्या अर्जास दि. ७.१२.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणाची वस्तुस्थितीदर्शक माहिती पुरविली आहे. मात्र अपिलार्थीने माहिती मागताना श्री. व्ही.बी.गंगावणे यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला नसल्यास त्याची कारणे काय, ही माहिती त्यांना देता आली नाही, कारण अशाप्रकारचा गुन्हा नोंदविण्यासाठी ते सक्षम अधिकारी नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती व त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती यामध्ये थोडा फरक आहे. तसेच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे अपिलार्थीच्या प्रथम अर्जास व त्यांच्या प्रथम अपिलावर आवश्यक तो निर्णय पारित केला आहे. अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी हजर असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये नमूद केले आहे. मात्र अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अशाप्रकारचा कोणताही उल्लेख न करता जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याचे आयोगास भासविले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीस विस्तार अधिकारी श्री. गंगावणे यांच्यावर गुन्हा न नोंदविण्याच्या कारणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल अथवा एखाद्या प्रशासकीय निर्णयाबद्दल खुलासा किंवा कारणे मागणे अभिप्रेत नाही.

त्यामुळे मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये नमूद केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने व त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ही अधिनियमातील 'माहिती' होत नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद पाहता, अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती ज्ञात झाली असल्याने अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर विचार करण्याचे आता कोणतेही प्रयोजन आयोगास उरले नसल्याचे दिसून येत आहे.

सबब, वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ,मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५२७
निर्णय दिनांक १७-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रकाश माधवराव मोटे,<br>रा.टेळकी, ता.लोहा,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, लोहा,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं),<br>जिल्हा परिषद,नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २९.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता दिशाभूल करणारे उत्तर दिले व दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला. या अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असेही म्हटले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील एकूण ७ मुद्यांपैकी जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ व २ ची माहिती

- -

दिली. मुद्दा क्र. ३ ची माहिती अर्धवट दिली व मुद्दा क्र. ४ ते ७ ची माहिती अद्यापपावेतो देण्यात आली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २०००-२००१ ते २००३-२००४ या कालावधीशी संबंधित मौजे तिडकी अंतर्गत झालेल्या अपहाराबाबत दि. ७.६.२००४ रोजी लोकशाही दिनी केलेल्या तक्रारी अर्जासंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या माहिती मध्ये- विस्तार अधिकारी (पं), यांनी केलेल्या चौकशी अहवालाची सत्यप्रत, सरपंच, ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या नोटीसच्या सत्यप्रती, संबंधितांनी सादर केलेल्या खुलाशाच्या सत्यप्रती, प्रशासनाने अंतिमतः व्यक्तिशः निश्चित केलेली अपहारित रक्कम, अपहारित रक्कम वसूल करण्याबाबत केलेली कार्यवाही, अपहारित रक्कम व्याजासह ग्राम पंचायतीला केव्हा उपलब्ध करुन देणार व अपहारित रकमेची वसूली करण्यास टाळाटाळ केलेल्या कर्मचारी व अधिकारी यांची नावे व पदनामे- या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.९.२००७ रोजी निर्णय दिला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दि. २५.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

- -

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद आयोगास लेखी स्वरुपात सादर केला असून या कार्यवाही आयोगास लेखी स्वरुपात सादर केली असून या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करताना दिलेल्या अभिप्रायाचा त्यांनी या लेखी युक्तिवादामध्ये पुनरुच्चार केला असून त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असल्याने त्यांना दंड लावण्यात यावा व त्यांच्या दि. २२.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश व्हावे, अशी त्यांनी यामध्ये आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास दि. २५.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दा क्र. ३ च्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीस ग्राम सेवक, गट विकास अधिकारी यांनी सादर केलेली सहपत्रे मूळात त्यांच्याकडेच उपलब्ध नाही, असे आयोगास सांगितले. यावर ग्रामसेवकाने त्यांच्या गट विकास अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले कथित सहपत्राच्या प्रती संबंधित ग्रामसेवकाकडून मागवून घेऊन ती माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्याचे आयोगाने आदेशित केले व जन माहिती अधिकारी यांनी ते मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ ते ७ या विषयाशी संबंधित आवश्यक असलेल्या माहितीचे पृथःकरण करता, असे दिसून येते की, अद्यापपावेतो त्यांना अशाप्रकारची गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा यांच्याकडून कोणावरही व्यक्तिशः जबाबदारी निश्चित झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे चौकशी अहवाल तयार आहे. परंतु अद्यापही त्या चौकशी अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्याकडून अद्यापपावेतो अंतिम कार्यवाही करणे बाकी आहे. त्यामुळे अपिलार्थीस आजमितीस त्याच्या मूळ अर्जातील मुद्या क्र. ४ ते ७ मध्ये माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध होऊ शकरणार नाही, हे उघड आहे. यामुद्यांपैकी मुद्दा क्र. ६ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपहारीत रक्कम व्याजासह ग्रामपंचायतीला केव्हा उपलब्ध केली जाणार, अशी प्रश्नार्थक स्वरुपाची व भविष्यकाळाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ च मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित मुद्दा क्र. ४, ५ व ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस या प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित झाल्यानंतरच प्राप्त होऊ शकेल.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस दि. २२.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम दि. २१.६.२००७ रोजी अगर तत्पूर्वी आवश्यक होते. तो प्रतिसाद देणे भाग होते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मूळात प्रथम प्रतिसाद यांच्याकडील दि. २०.९.२००७ रोजी झालेल्या सुनावणी आदेशानंतर अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कोणताही सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यासाठी ते निश्चितपणे जबाबदा ठरत आहेत,

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अजाची जन माहिती अधिकारी यांनी उपेक्षा करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीपैकी जास्त कालावधीसाठी वंचित ठेवून जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदार वृत्ती स्पष्ट केली आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब सचिव (ग्राम विकास विभाग) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती लोहा यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने केलेल्या तक्रारीवर गट विकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी (पं) यांच्यामार्फत चौकशी करुन सदर चौकशी अहवाल दि. ९.५.२००७

- -

रोजी तयार ठेवला आहे व तो योग्य त्या प्राधिकरणाकडे सादरही केला आहे. या अहवालामध्ये अपिलार्थीने ग्रामसेवक व सरपंच यांनी संगनमताने सरकारी रकमेचा अपहार केला असल्याचे निदर्शनास आल्याचेही व त्यांनी चौकशी अहवालासंदर्भात ४ वर्षे इतका प्रदीर्घ काळ व्यपगत होऊनही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही, ही खरोखरीच दुर्दैवाची बाब आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणी असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे टेकडी ता.लोहा येथील ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचारासंदर्भात त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या चौकशी अहवालावर त्यांनी सतर्कतेने हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन महिन्याच्या आत कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहितीपैकी संबंधित उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (ग्रा.वि.वि.) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

-

-

१. श्री. प्रकाश माधवराव मोरे, मु.पो. टेकळी, ता.लोहा जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा ता.लोहा जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (ग्रा.वि.वि.) मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५२८
निर्णय दिनांक १७-०३-२००९

१ श्री. मो. मोईजखान पठाण, : अपिलार्थी
४२७, 'आसरा' प्र.नि.हा.जवळ,
कैलासनगर, नांदेड-५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
पुरवठा विभाग,
तहसील कार्यालय,नांदेड जि.नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी
पुरवठा विभाग,
तहसील कार्यालय,नांदेड जि.नांदेड.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,नांदेड जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, नांदेड,
जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेऊन सात दिवसांत माहिती देण्याचे मान्य करुनसुध्दा त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९/१६.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे -"कैलासनगरमधील केरोसिन हॉकर्सच्या पॉईंटच्या बदल्या कोणत्या शासकीय नियमानुसार व कोणत्या कारणामुळे केल्या त्याच्या शासननियमाची प्रमाणित प्रतीसह माहिती मागितली होती." अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचा पुरावा उपलब्ध कागदपत्रांमध्ये नाही. मात्र अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना ७ दिवसांच्या आत माहिती देण्याचे आश्वासित करुनही त्यांना माहिती दिली नाही, असे म्हटले आहे. यावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी काहीतरी कार्यवाही केली एवढेच अनुमान काढण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातून दि. १२.२.२००९ रोजी सूचनापत्राद्वारे तसेच आयोगाच्या कार्यालयातून दूरध्वनीद्वारे दि.१६.०३.२००९ रोजी ११.३० वा.श्रीमती बकले, लिपीक यांच्यामार्फत संदेश देऊनही त्यांनी ऐनवेळी आयोगास आज फॅक्सद्वारे ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व एकूण घटनाक्रम पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सदर माहिती मागण्याचा अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ प्रमाणे हक्क आहे व अपिलार्थीस ती माहिती देणे जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमातील कलम ७ नुसार कर्तव्य आहे. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत

- -

कोणतीही माहिती पुरविली नाही, हे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची व अपील अर्जाची या प्रकरणी अक्षम्य उपेक्षा केली असल्याचे आढळून येत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची उपेक्षा करुन जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. मोईजखान पठाण,४२७, 'आसरा' प्र.नि.हा.जवळ,कैलासनगर, नांदेड-५

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५२९
निर्णय दिनांक १७-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. कैलास माधवराव मोरे,<br>रा.सोमखेड ता. लोहा, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी,<br>लातूर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती न मिळाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी व कै. शंकर पाटील, प्राथमिक आश्रम स्कूल, शिराढोण ता. कंधार यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कै. शंकर पाटील प्राथमिक आश्रम शाळा शिराढोण या शाळेशी संबंधित सन १९९६ ते ३०.६.२००७ या कालावधीतील एकूण १३ मुद्याद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या दि.३०.६.२००७ रोजीचा मूळ माहितीचा अर्ज दि. ३१.७.२००७ रोजीजीच्या पत्रान्वये संबंधित आश्रम शाळेकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे शाळेचे मुख्याध्यापक यांना सूचित केले व त्यांच्या या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कृतीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३.८.२००७ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. १०.९.२००७ रोजी संबंधितानी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या मागणीचा आयोगाकडे पुनरुच्चार केला.

जन माहिती अधिकारी हे, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना, आदेशित करुनही त्यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याचे कोणतेही समर्थनीय कारण आयोगास सांगू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस

-                    -

माहिती देण्याकरिता या संपूर्ण घटनाक्रमामध्ये प्रत्येक टप्प्यावर अत्यंत उदासीन राहिल्याचे नि:संशयपणे दिसून येत आहे. मूळात अपिलार्थीचा दि. ३०.६.२००७ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांच्याकडे दि. ४.७.२००७ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे अपेक्षित असताना अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाच दिवसांऐवजी ३० दिवसांनंतर पाठविला व यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.८.२००७ रोजी निर्णय देऊनही अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. अपिलार्थीचा अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. १६.८.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी करुनही अपिलार्थी संबंधित शाळेत उपस्थित राहिले नाहीत. आज रोजी आयोगाकडे उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या संदर्भात संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास दि. ५.९.२००७ रोजी एक पत्र लिहिलेले आहे. या पत्रामध्ये त्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना उद्देशून असे लिहिले आहे की, ते शाळेमध्ये व्यक्तिश: माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले असता शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका त्यावेळी उपलब्ध नव्हत्या. मात्र या पत्रावर अपिलार्थीने सही केलेली नाही, यावरुन अपिलार्थीने हे पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविले नाही, असे अनुमान काढण्यात येत आहे. हा सर्व पत्रव्यवहार पाहता, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: माहितीची मागणी करुनही उपस्थित राहिले नसल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये दि. २३.३.२००९ रोजी व्यक्तिश: माहिती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले आहे, हे पाहता उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी दि. २३.३.२००९ रोजी अपिलार्थीस, त्यांच्या दि.३०.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना व्यक्तिश: विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने व्यक्तिश: माहितीची

-                    -

मागणी केली असल्याने त्यांनी व्यक्तिशः उपस्थित राहून माहिती हस्तगत करणे अनिवार्य आहे व ही माहिती स्वीकारण्यासाठी त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. २३.३.२००९ रोजी व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कैलास माधवराव मोरे, मु.पो.सोनखेड, ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५३०
निर्णय दिनांक १७-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जी. एस. रायबोले,<br>रा.किनवट, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड | | |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपकार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम<br>विभाग,नांदेड |
| जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम<br>विभाग,नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी विद्यमान जन अपिलीय अधिकारी (तत्कालीन जन माहिती अधिकारी) उपस्थित आहेत तर, अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०३.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी कोणतीही विशिष्ट विनंती आयोगास केली नसून त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्यामार्फत लावलेल्या साईन कास्ट बोर्डाची माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०७.२००७ रोजीच्या पोस्टाने पाठविलेल्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००० ते २००७ या कालावधीतील प्रत्येक वर्षाच्यासाईन कास्ट बोर्डाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः व नोंदणीकृत पोस्टाद्वारे अशा दोन प्रकारे मागितली होती. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाद्वारे दि. ९.८.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७४/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने दि. १२.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांनी दि. १४.९.२००७ रोजी अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असल्याचे कळविले व तदनंतर अपिलार्थीस दि. २८.९.२००७ रोजी ही माहिती त्यांनी व्यक्तिशः उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचा आवश्यक तो पुरावा उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. दरम्यानच्या काळात अपिलार्थीने दि. ५.९.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.११.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

- -

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना दि. ९.८.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १२.९.२००७ रोजी केल्यानंतर लागलीच दि. १४.९.२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी ही कृती केल्याचे आयोगास सांगितले. दि. १४.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सूचना दिल्यानंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दि. २८.९.२००७ रोजी व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन अथवा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी या प्रकरणी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस वेळेत माहिती पुरविली आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९.८.२००७ रोजी प्राप्त झाला. यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केला. अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७४/-इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रानंतर अपिलार्थीने दि. १२.९.२००७ रोजी रु. ७४/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले. अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्याचे अंतिम दिवस दि. १५.९.२००७ असा होता. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.९.२००७ रोजीच अपिलार्थीने मागणी केलेली

- -

माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे कळविले आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी ही कृती केली, ती या प्रकरणी बरोबर असल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १४.९.२००७ रोजी पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या सोयीनुसार दि. २८.९.२००७ रोजी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घेतली आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रमाद घडल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे आढळून न आल्याने तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्जामध्ये कोणत्याही विशिष्ट प्रकारची विनंती न केल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक "धुमाकूळ", ता.किनवट जि.नांदेड-४३१ ८०४

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५३१
निर्णय दिनांक १७-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. महादू गणपती गायकवाड,<br>रा.जंगमवाडी,नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव/अध्यक्ष,<br>पेनगंगा प्रकल्प मंडळ कर्मचारी पतसंस्था, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक (वसूली)<br>सहकारी संस्था,ता.नांदेड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सचिव,
पेनगंगा प्रकल्प कर्मचारी पतसंस्था, नांदेड
जन अपिलीय अधिकारीः जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १२.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दिली नाही, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.१०.२००७ रोजी अपील

केले असता, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही उत्तर प्राप्त झाले नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये सचिव/अध्यक्ष पैनगंगा प्रकल्प मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. एस.पी.गायकवाड यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ हे संबंधित संस्थेस लागू होत नसल्याचे कारण दर्शवून संबंधित संस्थेने ही माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. संस्थेकडून ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,नांदेड यांच्याकडे दि. १२.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.११.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती देण्याचे संबंधित सहकारी पतसंस्थेस सूचित केले. जिल्हा उपनिबंधक यांच्या आदेशाची प्रत प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावरुन दिसून येते. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागविली आहे, त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जावर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ चा विचार करणे गरजेचे होते, तथापि अशाप्रकारचा विचार त्यांच्या दि. २१.११.२००७ रोजीचा आदेश देताना न केल्याचे आढळून येत आहे. सबब संस्थेस आता असे आदेशित करण्यात येते की, दि. २२.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती

-                    -

अधिकार अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी लक्षात घेऊन त्यांनी या प्रकरणी त्यांचे स्तरावर प्रथमतः निर्णय घ्यावा.हा निर्णय त्यांना मान्य न झाल्यास माहिती अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महादू गणपती गायकवाड, द्वारा एस.पी.गायकवाड, विष्णुपूरी पंपगृह विभाग, जंगमवाडी, नांदेड-५

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,पैनगंगा प्रकल्प मंडळ कर्मचारी पतसंस्था मर्यादित,पैनगंगा वसाहत चैतन्यनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७३
निर्णय दिनांक    १७-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रामप्रसाद श्रीकिशनजी खंडेलवाल,<br>नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,<br>नांदेड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड

जन अपिलीय अधिकारी : वाचक पोलीस उपअधीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २९.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ११.९.२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकार यांचा दि. ११.९.२००७ रोजीचा निर्णय

-    -

पाहता, यामध्ये, "माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपण जी माहिती मागितली ती "त्रयस्थ" व्यक्तीबाबतची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कायद्याच्या कलम ११(१) प्रमाणे "त्रयस्थ" व्यक्तीस माहिती उघड करावी अगर कसे याबाबत संबंधितांना पत्र देण्यात आले असून त्यांचा अभिप्राय प्राप्त झाल्यावर माहिती देण्यात येईल, तूर्तास आपला अर्ज निकाली काढण्यात आला आहे " असे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तात्पूरत्या स्वरुपात निर्णय दिल्याचे वरील निर्णयावरुन दिसून येते. तेव्हा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी अपिलार्थीच्या दि. २२.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आपले अंतिम निर्णय घ्यावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २२.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

-　　　　-

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १७-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामप्रसाद श्रीकिशनजी खंडेलवाल, ५-४-२६,'हरीकृपा', मारवाड गल्ली, सराफा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उपअधीक्षक,विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८

निर्णय दिनांक १८.३.२००९

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे , : अपिलार्थी
रा. अंबड , जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग परतुर जि. जालना .

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, स्थानिक स्तर, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत,तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७. ८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती न दिल्याने व या संदर्भात त्यांचेशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने व सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असे म्हटले आहे की, त्यांनी मुळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १ जानेवारी ते ३१ मार्च २००८ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्या कामाच्या हजेरीपत्रकाच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता त्यांचेकडील दि. ४.७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवल्यामुळे व्यथित होवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, या पदावर ते तीन आठवडयापुर्वीच रुजु झालेले असून या प्रकरणाशी संबंधित त्यांना काहीही माहिती नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या अपील

- -

अर्जावर अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिल्या होत्या असा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २०.५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. यामध्ये अपिलार्थीने त्यांना रोजगार हमी योजनेच्या नेमक्या कोणत्या कामाची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित आहे हे नमूद केलेले नाही. जर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील संपूर्ण कामाच्या हजेरी पत्रकाच्या झेरॉक्स प्रती प्राप्त होणे अपेक्षित होते तर त्याप्रमाणे त्यांनी "सर्व रोजगार हमी योजनेच्या (सर्व) कामाबाबत" असा देखील उल्लेख या अर्जामध्ये केला नाही. त्यामुळे अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची होत असल्यामुळे ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत नाही. याचबरोबर अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत व तदनंतर आयोगाकडील सुनावणीपर्यंत कोणताही प्रतिसाद न देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केल्याचे या ठिकाणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. सबब सचिव जलसंपदा यांना संबधित जन माहिती अधिकारी ( श्री ब्रम्हप्रकाश ठाकुर, सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग घनसावंगी जि. जालना या पदावर कार्यरत ) यांचेविरुध्द प्रचलीत सेवा नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने मुळातच जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव जलसंपदा यांना, संबधित जन माहिती अधिकारी ( श्री ब्रम्हप्रकाश ठाकुर, सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग घनसावंगी जि. जालना या पदावर कार्यरत ) यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे , कांवदी गल्ली अंबड ता अंबड , जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग परतुर जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव ( जलसंपदा ) मंत्रालय मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९

निर्णय दिनांक १८.३.२००९

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे , : अपिलार्थी
रा. अंबड , जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर
उपविभाग घनसावंगी जि. जालना .

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेले दि. ११.३.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विचाराधीन अपिलासंदर्भात त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. ११.३.२००९ रोजी संबंधित जन माहिती

- -

अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली असून त्यावर त्यांचे पुर्णपणे समाधान व शंका निरसन झाले आहे व आता त्यांची या संदर्भात कोणतीही तक्रार नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे मासेगाव ता. घनसावंगी येथील पाझर तलाव क्रमांक (६) च्या कामाच्या हजेरी पत्रकाच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००६-२००७, २००७-२००८ हा असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहीत केल्यानुसार कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस दि. ५.५.२००८ रोजी एक पत्र पाठवून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी संबंधित उपविभागाशी संपर्क साधण्याचे त्यांना सूचित केले. या पत्राची एक प्रत जन माहिती अधिकारी यांना देवून, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी किती खर्च लागेल याची माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न देण्याबाबतची कोणतीही कारणे आयोगास स्पष्टपणे सांगता आली नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांना देखिल त्यांच्या वरील कृतीचे समर्थन आयोगासमोर करता आले नाही.

- -

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती  ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याखेशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केली नाही. आज रोजी अपिलार्थीने या निर्णयाच्या सुरुवातीच्या परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. ११.३.२००९ रोजी संपुर्णपणे माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे, जी माहिती अपिलार्थीस त्यांना अर्ज केल्या पासुन ३० दिवसाच्या आत मिळणे अपेक्षित होते , ती माहिती त्यांना आता अंदाजे एक वर्ष व दीड महिना इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन असू शकेल असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय, अशा प्रकारे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून, वंचित ठेवल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीस निश्चितपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव जलसंपदा यांना संबंधित जन माहिती अधिकारी  ( श्री ब्रम्हप्रकाश  ठाकुर, सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग घनसावंगी जि. जालना या पदावर कार्यरत ) यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहीत केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी न घेवून तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देवून व निरर्थक पत्र देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे स्थानिक स्तर, महाराष्ट राज्य,

-                    -

पुणे यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येवून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) सचिव जलसंपदा यांना संबंधित जन माहिती अधिकारी ( श्री ब्रम्हप्रकाश ठाकुर, सध्या उपविभागीय अभियंता ,लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग घनसावंगी जि. जालना या पदावर कार्यरत ) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे , कावंदी गल्ली अंबड ता. अंबड , जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग घनसावंगी जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग घनसावंगी जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९०

निर्णय दिनांक १८.३.२००९

१. श्री. चंद्रकांत बी.के. , : अपिलार्थी
रा. अंबड , जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिकस्तर
उपविभाग घनसावंगी जि. जालना .

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१०.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करुनही कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करुनही त्यावर अपिलीय अधिकारी यांनी कोणताही

- -

निर्णय दिला नाही. ते ज्या ज्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जात त्या त्या वेळी माहिती उपलब्ध नाही, नंतर या, अशा प्रकारची उत्तरे त्यांना प्राप्त होत होती व माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडून टाळाटाळ होत असल्याने वाटल्यावरुन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ७.५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांचे कार्यालयाशी संबधित दि. ६.५.२००८ ते ५.६.२००८ या कालावधीतील रोजगार हमी योजने अंतर्गत चालू असलेल्या पाझर तलावाच्या हजेरी पत्रक क्रमांक १९१२७९, १९१३९१, १९१२९७, १९१३८४ व क्रमांक १९१३४७ या क्रमांकाच्या हजेरी पत्रकाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अथवा अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी न देता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ४.७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याच्या सुचना दिल्या. तथापि या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार उपस्थित राहुनही आवश्यक ती माहिती त्यांना आजतागायत प्राप्त झाली नाही. त्यांना या माहितीची आजही आवश्यकता असून ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामुल्य मिळावी व जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी.

-                    -

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने , अपिलार्थीने त्यांच्या दि. ४.३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आजतागायत त्यांना पुरवली गेली नसल्याचे आयोगासमोर मान्य केले.

वरील घटनाक्रम , दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने कलम ७ (१) नुसार ही माहिती देण्यास जनमाहिती अधिकारी हे बांधील आहेत. अपिलार्थीने माहितीची मागणी करुन आज रोजी एक वर्षाहुन जास्त कालावधी व्यपगत होवूनही जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, केवळ वादाच्या प्रयोजनार्थ कधीही उपस्थित राहीले नाहीत, असा जरी तर्क केला तरी जन अपिलीय अधिकारी यांचे दि. ४.७.२००८ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांना निश्चितपणे प्राप्त झाले असणार. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी यानंतरही कोणत्याही प्रकारची सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस आजतागायत माहिती पुरवली गेली नाही असे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी ( श्री ब्रम्हप्रकाश ठाकुर, सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग घनसावंगी जि. जालना या पदावर कार्यरत ) हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र ठरत असल्याचे दिसून येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत सबब त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीची मागणी करुनही अपिलार्थीस त्यांनी आजतागायत कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु. २५० प्रमाणे एकुण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी

- -

हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या मुदतीत त्यांचा कोणताही खुलासा प्राप्त न झाल्यास अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी विलंब लावल्याचे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचे अनुमान काढून हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहीत केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी न घेवून तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देवून व निरर्थक पत्र देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. मुख्य अभियंता ल. पा. स्था. स्तर महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन दयावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपुर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

३) संबधित जन माहिती अधिकारी ( श्री ब्रम्हप्रकाश ठाकुर, सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग घनसावंगी जि. जालना या पदावर कार्यरत ) यांना या प्रकरणी रु. २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात

- -

येवू नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ  सादर करावा.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत बी.के.  साठे नगर अंबड , ता. अंबड जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग घनसावंगी  जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

-                    -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९१

निर्णय दिनांक  १८.३.२००९

१. श्री. रामराव पांडुरंग खवणे, : अपिलार्थी
   रा. देवगाव ता. मंठा जि. जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
   उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग परतुर जि. जालना .

२. जन अपिलीय अधिकारी तथा
   कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, स्थानिक स्तर, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.९.२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्याच्या दि. १८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे कार्यक्षेत्रातील "पाझर तलाव क्रमांक ३, ४ चे अंदाजपत्रक, नकाशाच्या प्रती, पाझर तलावाच्या भिंतीची लांबी व रुंदी , संपूर्ण खर्च, रोजगार हमी योजनेचे मस्टर अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमतील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.५.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलासंदर्भातील मूळ अर्जाप्रमाणे त्यांना कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून दिली गेली नसल्याचे आयोगापुढे कबूल केले असून अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्यास ते तयार असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने माहिती मागवली त्या वेळी या पदावर श्री सुरेंद्र एकनाथ मोरवाल, सध्या उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, विभाग चिखली, जि. बुलडाणा येथे कार्यरत , हे अधिकारी कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद का दिला नाही याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीचा दि. २०.५.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात त्यांना आढळून आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने

- -

त्यांच्या  दि. १८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस सुसंगत आहे. मात्र अपिलार्थीने  या अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील अर्ज करतांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची व्याप्ती वाढवून जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती अपेक्षिली आहे. येथे असे नमूद करण्यात येते की, अपिलार्थीने अपिलीय प्राधिकरणाकडे अपील करतांना सदर सर्व अपीलाशी संबंधीत मूळ माहिती एकच असणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये मागणी केलेली वाढीव व्याप्तीची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत नव्याने स्वतंत्र अर्ज करावा लागेल. ही माहिती अपिलार्थीस या निर्णयाद्वारे देय असणार नाही. अपिलार्थीची  मूळ अर्जातील मागणी अधिनियमातील तरतुदीस सुसंगत असल्याने या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) नुसार कार्यवाही करणे हे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही व आपल्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवले आहे. अपिलार्थीने दि. २०.५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणताही निर्णय दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या  कार्यालयात आढळून आला नाही हा युक्तीवाद आयोग येथे अमान्य करत आहे. कारण आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २०.५.२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्टयर्थ संबंधित लिपीकाची तारखेसह सही असलेली प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. या प्रतीचे अवलोकन करता अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या  कार्यालयात दि. २०.५.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

-                                   -

या सर्व बाबी पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन दयावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस वरील प्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या उदासीन व निष्क्रीय कार्यशैलीमुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित रहावे लागले असल्याचे स्पष्ट होत आहे . अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी आयोगाच्या मते मूळात कोणतेही समर्थन असूच शकत नाही. त्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा वरील तथ्यहीन युक्तीवाद व अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देण्याची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची वृत्ती पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाचया कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्यामुळे त्यांचेवर विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे एकूण रु. २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांनी वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढून हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) संबधित जन माहिती अधिकारी ( श्री सुरेंद्र एकनाथ मोरवाल सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, विभाग चिखली जि. बुलडाणा या पदावर कार्यरत ) यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर या प्रकरणी रु. २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामराव पांडुरंग खवणे रा. देवगाव ता. मंठा , जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग परतुर जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर ,जालना

- -

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री सुरेंद्र एकनाथ मोरवाल, उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर विभाग चिखली , जि. बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२

निर्णय दिनांक १८.३.२००९

१. श्री. प्रदिप सिताराम फुलमाळी : अपिलार्थी
रा. परतुर जि. जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर
उपविभाग घनसावंगी जि. जालना .

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, स्थानिक स्तर,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.२.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती न दिल्याने, जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करुनही आजपर्यंत आवश्यक ती माहिती देण्यासाठी संबंधिताकडून

टाळाटाळ होत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २००३ ते २००७ पर्यंतच्या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत झालेल्या पाझर तलाव, गाव तलावाच्या अपुर्ण व पुर्ण कामाची, लेबर पेड मस्टर, एम.बी. च्या झेरॉक्ससह माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षित केली असून ते दारिद्र्यरेषेच्या खालील व्यक्ती असल्याचा पुरावा त्यांनी या अर्जासोबत जोडल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती संबंधितांकडून प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी गेल्या आठवडयात जन माहिती अधिकारी यांना भेटले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ८ दिवसात देण्याचे कबूल केले होते व जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे अपिलार्थीने त्यावेळी मान्य केले होते.

जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात आढळत नसल्याचे व अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने त्यावर कोणताही निर्णय ते घेवू शकले नसल्याचे, आयोगास अवगत केले.

या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला वरील युक्तीवाद आयोगास अमान्य आहे. कारण त्यांच्या युक्तीवादाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचा कोणताही सकारात्मक

- -

प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केल्याचे या प्रकरणात दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दाखल केल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत सादर केला असल्याने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात आढळून आला नाही हे त्यांचे म्हणणे आयोग अमान्य करत आहे.

वरील घटनाक्रम, संबंधीतांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणात असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांच्या दि. २८.८.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. त्यामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा त्यांनी सोबत जोडला असे म्हटले आहे. पुरावा जोडला आहे किंवा नाही या बाबत या अर्जावर कोणत्याही प्रकारे स्पष्टपणे उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा वैध पुरावा सादर करावा लागेल. सदर पुरावा जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर केल्यानंतर त्याची वैधता तपासून या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याबाबतचा निर्णय घ्यावा. जर अपिलार्थीने सादर केलेले त्यांचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठी केलेल्या मूळ अर्जातील दिनांकाचे दिवशी वैध असेल तर या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर अपिलार्थीचा हा पुरावा अवैध असेल तर ही माहिती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये सशुल्क पुरवावी, असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २८.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) नुसार विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास

- -

उपरोक्त मुदतीत कोणताही प्रतिसाद न देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केल्याचे या ठिकाणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे सचिव (जलसंपदा) यांना संबधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवा नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सशुल्क अथवा विनामूल्य देण्याची कार्यवाही करावी.

३) सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी ( श्री ब्रम्हप्रकाश ठाकुर, सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग घनसावंगी जि. जालना या पदावर कार्यरत ) यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

- -

१. श्री. प्रदिप सिताराम फुलमाळी, आण्णाभाऊ साठेनगर, परतुर ता. परतुर जि. जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग घनसावंगी जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९३

निर्णय दिनांक   १८-०३-२००९

१ श्री. सिताराम सी. तुपे, : अपिलार्थी

डग्लस गर्ल्स हायस्कूल जवळ, मोदीखाना,

जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, परतूर, जिल्हा

जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्या-कडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत दिनांक १७-११-२००७ ते २२-११-२००७ या कालावधीतील - **सिरसगांव पाझर तलाव क्रमांक ३, सिंगोना पाझर तलाव क्रमांक ५, सुरुमगांव पाझर तलाव क्रमांक ४ या कामावरील दिनांक १७-११-२००७ ते २२-११-२००७ या कालावधीतील मजूर मस्टरच्या छायांकीत प्रती, मजुराच्या खाते पासबुकाच्या झेरॉक्स प्रती, या कामावरील शाखा अभियंताचे नांव आणि सन २००६ ते २००७ मध्ये झालेल्या लेखा परिक्षणाचा अहवाल** - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०८-०५-२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाईच्या प्रस्तावाची शिफारस केली. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर, त्यांचे म्हणणे मांडण्याची त्यांना पूर्ण संधी देऊनही, कोणताही युक्तिवाद करता आला नाही, मात्र अपिलार्थीस त्यांनी अद्यापपावेतो माहिती दिली नसल्याचे आयोगासमोर कबूल केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. सुरेंद्र एकनाथ मोरवाल हे अधिकारी कार्यरत होते. (सध्या ते उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) चिखली, जिल्हा बुलढाणा या पदावर कार्यरत आहेत).

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०६-१२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आजतागायत पुरविली नाही किंवा याबाबत कोणतीही सकारात्मक कारवाई केलेली नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्याची कारणे त्यांना पूर्ण संधी देऊनही आयोगास सांगता आली नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश होऊनही अद्यापपावेतो माहिती दिली गेली नसल्याचे त्यांनी

-                    -

आयोगासमोर मान्य केले आहे. मात्र आता ही माहिती ते अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०५-२००८ रोजी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याचेही या प्रकरणी सिध्द होत असल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. सुरेंद्र एकनाथ मोरवाल) हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यास नि:संशयपणे पात्र ठरत असल्याची आयोगाची खात्री झाली आहे.

सबब संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. सुरेंद्र एकनाथ मोरवाल) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच आयोगास सरळ ३० दिवसाच्या आत सादर करावा. या मुदतीत त्यांचा कोणताही खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याचे मान्य असल्याचे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे आता विनामूल्य देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. सबब संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. सुरेंद्र एकनाथ मोरवाल) यांना उपरोक्त प्रकरणी विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती

- -

का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

जालना ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सिताराम सी. तुपे, डग्लस गर्ल्स हायस्कूल जवळ, मोदीखाना, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. सुरेंद्र एकनाथ मोरवाल, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, परतूर, जिल्हा जालना)

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४

निर्णय दिनांक १८-०३-२००९

१ श्री. सतीश अंकुशराव देशमुख, : अपिलार्थी
इन्कम टॅक्स कॉलनी,
जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे **- जालना, बदनापूर व जाफ्राबाद या तीन तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत दिनांक ०१-०१-२००५ ते ३१-०३-२००८ पर्यंत चालू असलेल्या व पूर्ण झालेल्या छोट्या व मोठ्या पाझर तलावांची यादी, तसेच जी कामे पूर्ण झाली आहेत त्या कामाचे नांव, एजन्सीचे नांव, बिलाची अदा झालेली रक्कम, मजुरांच्या हजेरी मस्टरची छायांकीत प्रत, अर्धवट कामाचे नांव, एजन्सीचे नांव व गावाचे नांव व बिलाची रक्कम आणि आणखी किती बील बाकी आहे त्या बिलाची रक्कम** - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७७१२५ /- इतके चलनाव्दारे बँकेत भरण्याचे सूचित केले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी सूचित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे आयोगास सांगून या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी काहीही कारवाई न केल्यामुळे त्यांच्यावर दंडाची कारवाई करावी अशी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विस्तृत प्रमाणावर माहिती मागितली होती. तसेच त्यांना नेमकी कोणत्या कामाची माहिती अपेक्षित आहे हे त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन करता कळाले नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७७१२५ /- इतके चलनाव्दारे भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजी पत्र पाठविल्यासंदर्भात पुरावा आयोगाने

जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला असता जन माहिती अधिकारी हे योग्य तो पुरावा आयोगासमोर दाखवू शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोठ्या प्रमाणाची व विस्तृत माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जरी त्यांच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला असला तरी हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविल्याचा कोणताही ठोस पुरावा (जावक नोंदवहीचा) ते आयोगास दाखवू शकले नाहीत व हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या कथित पत्राचे अवलोकन केले असता यामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक असलेल्या शुल्काच्या रकमेचा तपशील दिला नाही. अपिलार्थीने सदर शुल्क चलनाव्दारे कोणत्या बँकेत भरावयाचे याचा उल्लेख त्यामध्ये नाही. या सर्व बाबी पाहता जन माहिती अधिकारी यांनी कथित दिनांक २८-०७-२००८ रोजी अपिलार्थीस पाठविलेले पत्र अवैध ठरत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो प्रतिसाद न दिल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व परिणामी अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती आता विनामूल्य देय ठरत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता या अर्जातील "आणखी किती बिले देणे बाकी आहे" ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण ही माहिती भविष्यकाळाशी निगडीत असून कोणतेही काम अर्धवट असतांना उर्वरित किती बिले एजन्सींना देणे बाकी आहे ही माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस देऊ शकणार नाहीत. मात्र या अर्जातील उर्वरित माहिती त्यांच्याकडून आता अपिलार्थीस विनामूल्य देय होईल.

-                    -

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याबाबत कोणताही पुरावा सादर न केल्यामुळे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत  झाले आहे.  सबब, मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जालना

दिनांक १८-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सतीश अंकुशराव देशमुख, इन्कम टॅक्स कॉलनी, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ९५/०८, ९६/०८ व ९७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५, ९६ व ९७

निर्णय दिनांक १८-०३-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, — अपिलार्थी
रा. पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :

१ अपील क्रमांक ९५/०८
उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्था.स्तर), उपविभाग, भोकरदन, जि. जालना

२ अपील क्रमांक ९६/०८
उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्था.स्तर), उपविभाग, परतूर, जि. जालना

३ अपील क्रमांक ९७/०८
उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्था.स्तर), उपविभाग, अंबड, जि. जालना

**निर्णय**

- -

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दाखल केलेली एकूण तीन व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या तीनही प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०७-०६-२००८ (अपील क्रमांक ९५/०८), १६-०६-२००८ (अपील क्रमांक ९६/०८) व १३-०६-२००८ (अपील क्रमांक ९७/०८) रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनासंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांच्या स्तरावर उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या संबंधीत जन माहिती अधिका-यांच्या ताब्यात होती त्यांच्याकडे अपिलार्थीचे माहितीसाठीचे मूळ अर्ज दिनांक २५-०७-२००७ व ०४-०७-२००७ रोजी पाठविले. अपिलार्थीच्या अपील क्रमांक ९६/२००८ च्या संदर्भात कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज कधी पाठविला हे त्यांना आयोगास सांगता आले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दिनांक १०-०७-२००८ (अपील क्रमांक ९५/०८), १७-०७-२००८ (अपील क्रमांक ९६/०८) व १७-०७-२००८ (अपील क्रमांक ९७/०८) रोजी प्रथम अपिले दाखल केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १०-०९-२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित

- -

करुनही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे ही व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना या तीनही प्रकरणाशी संबंधीत त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची आवश्यकता असल्याचे आज आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते ३० दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या जून २००८ मधील मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या आदेशान्वये संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती दिनांक २५-०९-२००८ रोजी अगर तत्पूर्वी देणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करुन अपिलार्थीस त्यांची दिनांक ०६-१०-२००८ रोजीची व्दितीय अपिले राज्य माहिती आयोगाकडे करण्यासाठी, आपल्या अशा प्रकारच्या निष्क्रीय कृतीव्दारे, भाग पाडले. आज रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे कबूल केले आहे. हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या तीनही प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत तर कोणताही प्रतिसाद दिला नाहीच परंतु त्यांच्या विभागाचे प्रमुख अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस त्यांनी विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निष्क्रीय व उदासीन कृतीमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहिल्याचे दिसून येत आहेत. किंबहुना अपिलार्थीस अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, यांनी आदेशित करुनही विहित कालावधीमध्ये माहिती न पुरविण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नसून त्यांची इतरत्र बदली झाली आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांची नांवे श्री. मेहर (अपील क्रमांक ९५/०८,

सध्या उपविभागीय अभियंता, नांदुर मधमेश्वर कालवा, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद, श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर (अपील क्रमांक ९६/०८, सध्या उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर) घनसावंगी जि. जालना) व श्री. राजपूत (अपील क्रमांक ९७/०८, सध्या ल. पा. (स्थानिक स्तर) हिंगोली येथे कार्यरत) अशी आहेत. आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत.

उपरोक्त प्रकरणी त्यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा प्रदीर्घ कालावधीकरिता माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढून हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली तीनही व्दितीय अपिले (अपील क्रमांक ९५/०८, ९६/०८ व ९७/०८) मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ९५/२००८, ९६/२००८ व ९७/२००८ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झ ाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

\- -

| | | |
|---|---|---|
| जालना | | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक | १८-०३-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. मेहेर, (तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग भोकरदन, जिल्हा जालना) उपविभागीय अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (अपील क्रमांक ९५/२००८) By R.P.A.D.

४ श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर, (तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर) उपविभाग परतूर, जिल्हा जालना) उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (अपील क्रमांक ९६/२००८) (By R.P.A.D.)

५ श्री. राजपूत, (तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर) उपविभाग अंबड जिल्हा जालना) उपविभागीय अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर) हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (अपील क्रमांक ९७/२००८)(By R.P.A.D.)

६ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८

निर्णय दिनांक   १८-०३-२००९

१ श्री. प्रभुदास एस. भालेराव, : अपिलार्थी
कमलारतन प्लाझा, जे. ई. एस. महाविद्यालय मार्ग,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत त्रयस्थ पक्षाविषयी सन २००६ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागितल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या त्यांच्याकडील पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १४६ इतके चलनाव्दारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याचा आवश्यक तो पुरावा सादर केला आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिलेल्या सूचनेचे पालन न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १८-०८-२००८ रोजी सुनावणीसाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे कळविले तथापि अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय पारित केला गेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या ७३ पृष्ठांच्या माहितीकरिता एकूण १४६ रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच दिनांक १२-०५-२००८ रोजी सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजी सुनावणी ठेवली असता व सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले असता अपिलार्थी या सुनावणीसाठी उपस्थित राहिले नाहीत, तसेच आज देखील आयोगाच्या सुनावणीसाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्याचे अथवा त्यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी उपस्थित नाहीत. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा चलनाव्दारे भरणा न केल्याने व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस अनुपस्थित राहील्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती उपलब्ध होऊ शकली नाही असे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली

- -

सपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे व ती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी त्यांची तयारी असल्याचे आयोगास सांगितले. मात्र अपिलार्थीस आयोगाकडील आदेशाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती हवी असल्याचे दिसून येते. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख केला नाही. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

जालना ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभुदास एस. भालेराव, कमलारतन प्लाझा, जे. ई. एस. महाविद्यालय मार्ग, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक ९९/०८, १००/०८ व १०१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९, १०० व १०१

निर्णय दिनांक १८-०३-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, अपिलार्थी
रा. पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

अपील क्रमांक ९९/०८ व १०१/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,
जिल्हा जालना

अपील क्रमांक १००/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी (तांत्रिक), तालुका कृषि अधिकारी
कार्यालय, परतूर, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील तीनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक ९९/२००८ व १०१/२००८ मधील जन माहिती अधिकारी यांचे

- -

प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी व अपील क्रमांक १०१/२००८ मधील जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तसेच या तीनही प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०९-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दाखल केलेली एकूण तीन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून न पुरविली गेल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले केली असता त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कुठल्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून माहिती दडविण्याचे प्रयत्न होत असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त तीनही प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०७-०६-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत ०१ जानेवारी २००८ ते १५ मार्च २००८ या कालावधीतील रोजगार हमी योजनेतील कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती न पुरविल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांच्याकडे दिनांक १०-०७-२००८ रोजी अपील क्रमांक ९९/२००८ व १०१/२००८ शी संबंधीत प्रथम अपिले सादर केली व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांच्याकडे दिनांक दिनांक ०९-०७-२००८ रोजी अपील क्रमांक १००/२००८ शी संबंधीत प्रथम अपील दाखल केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली गेली असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती दिल्याचे कळविले, परंतु सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या अपील क्रमांक १००/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना आयोगाकडील नोटिशीसोबत प्राप्त झ ाला. त्यांच्या कार्यालयाकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज व त्यासोबत जोडलेला माहितीसाठीचा अर्ज

- -

त्यांना अपिलार्थीकडून प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याशी रजिस्टर्ड पोस्टाने पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या दिनांक ०९-०७-२००८ व दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. त्यामुळे संबंधीत जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद व परतूर यांना अनुक्रमे अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या दोन व दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या एक अशा तीनही प्रथम अपील अर्जांवर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत, असे आदेशित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयांनी समाधान न झाल्यास, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली तीनही व्दितीय अपिले (अपील क्रमांक ९९/०८, १००/०८ व १०१/०८) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ९९/२००८, १००/२००८ व १०१/२००८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद व परतूर यांनी अनुक्रमे अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या दोन व दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या एका प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जालना
दिनांक १८-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

-

-

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी (तांत्रिक), तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक १०२/०८ व १०३/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०२ व १०३

निर्णय दिनांक १८-०३-२००९

१ श्री. अंकुशराव सोनाजी देशमुख, अपिलार्थी

इन्कम टॅक्स कॉलनी,

जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,

जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख,

जालना

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे जन

माहिती अधिकारी यांच्याकडे - नगर भूमापन क्रमांक ४८८/प,जालना या मिळकतीचे नामांतर करतांना महसूल व वन विभाग ज्ञापन क्रमांक ३९८३/११४/३६७४-ग/८६ अन्वये जालना जिल्हा मराठी पत्रकार परिषद, असे नामांतर न करता जालना जिल्हा मराठी पत्रकार संघ, जालना असे ज्या कागदपत्रांच्या आधारे केले आहे त्यांच्या सत्यप्रती व या प्रकरणांशी संबंधीत त्यांनी जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे केलेल्या तक्रारीसंदर्भात जिल्हाधिका-यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेले आदेश व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालयाने या तक्रारीवर घेतलेल्या निर्णयाच्या सत्यप्रती - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी प्रथम अपिले सादर केली. तथापि अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जांवरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन, ते माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी टाळाटाळ केली गेली आहे. अपिलार्थी यांच्या दृष्टीमध्ये दोष असून त्यांना नेहमी आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आधार म्हणून दुस-या व्यक्तीची मदत घेऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडे जावे लागले व या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रचंड प्रमाणात मन:स्ताप देण्यात आला.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्या कार्यालयाकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. ते या पदावर दिनांक १२-०६-२००८ पासून कार्यरत आहेत. परंतु या पदाचा कार्यभार स्वीकृत केल्यापासून त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणती कारवाई केली असे आयोगाने विचारले असता त्यांनी या प्रकरणात संबंधीत मेंटेनन्स सर्व्हेअर श्री. बावणे यांना यासंदर्भात तोंडी सूचना दिल्याचे सांगितले. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधीत अभिलेखे त्यांना उपलब्ध न झाल्याने ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. डी. वाय. सपकाळ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे दिनांक ०८-०५-२००८ रोजीचे दोनही अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या

-                                                                                    -

कार्यालयाकडील दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधीत अहवाल सादर करण्याचे सूचित केले होते. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या प्रकरणी सहकार्य न केल्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर त्यांना निर्णय घेता आला नाही.

सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी काय प्रयत्न केले यासंबंधी विचारणा केली असता, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी हे प्रकरण बंद केले असल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर निर्णय घेण्याचा प्रश्न ते कार्यरत असतांना कधीही उद्‌भवला नाही असे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या दोनही मूळ अर्जांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे देणे भाग होते, तथापि या दोनही प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारे प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. एवढेच नव्हे तर त्यांचे वरिष्ठ जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित करुनही त्यांनी कोणतीही सकारात्मक कारवाई या प्रकरणी केली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दहा दिवसाच्या आत देण्याचे मान्य केले आहे. सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असून माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) नुसार आता अपिलार्थीस ही माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी लागेल. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त दोनही प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरु होऊनही अपिलार्थीच्या मूळ अर्जाची या प्रकरणी केलेली उपेक्षा आयोग विशेष गांभीर्याने घेत आहे. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास ३० दिवसाच्या आत देण्यासंदर्भात कारवाई करणे हे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक असल्याचे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना

-                                   -

अधिनियमाची अंमलबजावणी सुरु झालेला कालावधी लक्षात घेता निश्चितपणे माहिती असणार. मात्र या प्रकरणी खुद्द त्यांच्या वरिष्ठांनी सूचना दिल्यानंतरही अपिलार्थीस माहिती न देण्याच्या त्यांच्या कृतीचे कोणतेही समर्थन मूळात अस्तित्वात असू शकत नाही, असे आयोगास वाटते.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे अशा प्रकारे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यासाठी पात्र ठरत असल्याची आयोगाची खात्री झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन व माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव (महसूल) यांना, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. चव्हाण सध्या निलंबीत) यांच्यावर तसेच सध्याचे जन माहिती अधिकारी यांनीही अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रयत्न केला नसल्याने त्यांच्यावरही या प्रकरणी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले (अपील क्रमांक १०२/०८ व १०३/०८) मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १०२/०८ व १०३/०८ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दोनही मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, दोन वेगवेगळया पत्राव्दारे, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी (श्री. चव्हाण, सध्या निलंबीत व औरंगाबाद येथे अधीक्षक भूमि अभिलेख या कार्यालयाशी संलग्न) व श्री. प्रशांत पंढरीनाथ बिलोलीकर, सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

-                                    -

जालना ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंकुशराव सोनाजी देशमुख, इन्कम टॅक्स कॉलनी, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. चव्हाण, तत्कालीन जन माहिती अधिकारी (सध्या निलंबीत व औरंगाबाद येथे अधीक्षक भूमि अभिलेख या कार्यालयाशी सलग्न) (मार्फत : जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक १०४/०८ व १०५/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०४ व १०५

निर्णय दिनांक १८-०३-२००९

१ श्री. राधाकिसन कचरु खरात, अपिलार्थी
रा. अशोकनगर (राजवाडा), सरस्वती भुवन समोर,
जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : १ अपील क्रमांक १०४/०८
उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग,
परतूर, जिल्हा जालना

२ अपील क्रमांक १०५/०८
उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग,
भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपील क्रमांक १०५/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर अपील क्रमांक १०४/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

- -

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दाखल केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या दोन वेगवेगळया अर्जांव्दारे परतूर व भोकरदन उपविभागाशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - परतूर उपविभागातील श्री. कोरडे व श्री. मापारी या शाखा अभियंत्यांच्या कालावधीत झालेल्या परतूर तालुक्यातील सन २००५ ते २००७ या कालावधीतील झालेल्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या व हजेरीपत्रकाच्या प्रती व खर्चाची संपूर्ण माहिती व भोकरदन उपविभागातील शाखा अभियंता श्री. औटी यांच्या याच कालावधीतील अशाच प्रकारची कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने या प्रकरणी माहितीसाठीचा अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्याने त्यांनी ही माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात होती त्या प्राधिकरणाकडे म्हणजे उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर व उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत दिनांक ०४-१२-२००७ रोजी पाठवून अपिलार्थीस संबंधीतांच्या कार्यालयामार्फत माहिती देण्याचे सूचित केले. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडून अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७२५१ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या रजिस्टर्ड पोस्टाव्दारे कळविले. यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन यांनी आयोगासमोर सादर केला. मात्र उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे या प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी दोनही प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिले सादर केली. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा

- -

प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीचा दिनांक ०१-१२-२००७ रोजीचा प्रथम अर्ज त्यांना कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, जालना यांच्यामार्फत दिनांक ०४-१२-२००७ रोजी प्राप्त झाला. यावर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७२५१ इतके भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस आजतागायत ही माहिती उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर हे आयोगाने त्यांना दिनांक १७-०३-२००९ रोजी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, जालना यांच्या कार्यालयातील श्री. पुराणकर यांच्यामार्फत दूरध्वनीव्दारे संदेश देऊनही आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत. यासंदर्भात कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, जालना यांनी त्यांचे दिनांक १६-०३-२००९ रोजीचे म्हणणे आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जास उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर यांनी माहिती देण्यासाठी कुठल्याही प्रकारे रक्कम भरण्याचे पत्र अपिलार्थीस दिले नसल्याचे नमूद केले आहे. थोडक्यात उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद आजपावेतो दिल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील घटनाक्रम, उपस्थित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. जि. प. उपविभाग, भोकरदन यांनी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने या दोन प्रकरणापैकी परतूर उपविभागाशी संबंधीत मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून यामध्ये अपिलार्थीस निश्चित कोणत्या कामाची माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने परतूर उपविभागाशी संबंधीत मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची व अधिनियमातील तरतुदीशी विसंगत ठरते, त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. भोकरदन उपविभागाशी संबंधीत माहिती मात्र अपिलार्थीने, गावतलाव व पाझर तलाव अशा विशिष्ट कामांची मागितली असल्याने ही माहिती, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

-                    -

मात्र या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीच्या भरावयास सांगितलेल्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन यांच्या कार्यालयात न केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना ही माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पत्र पाठविल्याचा आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला असून या पुराव्यावरुन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची कल्पना अधिनियमातील विहित मुदतीत दिली गेली असल्याचे दिसून येते. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने परतूर विभागाशी संबंधीत मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याने व भोकरदन उपविभागाशी संबंधीत माहिती अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्याने अपिलार्थीस या दोनही प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केल्यानंतर अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करणे हे अर्जदाराचे प्रथम कर्तव्य असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याचे त्यांचे कर्तव्य व्यवस्थितपणे पार न पाडल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. जि. प. उपविभाग, भोकरदन यांच्याकडून प्राप्त न होण्यासाठी ते स्वत: जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अशा प्रकारे एका प्रकरणी मोघम स्वरुपाची माहिती, जी अपिलार्थीस मूळात देय होत नाही, अशी माहिती मागितली व दुस-या प्रकरणी माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वत:च जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन अपिलार्थीची दोनही व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

प्रसंगावशात् अपिलार्थीची दोनही व्दितीय अपिले जरी फेटाळली गेली असली तरी उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर यांच्या उपविभागाशी संबंधीत असलेल्या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिले ही बाब दुर्लक्षित करुन टाकणे आयोग येथे उचित समजत नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर यांनी वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे

-                    -

करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन वेळीच निर्णय दिला असता तर अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे प्रयोजन उरले नसते. अपिलार्थीचा दिनांक ०८-०१-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज दुर्लक्षित करुन संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई या प्रकरणी पुरेपूर स्पष्ट केली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची व बेपर्वाईची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १०४/०८ व १०५/०८ फेटाळण्यात येत आहेत.

२. सचिव (जलसंपदा) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, परतूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जालना ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राधाकिसन कचरु खरात, रा. अशोकनगर (राजवाडा), सरस्वती भुवन समोर, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०६

निर्णय दिनांक १८-०३-२००९

१ श्री. गणेश सखाराम जाधव, : अपिलार्थी
रा. खासगाव, तालुका जाफ्राबाद,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, शिपोरा अंभोरा,
तालुका जाफ्राबाद जिल्हा जालना

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने श्री. पी. एस. शिंदे, प्रभारी मुख्याध्यापक,

केंद्रीय प्राथमिक शाळा, शिपोरा अंभोरा, तालुका जाफ्राबाद जिल्हा जालना व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जाफ्राबाद यांनी माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

या प्रकरणाची वस्तुस्थिती गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जाफ्राबाद यांनी आयोगास प्रथमतः समजून सांगितली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत त्यांच्या शाळेतील पाणी टाकीचे व केंद्र प्रमुख कार्यालय बांधकामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे उपलब्ध असल्याने त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ०७-०५-२००८ रोजीचा अर्ज, जो त्यांच्याकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी प्राप्त झाला तो, संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे दिनांक २९-०५-२००८ रोजी पाठविला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत मुख्याध्यापकाने तदनंतर उपलब्ध करुन केली व अपिलार्थीस दिनांक १४-०६-२००८ रोजी सदर माहितीपोटीचा खर्च रुपये २०० चलनाव्दारे त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील दोन मुद्दयापैकी एका मुद्याशी संबंधीत माहिती शाळेच्या मुख्याध्यापकाकडे तयार होती मात्र मुद्दा क्रमांक दोनशी संबंधीत माहिती या शाळेचे पूर्वीचे जे मुख्याध्यापक पदावर या शाळेमध्ये कार्यरत होते त्यांच्याकडे होती. तत्कालीन मुख्याध्यापकाने जन माहिती अधिकारी यांना त्यांचा कार्यभार पूर्णतः हस्तांतरीत न केल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देता येत नसल्याबाबतचा अहवाल गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांच्याकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी पाठविला.

या सर्व घडामोडी होत असतांना अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी अपिलार्थीस सुनावणीची पुन्हा एक संधी देण्यात येत आहे असे नमूद करुन एक टिपणी आपल्या अभिलेख्यावर ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही निश्चित स्वरुपाचे आदेश दिले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे.

-　　　　-

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने अपील अर्जावर दिलेल्या पत्त्यावर ते राहत नसल्याने अपिलार्थीशी त्यांनी केलेला सर्व पत्रव्यवहार त्यांना परत आल्याचे नमूद केले आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक हे अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर दिलेल्या पत्त्यावर गेले असता, अपिलार्थी त्यांना दिलेल्या पत्त्यावर आढळून आले मात्र याबाबत अपिलार्थीने टेंभुर्णी येथील दिलेल्या पत्त्यावर जन माहिती अधिकारी व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांनी केलेला पत्रव्यवहार त्यांना परत प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक अपिलार्थीस मौजे खासगांव तालुका जाफ्राबाद जिल्हा जालना येथे जाऊन भेटले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती स्वीकारण्याचे नाकारले. मात्र तशा प्रकारचा कोणताही लेखी जबाब अपिलार्थीने संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकास दिला नाही. त्यावेळी अपिलार्थीने संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकास असे सांगितले की, उपरोक्त प्रकरणी माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांनी केलेला नाही व अशा प्रकारचा कोणताही अर्ज माहिती अधिकार कायद्याखाली त्यांनी कोणाकडेही केलेला नाही. संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाच्या या विधानाची पडताळणी करण्याकरिता, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावरील व व्दितीय अपील अर्जावरील त्यांच्या सहीचे निरिक्षण करता, या दोनही सह्यामध्ये सकृतदर्शनी फरक असल्याचे आयोगास दिसून येते. तसेच गटशिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक यांनी वरील युक्तिवादामध्ये केलेल्या त्यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

जालना ( वि. बा. बोरगे )

- -

दिनांक १८-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश सखाराम जाधव, रा. खासगाव, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, शिपोरा अंभोरा, तालुका जाफ्राबाद जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०७

निर्णय दिनांक १८-०३-२००९

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपिलार्थी
रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झ ाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

- -

जाफ्राबाद पंचायत समितीच्या उपकर / शेषमधून बांधण्यात येणा-या घरकुलासंदर्भात सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधीत काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या त्यांच्याकडील पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी विचाराधीन अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक १०-०७-२००८ रोजी विनामूल्य पुरविली गेली असल्याचे अवगत केले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक ०५-१२-२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे अपिलार्थीचे अपील त्यांनी फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळण्याचा निर्णय कोणत्या मुद्दयावर दिला होता त्या मुद्यांचे सविस्तर विवेचन त्यांच्या आदेशामध्ये केले आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला नव्हता, त्यामुळे अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली असल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी त्यांच्या दिनांक १३-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जात व्यवस्थितरित्या करता आली नाही. या माहितीमध्ये अपिलार्थीने ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले त्यांच्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली नसल्याचे आज आयोगास आढळून आले आहे. आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राची प्रत ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

-                -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

जालना — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -